CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्र. ९०

शिव-चरित्र-साहित्य

११ वा खंड

संपादक– गणेश हरि खरे
क्यूरेटर भा. इ. सं. मंडळ, पुणें

Records of the Shivaji Period
Vol. XI

By
Ganesh Hari Khare
Curator, B. I. S. Mandala

4758

शक १८७९]

किंमत ५ रु.
Price Rs. 5

[A. D. 1957–58

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

निवेदन

भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक वर्ष ३८, अंक १ ते ४ म्हणजेच शिवचरित्रसाहित्य, ११ वा खंड होय. या खंडाचें स्वरूप प्रकरणांच्या प्रस्तावना, पत्रांचा पाठ, पत्रांचा कालानुक्रम, पत्रांवरील टीपा, यामुळें स्पष्ट झालें आहे. तेव्हां येथें या खंडाविषयीं आणखी कांहीं लिहिण्यासारखें राहिलेलें नाहीं.

पण एका सामान्य विषयासंबंधीं दोन शब्द येथें लिहिण्यास हरकत नाहीं. स्वराज्य मिळाल्यावर आपल्या सरकारानें विविध इनामें नाहींशीं करणारे कायदे केले. असे कायदे करणें योग्य कीं अयोग्य आणि कायद्यांचे गुणावगुण इत्यादि मुद्यांची चर्चा करण्याचें हें स्थळच नव्हे. पण झालें तें झालें हें लक्षांत घेऊन सर्व लोकांस प्रार्थना ही कीं, त्यांजपाशीं असलेलीं कागदपत्रादि साधनें त्यांनीं मंडळाच्या स्वाधीन करावीं. मंडळ तीं जपून ठेवील. म्हणजे त्यांचा त्यांना तर उपयोग करतां येईलच; पण इतरांनाहि तीं उपयोगासाठीं उपलब्ध होतील. तरी सर्वांनीं या प्रार्थनेकडे अवश्य लक्ष द्यावें.

श. १८८० वैशाख शुद्ध १५ }
ता. ३।५।१९५८ }

चिटणीस

अनुक्रमणिका

१	वाई-पंत राजाज्ञा	१
२	कासेगांव-देशमुख व देशपांडे	२५
३	पंढरपूर-विठ्ठल	२९
४	संकीर्ण पत्रें	३४
५	सोलापूर-देशमुख	५३
६	पंढरपूर-विठ्ठल	७६
	प्रस्तुत खंडांतील पत्रांचा कालानुक्रम	७८
	पत्रांवरील टीपा	८१
	सूचि	९०

मुद्रक : के. ग. शारंगपाणी, आर्यभूषण मुद्रणालय, ९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४
प्रकाशक : श्री. गं. ना. मुजुमदार, श्री. शं. ना. जोशी, श्री. ग. ह. खरे
१३२१ सदाशिव पेठ, पुणें २

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

State Museum Library Lucknow

प्रस्ताव

4158

'शिवचरित्रसाहित्याचा हा अकरावा खंड आहे. यांत सहा प्रकरणांत मिळून १०८ लेख प्रकाशित केले आहेत. हे लेख कोठें व कसे मिळाले तें ज्या त्या प्रकरणाच्या आरंभीं लिहिलेल्या प्रस्तावांत दिलें आहे. यांपैकीं कांहीं लेख मिळवून अठरा वर्षेंहि लोटलीं आहेत (६०); तर दुसरे कांहीं मिळवून फार दिवस झाल्यामुळें ते कुठें व कसे मिळाले हें माझें मलाच आतां नीट आठवत नाहीं (६४, ६५, ६७, ६८, ८३). तथापि ते आज प्रकाशित होत आहेत याबद्दल मला समाधान वाटत आहे.

हे लेख घराणेवार छापावयाचे असा येथील दंडक असल्यामुळें शिवचरित्र-साहित्याच्या इतर खंडांप्रमाणें याहि खंडांत पेशवेकालीन कागदांचा समावेश झाला आहे, होणें अपरिहार्य आहे. पत्रव्यवहार शिवकालीन असो कीं पेशवेकालीन असो. त्यावर प्रकाशनापूर्वी करावयाच्या संस्कारांपैकीं कालनिश्चय हा अत्यंत महत्त्वाचा आहे. दुर्दैवानें शिवकालीन पत्रव्यवहार फारसा उपलब्ध होत नाहीं. तत्कालीन कागद मिळतात ते प्रायः सनदा, कौल, तकरीरा, दस्तकें, महजर इत्यादि असल्यामुळें त्यांवर वर्षोल्लेख असतात. पण असे कागद सोडून दिले तर बाकींच्या वर पेशवाई पत्र-व्यवहाराप्रमाणें वर्षोल्लेख नसतात. उदाहरणार्थ, शहाजीचें 'आम्ही तो रजपूत' हें प्रसिद्ध पत्र जमखंडीच्या ज्या सारवाड घराण्यांत मिळालें त्याच घराण्यांत ले. ७१ मिळाला. दोन्ही पत्रें शिवकालीन आहेत. शहाजीच्या पत्रावर शव्वाल ४ येवढा तरी निर्देश आहे; पण ले. ७१ वर तेवढाहि निर्देश नाहीं. पेशवाई पत्रव्यवहार हजारोंनीं प्रकाशित झाला असूनहि कालनिश्चय करतांना पत्रव्यवहारांत जागोजाग पडलेल्या खंडांची पदोपदीं जाणीव होत असते. मग शिवकालातील पत्रव्यवहाराविषयीं तो अनुभव अधिक प्रकर्षानें येत असेल हें काय सांगावयास पाहिजे ? यामुळें कालनिश्चय हा विषय जितका महत्त्वाचा तितकाच जिकीरीचा बनला आहे. त्यांत चुका होण्याचे धोके पुष्कळ असतात. तथापि तो धोका पतकरूनहि येथें कालनिश्चय देण्याचा प्रयत्न मी केलेला आहे. यांतील कित्येक कागद नकलून व त्यांच्या तारखा ठरवून इतके दिवस लोटले आहेत कीं, त्यांचीं समर्थनें माझीं मलाच आतां स्मरत नाहींत (३७, ७४). पत्रें छापावयास काढल्यानंतर प्रकाशनाच्या तातडीमुळें कांहींच जमत नाहीं.

हीं पत्रें छापावयास काढलीं तेव्हां नकला बहुतेक तयारच होत्या. अगदीं क्वचित् नव्यानें तयार कराव्या लागल्या. पण कांहीं मूळांशीं रुजू घातल्या होत्या, कांहीं नव्हत्या. तेव्हां ज्यांचीं मूळें मजपाशीं होतीं त्या मूळांशीं रुजू घातल्या व नंतर छापावयास दिल्या. मुद्रितें तपासतांनाहि घेण्यासारखी सर्व काळजी घेतली आहे.

CC-0. Agamnigam Digital Preseyation Foundation, Chandigarh

तथापि कांहीं चुका राहिल्या असण्याचा संभव आहे. तेव्हां विनंति ही कीं, दोन्ही प्रकारच्या उणीवांबद्दल अभ्यासकांनीं क्षमा करावी.

पत्रें घराणेवार छापलीं म्हणजे तीं कालदृष्टय़ा मागेंपुढें होतात. म्हणून पुस्तकाच्या शेवटीं सर्व पत्रांचा कालानुक्रम दिला आहे. अपूर्ण कालनिर्देश असलेल्या पत्रांचा काल कसा ठरविला तें आणि पत्रांतील माहितीचें महत्त्व यांचें दिग्दर्शन टीपामध्यें केलें आहे. अभ्यासकांना दोन्ही गोष्टी लाभकारी वाटतील असा भरंवसा आहे.

या खंडांत प्रकाशिलेले लेख ज्यांनीं मला दिले व ज्यांनीं लेख देवविण्यास साह्य केलें त्या सर्वांचा मी ऋणी आहे. पंढरपूर–विठ्ठलविषयक लेख मिळविण्यास तेथील संशोधन मंडळाचे अध्यक्ष श्री. भालचंद्र पंढरिनाथ बहिरट यांचेंहि साह्य झालें आहे. तसेंच हा खंड तयार करण्याचे कामीं माझे मित्र श्री. बळवंत मोरेश्वर पुरंदरे यांचें हस्तन्हेचें साह्य झालें आहे. म्हणून या दोघांचेहि आभार मानतों.

अदमासें पन्नास हजार मराठी पत्रें प्रकाशित झालीं आहेत. हीं पत्रें प्रकाशित करतांना आदर्श निर्माण करण्याचे प्रयत्न झाले. पण यशस्वी आदर्श अजून निर्माण झाले नाहींत. ते निर्माण करावयाचे तर प्रत्येक पत्राचें संपादन व पाठमुद्रण करतांना पुढील गोष्टींची अचूक माहिती देणें आवश्यक आहे. **संपादनः** प्राप्ति, वर्णन, लेखन व भाषा यांचीं वैशिष्ट्यें, कालनिश्चय, स्थलनिश्चय, पत्रविषयाचा खुलासा, पत्रानें ज्ञानांत टाकलेली भर, पत्रांतील व्यक्तींचा परिचय, इत्यादींचें यथोचित प्रकटन. **पाठमुद्रण :** ऱ्हस्व, दीर्घ, काना, मात्रा, अनुस्वार, अधिकाक्षर, न्यूनाक्षर, मोकळी जागा, न लागलेला, ओळीच्या वर, खालीं किंवा एकावर दुसरा लिहिलेला अंश, विविध हस्ताक्षरें, शिक्कामोर्तबें, त्यांचीं स्थानें, त्यांचे आकार, त्यांचे पाठ, शब्दार्थ, इत्यादींचें यथोचित दर्शन.

हें सर्व करावयाचें तर त्यास तीन गोष्टींची नितांत आवश्यकता आहे. एक तर संपादकाच्या ठिकाणीं हें सर्व करण्यास अवश्यक इतकें बौद्धिक भांडवल असलें पाहिजे. दुसरी गोष्ट त्यास भरपूर साधनसामग्री सहज उपलब्ध झाली पाहिजे आणि तिसरी गोष्ट त्यास आवश्यक फुरसत मिळाली पाहिजे. आमच्या प्रांतांत या तिन्ही गोष्टींची अडचण असल्यामुळें आमच्या संपादनप्रकाशनांत अद्याप आदर्श उत्पन्न होऊं शकले नाहींत ही अतिशय दुःखाची गोष्ट आहे. कळतें; पण वळूं शकत नाहीं.

श. १८८० वैशाख शुद्ध १५ }
ता. ३।५।१९५८ }

ग. ह. खरे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

भारत इतिहास संशोधक मंडळ, त्रैमासिक

शिवचरित्रसाहित्य, ११ वा खंड

१ वाई–पंत राजाज्ञा

[शक १८७० च्या माझ्या संशोधनी दौऱ्यांत उ. सातारा जिल्ह्यांतील वाई या माझ्या मूळ गांवीं मी गेलों असतां तेथें पंत राजाज्ञा या जुन्या इनामदार घराण्यांतील माझे स्नेही श्री. मोरेश्वर खंडेराव देशपांडे, बी. ए., एलूएल्. बी. यांचीं जुनीं दप्तरें पाहण्याचा योग आला. निजामशाही, आदिलशाही व शिवशाही कालांत या कुटुंबांतील पुरूष दुसऱ्या एका घराण्यासह वाई परगण्याच्या देशपांडेपणाचे कामावर होते. या घराण्यांतील हरि मोरेश्वरास इ. १७३१ मे ५ पूर्वी राजाज्ञा हें पद प्राप्त झालें. छत्रपतींचा खाजगी प्रतिनिधि किंवा राजकुटुंबाचा खाजगी कारभारी हा राजाज्ञा पदाचा व्यावहारिक अर्थ होता. प्रस्तुत पद मराठी अमलांत नेमकें केव्हां सुरू झालें हें निश्चित नाहीं. तरी पण शिवाजी महाराजांच्या अमदानींत तें नसावें. या पदाचा सर्वप्रथम निर्देश शुहूर १०८६ रजब ६ (इ. १६८६ मे १९) च्या एका मराठी पत्रांत मिळतो; पण तेथें पदस्थ व्यक्तीचें नांव दिलेलें नाहीं. तथापि शंकराजी नारायण पंडीत सचीव, उद्धव योगदेव, त्याचा मुलगा रंगराव उद्धव, नारो राम मंत्री, चिमणाजी दामोदर, पंताजी शिवदेव, बाबूराव विश्वनाथ आणि या घराण्यांतील बहुधा हरि मोरेश्वराचा बाप मोरो जिवाजी असे आठ गृहस्थ सामान्यतः क्रमानें इ. १६८९ ते १७३० पर्यंत या पदावर होते. नंतर हें पद आनुवंशिक होण्याचे मार्गास लागलें. राजाज्ञा ही एक अत्यंत महत्त्वाची अधिकाराची जागा होती तरी ती प्रधानाच्या पातळींतील नसल्यामुळें या अधिकारावरील व्यक्तीस प्रधानमंडळांत स्थान नव्हतें. या कुटुंबानें पांच पिढ्यांपर्यंत (मोरो जिवाजी, हरि मोरेश्वर, त्याचा भाऊ भवानीशंकर मोरेश्वर, त्याचा पुत्र हैबतराव, त्याचा पुत्र भवानीशंकर आणि त्याचा मुलगा मोरो भवानीशंकर) हें पद अनुभविलें. नंतर दुसऱ्या घराण्यांत हा अधिकार गेला. तिसरा पेशवा बाळाजी बाजीराव याच्या कारकिर्दींत देशपांडे व राजाज्ञा या दोन पदांच्या जोडीस या घराण्यांतील तत्कालीन पुरूष हैबतराव भवानीशंकर यास वाई प्रांताची आनुवंशिक सुभेदारी देण्यांत आली. अशा प्रकारें अर्ध शतकवर या घराण्यांत हीं तीनहि पदें चालू होतीं. यामुळें पंत राजाज्ञांच्या दप्तरांत पुष्कळ कागद मिळण्याची शक्यता वाटली. मी त्यांच्या वाड्यांत गेलों तेव्हां तेथें कागदांनीं भरलेलीं वीस पंचवीस पोतीं व २५ जुन्या हिशेबी वह्या मला आढळल्या. त्या वेळीं या संग्रहांतील कागद नि कागद तपासणें मला शक्यच नव्हतें; पण वरवर नजर टाकतांहि मला त्यांत प्रत्येक जातीचे शेकडों कागद आढळले. रोजखर्डे, मासिक व वार्षिक हिशेबाचे ताळेबंद, करारमदार,

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बातमीपत्रें, निरनिराळ्या प्रकारचे हुकूम व त्यांच्या तामिलीचीं वृत्तें, सारा, दिवाणी, फौजदारी, धार्मिक, सामाजिक, बाबींचीं निकालपत्रें, सनदा, इत्यादि प्रकार त्या कागदांत आहेत. या साऱ्या कागदांचे रुमाल श्री. देशपांडे यांनीं मंडळाच्या हवाली केले. ते सर्व वाचून त्यांतून महत्त्वाचे कागद बाजूस काढणें पुष्कळ श्रमाचें व कालावधीचें काम आहे. पण वरवर चाळून हातीं लागले त्यांपैकीं महत्त्वाचे लहान–मोठे एकेचाळीस कागद येथें प्रकाशित करीत आहे. माझे मित्र श्री. देशपांडे यांचे मनांत आपल्या घराण्याचा एक लहानसा इतिहासच प्रकाशित करावा असें फार दिवसांपासून आहे. त्या हेतूनें त्यांनीं त्यांच्या व इतर संबंधी घराण्यांत मिळालेल्या इतिहासोपयुक्त अदमासें ७५ अप्रकाशित कागदांच्या नकला केल्या आहेत आणि प्रकाशित साधनांतील सुमारें १०० उतारे काढले आहेत. पण सरकारी कायद्यांतून निर्माण झालेल्या उदासीनतेमुळें हे सर्व उतारे त्यांनीं तुर्त मंडळांत ठेविले आहेत. मी इंडियन हिस्टॉरिकिल रेकॉर्ड्स कमिशनच्या नागपूर (इ. १९५०) अधिवेशनांत प्रस्तुत प्रकाशित होत असलेल्या कागदांविषयीं एक लेख वाचला होता.*]

ले. १ सु. १००९ } १ { श. १५३० भाद्रपद वद्य १
जखर १४ } [फा. शि. व मज.*] { इ. १६०८ सप्टेंबर १५

हैइचतखान

र्द आज रख्तखाने खोदायेवद खान आलीशान रफीउलकदर वल मकान [मो.जा.*] साहेब खुलीदामदौलतहु ताा आता मलिक नायेब गैबत वा कारकुनानि पाा वाई मालूम बाद सुाा सन तिसा अलफ इनाम जमीन सेत व मला वा बाजे बाबा

जमीन सेत वा मला बाजे बाब

चावर १८१५		बकाल प्रजगती	जकायेती		
सेत दर	मला दर	सारा	बैल १५		उभा मार्ग
सवाद काा	सवाद	बाजे तक-	पायेपोसी	पाा	हातलोट
मजकुरू	कसबा बिचे	सीम गला	जकायेती	मजकुरू	पारघाट
दाो माहा	८१५	पसकी वा उकाल			पाणी
सूल चावर १	हातलोट वा	कसबे मजकुरू			पाली
वीरजी मार्ग	पारघाट	व विलायेती			आबे पार
					कसबे मजकुरू

जोरीची गोणी भुसचे पानाचे नगासी
......८२ गोणी ८१ पाने १००

दाा इनाम बो सुदाम सेटी बिन सोन सेटी पाटणे पाा मजकुरू बिमोजीब खुर्दखत रख्तखाना मोकरम दर साल साल गुदस्ता बतेरीख १५ माहे जमादिलौवल

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सीत असर वा अलफ मुतैन रवा अस्त बायेद् की चेशान बमे करदादः बदस्तुरू अज जाहात सनतुल मजकुरू दिल्हे असे भोगवटा व तसरुफात ता साल गुा चालिले प्रमाणे दुरूस पाहून...दुबाला कीजे तालीक लिहून असली परतोनू दीजे

तेरील १४ माहे जमादिलाखर

ले. २ शाबान २२	२ [फा. फ. सा.*]	श. इ..

मुहम्मद् आदिलशाह → अफजलखान मुहम्मदशाही

मलिक यूसुफचा मुलगा मुस्तफाखान यानें विनंति केली कीं, यापूर्वी हुजूरच्या हुकुमाप्रमाणें स्वतःच्या घरची मंडळी मुहम्मदनूर किल्ल्यास पाठविली होती. त्यांना परत आणण्यासाठीं सय्यिद् जाफर सय्यिद् नूरुद्दीन महलदार जमअरिकाब यास विनंति करून त्यास स्वतःच्या मुतालिकांसह उपर्युक्त किल्ल्यास रवाना केलें. पण तो महलदार व मासे मुतालीक उपर्युक्त किल्ल्यास पोचूं शकले नाहींत; विजयी लश्करांत थांबून राहिले आहेत. आतां हुकूम व्हावा कीं, महलदार व मुतालीक यांनीं त्या किल्ल्यास जाऊन त्यांनीं माझीं माणसें आणावीं. म्हणून आतां हुकूम होतो कीं, त्या उभयानें असा प्रयत्न करावा कीं तो महलदार व ते मुतालीक त्या किल्ल्यास जातील आणि तेथून त्या खानाचीं माणसें आणून दारुस्सल्तनत रायकश ...पोचवून तेथून उपर्युक्त खानाकडे पोचवावीं. याबाबत खूप प्रयत्न करावा. जाणावें. ता. २२ शाबान.........

ले. ३ सु. १०५९ रजब ११ (१२) श. १५८१ विकारी चैत्र शुद्ध १३ शनि	३	श. १५८१ चैत्र शुद्ध १३ इ. १६५९ मार्च २६

[आरंभीं व डाव्या बाजूस २ फा. शि. व २८ ओ. फा. मज.*]

माहाजर बतेरीख छ ११ माहे रजबू बिाा हाजीर मजालसी पाा वांई सुाा सन तिसा खमसैन अलफ

[या मजकुराचे खालीं महजरासाठीं बसलेल्या हाजीर मजालसीची यादी आहे. या यादींत वाई परगण्यांतील व्यक्तींचीं नांवें आहेत. त्यांत विशेष म्हणजे वाई परगण्याचा हवालदार व बहुधा अफजलखानाचा प्रसिद्ध हेजीब कृष्णाजी भास्कर आणि दत्ताजी केशव पिसाळ देशमुखाचा बाप केशवजी यांचीं नांवें आहेत.*]

हे मुक्ष करून समस्त पाा वांई स्वस्तिश्री शके १५८१ विकारी संवछरे चैइत्र सुद त्रियोदसी सेणिवार तदनी रुस्णसेटी बिन रामसेटी वाघ सेटिया पेठ कालवट काा वांई पाा मजकूर सुाा सन तिसा खमसैन कारणे लेहून दिल्हा माहाजर ऐसा जे पेठ मजकुराचे सेटेपणाबदल रुस्णसेटी बिन रामसेटी यामधे व सोनसेटी बिन नरससेटी वाघ या हर दो जणामधे गरगशा लागला रुस्णसेटी बिन रामसेटी साहेबसदरेस येऊन उभा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राहिला जे पेठ मजकुरींचे सेटेपणाचे वडीलपण अपले वडिलाचे मिरासी दरम्याने अपला दाईज सोनसेटी दखल होउनू पेठ मजकुरींचे सेटेपणाचे वडीलपण चालवीत असे तरी वडीलपण पानमान आपले वडिलाचे आसे सोनसेटीस वडीलपणास निसबत नाही अपणावरी गहजोरी करून अपले वडीलपण घेऊन खात असे तरी साहेबी सोनसेटी मजकुरास हुजूर बोलाउनू आणुनू त्याचे व आपले बर हक्क मुनसफी करून अपले सेटेपण वडीलपण अपणास देविले पाहिजे......

[अशी मागणी कृष्णसेटी यानें केली. हाजीर मजालसींनें कृष्णसेटीचे बाजूनें निर्णय दिला. महजराचे शेवटीं, मोर्तब सुद हीं अक्षरें निराळ्या वळणाचीं असून तीं बहुधा कृष्णाजी भास्कराच्या हातचीं असावींत. शिवाय पट्कोनी फार्सी शिक्का आहे.*]

ले. ४ सु. १०९२ रवल ७	४ श्री	श. १६१३ मार्गशीर्ष शुद्ध ८ इ. १६९१ नोव्हेंबर १८

[आरंभीं वा. शि.*] ० ~ । श्रीरामचं । द्रचरण नील । कंठ सोनदे । व शरण

अभयपत्र समस्त राजकार्यधुरधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री रामचंद्र पडित अमात्य ताा चापसेट सेटिया व भानसेट पटणसेट व समस्त माहानाड व बकालउदमी व बाजे रयानी कसबे पाा वाई सुहूर सन इसने तिसैन व अलफ तुमचे बाबे देशमूख व देशकुलकर्णी पाा मजकूर किले साताराचे मुकामी हुजूर येउनू विनति केली की धामधुमेच्या प्रसगे कसबे मजकूरचे वाणी उदमी बाजे रयत ताा मेढे सुबा व्याघ्रगड येथे येउनू राहिले होते ते जागा अनुकूल न पडे म्हणउनू प्रात मजकुरी वा आपली समतेस येउनू राहावे वाईस गनिमाचे ठाणे आहे तोपरियेत दुतर्फा कौल घेउनू उदीम प्रवर्त करायाची आज्ञा केली आणि कौल सादर केला होता ऐशियास प्रात मजकुरी येउनू राहावे तरी गनिमाची धामधूम बहूत आहे देशातील घाट समीप लागले आहेत उदीम प्रवर्त चालणार नाही यानिमित्य येता न ये तरी स्वामीने ताा कुडाल थे माहाली हर येक जागा राहायाची आज्ञा केलियाने ते जागा राहोन उदीम प्रवर्त करितील म्हणउनू त्यावरून हा कौल दिल्हा असे तरी तुम्ही कोणे बाबे शक न धरिता ताा कुडाल येथे येउनू घर बाधोन उदीम वेवसाऊ करून सुखरूप राहाणे साल मजकुरी तुम्हास वणी घर टका व मोहतर्फा तुरकस फाला माफ केला असे साल मजकुरी कांही न देणे पेस्तर नख्त बाब कमाविषमुळे जो आकार होईल तो जोवरी गनिमाचे ठाणे वाईस आहे तोवरी दुतर्फा वसूल देउनू जिकडील तिकडे यैवज देणे आणि सुखरूप राहाणे ये बाबे कौल असे [नि*] छ ७ रबिलौवल [नि*] निदेश समक्ष [लं. व. मो.*] लेखन । सीमा समु । लसती

बार सुरू सुद बार

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. ५ आलमगिरी जु. ४१ रबल १७	५ [वा. फा. शि.*]	श. १६१९ आश्विन वद्य ३ इ. १६९७ सप्टेंबर २३

जबदतुल इमसाल शामजी लिगोजी देसपाडे व गिरमाजी झुगो देसपाडे पा। वाई सरकार पनाला सुभे दारुलजफर बिजापूर चिदानद तुम्ही आपले हकीकत जाहीर केले जे पादशाही कामावरी आपण हाजीर आहो आपले पोटाचे सरजाम जाहल्या खातिरजमा पा। मजकूरचे आबादी करून किफायेत सरकारचे करून दौलतखोही जाहीर करू म्हणोन कितेक आपले पेरोशनी हकीकत जाहीर केलेवरून मालूम जाहले येसियास तुम्हास हुजुरून पादशाह मेहरबान होऊन सनद इनायेत केले ते बमोजीब पेशकसी देऊन ब मोजीब सनद आपले हक व इनाम गाव खाऊन खातिरजमासी पादशाही कामावरी रासदुरस्त राहून परगणे मजकूरचे आबादी करणे जेणेकरिता तुमचे दौलतखोही जाहीर होये व बेहबूदी होये ते काम कीजे मामला पादशाही आसे खातिरजमासी काम पादशाही जाबितेमाफीक कीजे दरी बाब कौल दानद तारीख १७ माहे रबिलोवल सन ४१ जुलूसवाला

ले. ६ सु. १०९८ रजब १६	६ श्री	श. १६१९ माघ वद्य ३ इ. १६९८ जानेवारी १९

[आरंभीं व शेवटीं ले. ४ प्रो शि. व मो.*]

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर... ... राजमान्य राजश्री रामचंद्र पंडीत अ[मात्य ता। कमा] विसदार जकात व बाजे अमदरफ्ती क...मेस्वर तहद वाई सु॥ समान तिसैन...सेटी सेख्या याणें कोकणांत कुण...न वाईस जात आहे तरी वाटेस कोण्ही याचे [न] जाणे [नि*] छ १६ रजब निदेश समक्ष

ले. ७ फ. ११०८ सफर २१	७	श. १६२० श्रावण वद्य ७ इ. १६९८ ऑगस्ट १८

[आरंभीं उजव्या अंगास वा. फा. शि.*] याफ्त आलम शर्फ ११०२ शाह ! मीर !

इजतआसर पिलाजी देसमूख वा शेमजी पडित देसपाडे बआफयेत बाशेद सुरु सन११०८ माळूम दानद दरी विले तुम्ही आम्हास न पुसता उठऊन गेला काये समजला आहे आम्ही तुम्हास काये करीत होतो बगर पुसता उठाऊन गेले औखेर काम आम्हासीच आहे येकीन समजले पाहिजे आता परगणे मजकुरासी इजतआसर हरी आनदराऊ वा नरसो त्रिंमल कारकून आले आहेत तरी जामीदारीसी रुजू करऊन देविले पाहिजे कागदपत्रहि देवणे जेबिता कचेरीमाफीक देवणे दीगर तुम्ही आम्हासी कारार केला

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

होता ते सारजमे करऊन सिताब पाठऊन दीजे उजुर खोही न कीजे आलचते हे काम करऊन देवणे दरी बाबे ताकीद जाणिजे मुर

तेरीख २१ माहे सफर

पौ छ ५ पचवा माहे रबिलौवल आले

ले. ८ सु. १०९९ } शाबान १५ | ८ श्री | { श. १६२० माघ वद्य २ इ. १६९९ फेब्रुवारी ६

राजमान्य राजश्री गगाजी शकर व शामजी लिंगोजी व गिरमाजी झुगो गोसावी यासी

सेवक रामचद्र नीलकठ नमस्कार सुा सन तिसा तिसैन अलफ मौजे माहुली हा गाव भटास अग्रहार करून दिल्हा आहे त्यास गनिमाकडील खडणी गत वरुसी जाली आहे त्यास दोनिसे रुपये जाजती घातले आहेत म्हणून वर्तमान कलो आले तरी (?) हे गोस्टी तुम्ही तेथे असोन कैसें कलीत आम्ही गाव ब्राह्मणास दिल्हा असतां तुम्ही गनिमाकडील जाजती खडणी कैसे बैसविली याउपरी न्याहारखानास पत्र पाठविले आहे ते देऊन जाजती खडणी बैसविली आहे ते दूर करून गुदस्ताप्रमाणे खडणी करणे जे गोस्टीने ब्राह्मण स्रम न पावत ते गोस्टी करणे येविसी आतर पडिलियाने तुम्हास बोल लागेल जाणिजे तुम्ही व रा प्रल्हाद वा मुतालीक देशमूंख यालाही सागोन खडणी जाजती नव्हे ते गोस्टी करणे जाणिजे [नि*] छ १५ शाबान निर्देस समक्ष [ले. ४ प्रो ल. व. मो.*] सुरू सुद

ले. ९ फ. ११११ } रवल १ | ९ [फा. शि. व ४ ओ. फा. मज.*] | { श. १६२३ श्रावण शुद्ध २ इ. १७०१ जुलै २६

जुबदतुल इमसाल सूर्याजीराऊ पिसाल देसमूख व शामजी लिगोजी देशपाडे पा वाई सा नबीशाह दुर्ग उरुफ पर्नाला सुभा दारुलजाफर विजापूर सुरू सन ११११ चू दरी विला तुम्हा बाबे इजतआसार रामाजी रुद्रो सेखदार पा मजकूर येऊन जाहीर केले जे जेमीदार मजकूर कामावरी बहूत मुस्तकीम राहून काम पादशाही चिलाउजूर चालविताती म्हणून हुजूर जाहीर केले तरी तुम्हासी येसीची पाहिजे तुम्ही जेमीदार मातबर आहा: कोणे बाबे उजूर न करिता खातिरजमा राखून काम पादशाही चिलाउजूर चालवीत जाणे व इजतआसार रामाजी रुद्रो यासी साल मजकूर बदस्तुर साबिक बहाल करून पाठविले असे यासी रुजू होऊन पादशाही काम करीत जाणे व पा मजकुरीचे लावणी सचणी किर्दी मामुरी करविने व साल गुदस्तेचे खाजानेचे पैसे सिताब बेबाक करून पाठविने जाणिजे मो सुद

तेरीख १ माहे रबिलोवल

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. १० आलमगीरी जु. ४५ फ. ११११ शाबान २६	१० [अलिफ*]	श. १६२३ पौष वद्य १२ इ. १७०२ जानेवारी १४

[आरंभीं उजव्या हाताच्या कोपऱ्यांत ' सनह ११**१**२ सनह ३४ आकिल मुहम्मद फिद्वी बादशाह आलमगीर असा वा. फा. शि. व ' झुब्दतुल अकरान सूर्याजी देसमूखह व स्यामजी देसपान्दियह पर्गनह वांई बमज्मून हिन्दवी अमल नुमायन्द बतारीख २६ शअबान सनह ४५ जुलूसवाला ' असा फा. मज.*]

जबद्‌तुल येकरान सूर्याजी देशमूख व स्यामजी देसपाडिये परगणे वाई सुा सन हजार ११११ मालम दानद आ के जाहीर जाले जे तुम्ही गुमास्ते करोडीस म्हनता जे तुम्ही उठून जाने जागीर फौजदारास जाली तरी तुम्ही यैसी कामे फिसादची करिता व फौजदारास मिळून पटिया करून बादशाही माल तफरका करिता हे खूब नाही पहिले दोनी तीन मार्तबे तुम्हास लिहिले असे परंतु तुम्ही त्यावरी अमल न केला हाली मुफसदीचा नतीजा पावाल तमाम बादशाही पैसियाचा जौबू तुम्हाहाती करऊन जे जे तुम्ही करिता त्याचा नतीजा बवाकई पावाल आपन या चौ रोजात स्वार होऊन परगणे मजकुरास पोहोचतो मालूम होये आपली बेहबूद चाहून पातशाही कामात सरगरम होने दरी बाब ताकीद जानिजे मोर्तबू सुद रयेत या मालमहसूल तफरका जालिया तुम्हास जौबू करने लागेल बादशाही मामला आहे वरच्या वरी न जाईल दरी बाब ताकीद जानिजे मोर्तबू

तेरीख २६ माहे साबान सन ४५

गुमास्ते करोडियासि तुम्ही बेदखल केले आन उठून जाने मागून तुम्ही त्यासि अनता गुमस्ते करोडियाने लिहिले आहे तरी तुम्ही आपली बेहबूद न चाहून यसा फिसाद केला आहे नतीजा नेक न होईल परगने मजकूरचे जमा रुपये चालीस हजार इनायतुलाखानने मोककर केली आहे याचा जौबू तुम्हाहाती करऊन तुम्ही आपली हमा बेहतर जानत असा मंदनगडातली जो हाल तुम्हावरी गुजरला तो याद असेल जानोनी ख्वाब खरगोसी न करने मोर्तबू

ले. ११ आलमगीरी जु. ४५ फ. ११११ शाबान २७	११ [अलिफ*]	श. १६२३ पौष वद्य १३ इ. १७०२ जानेवारी १५

[फार्सी मजकुराच्या उजव्या अंगास ' ११०१ आकिल सनह ३४ । मुहम्मद । फिद्वी बाद । शाह । आलमगीर ' असा वा. फा. शि. व ' स्यामजी देसपान्दियह पर्गनह वांई बमज्मून हिन्दवी अमल नुमायन्द बतारीख २७शअबान सनह४५'असा फा.मज.*]

शामजी देसपाडिये पाा वाई सुा सन ११११ मालूम दानद आ की तुम्ही आपली हमा जानतनाई फिसादचे कामात मिळून बादशाह काम बंद केले बवाकई तंबी पावसील जनबचेसी खराब होसील आपली हमा आयेकिली असेल ख्वाब खरगोसी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

न करने आपन चौ रोजात स्वार होऊन परगणे मजकुरास पोहचतो माल महसूल या रयेत तफरका जालियालि असेल त्याचा जौबू तुम्हाहाती करऊन दरी बाब ताकीद जानिजे [नि*] मोर्तबू सुद ताो छ २७ साबान सन ४५

ले. १२ आलमगीरी जु. ४९ फ. १११४ सफर २७	१२ [अलिफ*]	श. १६२७ ज्येष्ठ वद्य १४ इ. १७०५ जून ९

[अस्पष्ट फार्सी शिक्का व ' बमूजब हिन्द्वी अमल नुमायन्द ' असा फा. मज.*]

जुबदतुल येकरान दताजी नाईक देसमूख व {व} शामजी व गिरमाजी देसपांडिये पा वाई सुाा सन हजार १११४ मालूम दानद आं के तुम्ही अर्जदास्त पाठविली हकीकती मालूम जाली लिहिल कीं गला वगैरे सरजाम करून पाठवितो तर सिताबी पाठवणं व गौऊगणां रयेतीचा दिलासा करून लावणी करविली बहूत खुब केलें येक विस्वा जमीन पडों न देण दरी बाब ताकीद जानिजे व मकेचे फड वगैरे जे तयार होत जातील ते मसीखत पनाहा सैद (सेख) माा इभराईम व भगवंत पंडीत यांचे मारकार्तीने जरीब करून सिरिस्तेमाफीक पैसे खजाना दाखल करणे दरी बाब ताकीद जानिजे व सैद इसमाईल डाली घेउनू आला ते पावली [नि*] असे मोर्तबू सुद्

[फार्सींत*] बय्जह बय्जह दीगर कीं तुम्ही गलियाचा करार पंधरा दिवसात पाठवितो म्हनऊन केला पंधरा दिवस जालेत झडी लागला तरी गला मवकूफ केला गलियाचे पैसेच घेऊन सिताबी पाठवने गला येथे घेतला जाईल दरी बाब ताकीद जानिजे मोर्तबू

तेरीख २७ माहे सफर सन ४९ जळूसवाला

[निराळ्या अक्षरांत व तारखेच्या नोंदीवर*] छावनी बरी केली दोनी नक्षत्रे गुजरून गे[ली] हनोज ... पिसावी छावनी होत आहे बरसात निघालिया छावनीची तयारी होईल

ले. १३ रबिलावल १७	१३ श्री [नि*] अई अदिपुरूष	श. इ.

राजश्रिया विराजित राजश्री भीमराव गोसावी यासि

पोष्य परशराम त्र्यंबक नमस्कार उपरि येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करणें यानंतर राा रुद्राजी लिंगोजी व शामजी लिंगोजी देसकुलकर्णी पाा वाई हे ताब्रांच्या उपद्रवाकरितां गेले होते सांप्रत दर्शनास अमच्या आले होते यास आज्ञा देऊन पाठविलें असे हे अपली मुलेंमाणसें देखील वाईस येऊन राहतील ते सुखरूप राहूं देणे त्यांस कोण्ही अजार लावील तरी अजार यांस कोणेविशी [पाठीवर*] चा लागों न देणे जाणिजे छ १७ रबिलौवल [नि*] लोभ असो देणे हे विनती

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. १४ सु. ११०६ } सवाल २५ }

१४
श्री

{ श. १६२७ माघ वद्य १२
{ इ. १७०६ जानेवारी ३०

[पाठीवर मजकुराच्या डाव्या अंगास आरंभीं ले. ४ प्रो लं. व. शि.*]

राजश्री जोत्याजी सालोखी हवलदार व कारकून किले कल्याणगड गो

दं अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्रीा रामचंद्र नीलकंठ आमात्य आसीर्वाद आा नमस्कार सुहूर सन सीत मयां अलफ कसबा वांई मुजेरी व मोहतर्फा देखील खासगत थैवजी मुकासा आहे त्यास तेथील वाणीउदमी बुधास व रहिमतपुरांस उदमांस जात असतात त्यास तुम्हीं भदरग्याचा उपद्रो करून ठाण्यांस उपद्रो देतां पेठेस कोणी वाणी }जि{ जिनस घेऊन येतों त्यास भदरग्याचा उपद्रो केलिया मार्ग पडतों थैसियासि कसबा माार हा गाऊ आमचें खासग[त*] थैवजी आहे हें तुम्हास ठाऊक असोन नसते क्षुद्र उपद्रो करून गावास अजार द्यावा हे तुम्हांस उचीत की कार्ये या उपरी थैसी गोष्ट करीत नव जाणें सुखरूप वाणीउदमी येतील-जातील त्यास भदरगियाचा येकदर उपद्रो न करणें येविसी राजश्री स्वामींनीं तुम्हात आज्ञापत्र सादर केले आहे त्यावरून कलेल तुम्हीं आमचे म्हणविता निष्ठा दर्शविता ते कार्ये ये रीतीची आहे की कार्यें बरें याउपरी तन्हीं येकदर थैसी गोष्ट न करणें फिरोन बोभाट येऊ न देणे जाणिजे [नि*] छ २५ सौवाल [नि*] निदेश समक्ष [ले. ४ प्रो लं. व. मो.*].

ले. १५ सु. ११०६ } जिल्काद ९ }

१५
श्री

{ श. १६२७ फाल्गुन शुद्ध ११
{ इ. १७०६ फेब्रुवारी १२

राजश्री जोत्याजी सालोखी हवालदार व कारकून किले कल्याणगड गोा

दं अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्राो परसराम त्र्यंबक प्रतिनिधि आसीर्वाद व नमस्कार सुहूर सन सीत मया व अलफ कसबा वाई राजश्री रामचंद्र पडीत अमात्य याकडें मुकासा आंहे तेथील वाणी-उदमी व रयता हाट-बाजारांस जात-येत असतील त्यास जकात घेणे ते जकातीचे कमावीसदार घेतील तुम्हीं वाणी उदमी [पाठीवर ' ० ~ श्री आई आ । दि पुरुष श्री राजा । शिव छत्रपतीं स्वामी । कृपानिधि ॥ तस्य प । रशुराम त्र्यंबक । प्रतिनिधि ' असा अष्ट. शि. व नंतर*] रयत याचे वाटेस नव जाणें हर येक बाबें कसबेयास उपसर्ग न लावणे फिरोन बोभाट येऊ न देणे जाणिजे छ ९ जिल्काद [नि*] निदेश समक्ष ['राजते । लेखना । वधी ' असा मो.*]

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. १६ सु. ११०६ } १६ { श. १६२७ फाल्गुन शु. ११
जिल्काद ९ } श्री { इ. १७०६ फेब्रुवारी १२

[३ व ४ या ओळींच्या डावे अंगास समासांत ले. १५ प्रां शि.*]

र्द मा। अनाम बावाजी सिंदे देसमूख पा। कुडाल यांसि परसराम त्र्यंबक प्रतिनिधि सुहूर सन सीत मया व अलफ कसबा वाई येथील रयेतां येऊन मौजे आखाडे ता। मजकूर येथे येऊन राहिल्या आहेत ऐसियास कसबा राजश्री रामचंद्र पडीत अमात्य याकडे मुकासा आहे तेथील रयता दुसरे गावां ठेवाव्या ऐसी गोष्टी नाही यास्तव त्या रयतांस कसबे मजकुरास न्यावयाची आज्ञा केली आहे कसबेकरी येऊन-समजाऊन नेतील त्याचे हाती तुम्ही देणे येकंदर ठेऊन न घेणे फिरोन बोभाट येऊ न देणे जाणिजे छ ९ जिल्काद [नि*] निदेश समक्ष [ले. १५ प्रां मो.*]

सुरु सुद

ले. १७ फ. १११६ } १७ { श. १६२८ कार्तिक शुद्ध १२
शाबान १० } [वा. फा. शि.*] { इ. १७०६ नोव्हेंबर ६

इा आा जुबदतुल आमासिलवल येकरान दताजी ना। देशमूख व शामजी व गिरमाजी देशपाडिये पा। वाई सु॥ सन १११६ मालूम दानद की तुम्ही आर्जदास पाठविली हकीकती मालूम जाली काम पातशाही आहे तरी महमद इभराईम व तुम्ही मिलोन पातशाही कामकाज करीत जाणे आजी टका-पैका वसूल करने यामधेच तुमची खुबी आहे तरी कामकाजास मातल न कीजे दरी बाब ताकीद तमाम जाणिजे छ १० माहे शाबानी साप गढीस आलो येकदो रोजामधे वाईसही येऊन पोहचतो दरी बाब ताकीद तमाम जाणिजे

ता। १० माहे शाबान

पौ। छ १२ माहे साबान पहर पहिला मु॥ वाई

ले. १८ सु. ११०८ } १८ { श. १६२९ ज्येष्ठ वद्य ३
रवल १७ } श्री { इ. १७०७ जून ७

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री माणको गोविंद व राजश्री अणाजी जनार्दन सुभेदार प्रां वाई गो। यास

सेवक परशराम त्र्यंबक प्रतिनिधि नमस्कार सु॥ समान मया अलफ रा। रुद्राजी लिंगोजी व शामजी लिंगोजी देसकुलकर्णी पा। मा।र हे तांब्राच्या उपद्रवाकरितां गेले होते त्यास हाली अमच्या दर्शनास आले होते आज्ञा देऊन पाठविले असे तरी हे अपली मुलेमाणसे सहवर्तमान कसबे मजकुरी राहतील त्यास हर कोण्ही यांस उपद्रव देईल तरी त्यास कोणाचा उपद्रव लागों न देणें सुखरूप राहूं देणे जाणिजे छ १७ बिलोवल [नि*] निदेश समक्ष [ले. १५ प्रां. मो.*]

[नि*] सुरू सूद

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. १९ } १९ { श.
पौ रवल ४ } हु { इ.

[आरंभीं उजव्या अंगास लं. अस्पष्ट फा. शि. व ' बमूजब हिंदवी अमल नुमायन्द ' असा मज.*]

जुबदतुल येकरान दताजी नाईक देसमूख व शामजी व गिरमाजी देसपाडिये पा वांई माळूम दानंद आं कीं अर्जदास्त पाठविली पोहोचोन मजमून मालूम जाला लिहिलं कीं पातशाहापुरास सिलेमानखानाची फौज आली आहे वंदनास जकीरा पोंहचावयासि येताती फौजेच्या दहशतीकरतां लिहिलं होतें तरी पदाजी व कलबअली येउनू यांही जकीरा वंदनास पोहचाउनू पदाजी बुदास आले व कलबअली कराडास गेले तुम्ही आपला खातिर जमा ठेवणे व गलियाचे रवाना करायाचा उजूर वाटेचा व पावसाचा लिहिला होता तरी आम्हीं तुम्हांस दिरंग लागला याबदल येथ गला खरीद केला तेथून गला धाडावा हाजत नाही गलियाचे यैवजाचे पैके बेगीने पाठउनू दीजे व साडेच्यार हजार रुपयाचे बाबे सिवरामपंडित ताकीद करितातीं तरी पैसे मौजूद करून त्यांचे मारफातीन येथ पोहचावणें येक शायेत मातल न कीजे दरी बाब ताकीद जानिजे व तुम्हीं आंबियाचा करारदाद तुम्ही आम्हासी केला होता त्यामधे काहींच पावले नाहीत माळूम होये व यैवज कोठ कोठ आहे हेंही माळूम होत नाहीं तुम्ही आपले गोस्टीला खबरदाहार राहाणे व दोनसे आंबियाची डाली सैद (?) इभराईम पाठविली होती ते पावली व विज्यापुरास दिवाणांस पाठवायासि आंबे खूब तीनसे बोरेशी (?) मोठा असल पाहोन पाठविजे वाटेन पोहोचायाबदल हिरवे पाहिजेत तरी असल पाहोन अगर विकत मिलतील अगर जैसे जाणाल तैसे तलाश करून पाठविजे जरूर जरूर आहे म्हणौउनू लिहिलं आसे आंबे तेथ तोडाल ते दुसरे रोजी येथ पोहचे यामधें तुमचा मजुरा फार होईल आम्ही तुमच्या भरसियान आहे अगर यासि दिरग जाला तर तुम्हावर दिलगीर होउनू आंबे सरजाम करून पाा

पौ छ ४ रबिलावल

ले. २० } २० { श.
पौ रखर २० } { इ.

राजेश्री सुरयाजीराऊ देसमूख व शामजी पडींत देशपाडे गो

ार्द सर्वउपमायोगये आखडित लक्ष्मीआलकृत राजमान्ये [मो. जा.*] स्नो भूपतसिग ताहवेलदार सरकार परनाले वगैरे राम राम विनति उपरि तुम्ही परगणेमधे साह हजार रुपये करोडीस करून दिले त्यापैकी तेरासेहे रुपये खजानेस यैवज करून तुम्ही आपले नाव रोखा लिहून दिले त्यास वाइदा होऊन किती रोज जाले हनोज विले करून दिले नाही आतां यैलकडे औकितो की सदरहू पैके करोडीस

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तुम्ही देता म्हणौन येसियासी हे पैके पादशाही खजानेचे आहेत तुम्हासी येकदर सुटणार नाही तुम्ही येकदर करोडीस रुका ने दीजे आगर दिलियां तुम्हास खुदनिसबत देणे लागेल हे येकीन समजणे या पैकेबदल हुजुरून हुकूम न्याहरखानाचे नावे काडविले आहे हुकूम घेऊन च्यारी रोजामधे तुम्हापासी येतो तुम्ही पैकेचे फिकिरेमधे राहणे विषश काये लिहिणे जाणिजे हे विनति

पैके जमा करून तुकोर्जी मुलासेचेथे ठेवणे जाणिजे हे विनति आणि माहमद शरीफ पाठविले आहे यासी रुपये १८ येक देविले आहे पावत कीजे गई न कीजे जाणिजे हे विनति

पाा छ २० रबिलाखर

[उपांत्य ओळीचे डावे अंगास 'भूरतासिन्व४१सिवसहाये १११२' असा बदामी फा.शि.*].

ले. २१ जखर ५ } २१ हु {श. इ.

[फा. शि. व मज.*]

जुबदतुल येकरान दताजी नाा देसमूख व शामजी व गिरमाजी देसपांडिये पाा वांई उमेदवार इलतिफात बूदे बिद्वानंद आं की अर्जदास्त पाठविली पोंहोंचोन हकीकती माळूम जाली लिहिलं कीं मीर आतश व खान बहादुर या तरफेस येतात ये बाबे जो हुकूम तरी विठोजी पाा व चाजी पाटील यांही मुफसल लिहिलं आहे त्यामाफीक अमलामधें आणंन कोन्हे बाबे उसवास न धरणें आपलं खातिर समाधान आसो देने कांही फिकीर न कीजे व सरजाम तमाम मौजूद करवन घेऊन येन कीं हे वेल नाजूक आहे दरी बाब ताकीद जाणिजे माो सुदू व दीगर कीं जे पैसे मौजूद केले असतील ते आपले बराबर घेऊण येणं कीं येथे खर्चास जरूर आहे जानिजे मोर्तब सुद [बैजा*]

तेरीख ५ जाखर

ले. २२ पाौ जखर २२ } २२ {श. इ.

[आरंभीं उजव्या अंगास '१११- अबद मुहम्मद मुरीद बादशाह अलमगीर घाझी... ' असा फा. शि. व 'झुब्दतुल अकरान दताजी केसवजी देसमूख पर्गनह बांई बमूजब हिन्दवी अमल तुमायन्द' असा फा. मज.*]

जुबदतुल येकरान दताजी नाईक देसमूख व देसपाडिये पाा वांई उमेदवार बूदे बिदानद के नवाबूसाहेब व किबिले तरबियेत खान बाहादुर याहीं पाा मजकूर बमोजीब हुकूम हुजूर खालशामधे येऊन किले सातारा व परली व बसतगड व राजगड याचे जखीरा व अहशाम याचे सरजामास पैसे देविले आहेत आनी आहेदी तीरनदाज

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

व बरकनदाज वगैरे यासी तनखा मना केली आहे तर येक दाम त्यास न देने आनी तहसील सिताची करून पैसे पोहचावण वायेदे च्यार होउनू गेले आनी हनोज वसूल देत नाही हाली ताकीद जाणऊण सिताची तहसील करण दरी बाब ताकीद जानिजे

पौ छ २२ जमादिलाखर

ले. २३ } रजब २६ — २३ — { श. इ.

श्रीशंकर

[वा. फा. शि.*]

रा दताजि देसमूख व देसपाडिये पा वांई यासि रा चंदाजी राजे जाधवराऊ [मो. जा.*] लेहावया कारणे येसे जे [मो. जा.*] खानसाहेयास फौवजदारी व जागीर दरोबस्त जाली आहे तर तेथील दाम-दिरम तजावत व तफावत जालियाने येका रुक्याचे अकरा रुके देने लागेल तुम्ही शाहाने आहा लिहिने नलगे छ २६ रजबू

पौ छ २७ रजब साजेस पोहचले

ले. २४ } — २४ — { श. इ.

खाने अजम बुन्हानखान गोरी भाईसाहेब सलामत

छ. मोहिबानपन्हाही मखलिसानदस्तगाही अजी सादतुलदिल येकलास गिरमाजी झुंगो देसपांडिये पा वाई सलाम वाजत सलाम महवलभुराद अंकी येथील खेरसला जाणून मोहिबी आपली खूषखबर बकलमे इशारती फर्मावणे दीगर आम्ही विशालगडास जाउनू आपले वतनाचे मामला ये तरफेने दुरूस करून घेतला हे खबर मोहिबी येकिली असेल मोहिबाचे वर्तमान गोदजी पाटिलाने सागितले त्यावरून मालूम जाहाले तुमचे कष्टाचे आम्ही वाटेकरीच आहो हजरत [मो. जा.*] साहेबी मेहरवान होउनू वतनाचे मामला आमचा चालवितातो आमा ये तरफेने सनदपत्र करून घेतली आहे भटास दूर केले त्याप्रो तिकडील सनद जाली पाहिजे तरी साहेबी अर्ज करून परवाना करून देविला पाहिजे हुजूरचा परवानेमाफीक वतन चालते ताजा परवानाही देविला पाहिजे हजरत [मो. जा.*] साहेबाचे खिजमतेस काही आम्हापासुनू तकसीर जाली नाही शामजी लिगोजी बदगीस आहे त्यावरी मेहरबानी करीत जाणे याचे जाब पाठवणे प्यार मोहबत राखणे हे किताबती किताबती

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. २५ सु. ११११ रमजान २१ } २५ श्री { श. १६४० श्रावण वद्य ८ इ. १७१८ ऑगस्ट ८

[आरंभीं डावे अंगास '० श्री ॥ राजा शाहु छत्र। पति चरणी तत्पर। फतेसींग भोसले। राजकुवर' असा वा. शि.*]

दं मशरुल आनाम देसमूख व देशपांडिये पा वाई देखील जोर खोरें व जाबूल खोरें यांसि फतेसिग भोसले सुहूर सन तिसां अशर मया अलफ स्वराज्यांतील ठाणी देखील मोगलाई अमल पादशाहानी स्वामीस बहाल केला त्याच्या सनदा नवाब अमीरल उमराऊ याच्या अहेत त्यावरून हा मामला आमचे स्वाधीन जाहाला अहे तरी तुम्ही पा मजकूरपैकीं नजर रुपये २०००० वीस हजार हुजूर घेऊन येणे या कामास [नि*] या कामास रवलोजी माने व सुभानजी पवार व भानजी पवार मसाला रुपये दर ३ येकास ... देविले असे आदा करणें [नि*] जाणिजे [नि*], छ २१ रमजान [नि*] मोर्तब सुद [पिं. पा.*] मोर्तब सुद

बार

ले. २६ रखर ८ शनि } २६ श्रीशंकर प्रसंन { श. १६६० श्रावण शुद्ध १० इ. १७३८ जुलै १५

तीर्थस्वरूप राजश्री अन्या वडिलांचे सेवेसी

अपत्यें भाऊने सिरसाष्टांग नमस्कार विनंती उपेरी येथील वर्तमान ताा छ ८ रबिलाखर शनवार मुाा लश्कर गौरवाड येथे सुखरूप असों राजश्री स्वामीनी वेलावीच्या स्वारीस चव्हाणाच्या शाहावरी पाठविले होतें चव्हाण अथणीस गेलिया उपेरी अज्ञा अली कीं रठरें येथें दोन तोफा अल्या अहेत त्या घेऊन येणे त्या हुकुमावरून छ मजकुरी तोफा घेऊन लश्करांत अणून रुजू केल्या अपणास जोताजी घोरपडे याजबााा पत्र पाठविलें ते पावले त्याजवरून सविस्तर मजकूर कलों अला असेल हुजूरच्या पथकांस अम्हापासून रोजमुरा देविला त्याजमुलें येवज फारीख होऊन कर्जदार जालों अतां कर्जही येथे मिलत नाही तुम्हास येक दोन वेलां लिहिलें कीं पोख्ती बेगमी करून पाठविली पाहिजे परंतु चितांत न अलें आम्ही तों येथे उपवास करीत बैसलों अहों याजउपेरी तऱ्ही खर्चास पाठविलें पाहिजे म्हणजे स्थीत राहील नाही तरी चेरा जाला अहे गुमटावरी छ ४ रबिलाखरीं मगलवारीं निशान चढलें राजश्री शामराव व राजश्री अपाजी माने येऊन भेटले राजश्री संभाजी माहाराजांचा बहुत अत्यग्रह होता कीं कापून काढावें परंतु माहाराजांनी हत्यारानसीं प्यादे व माणसं सोडून दिल्ही निमे गला त्यांचा त्यासी दिल्हा राजश्री शामराऊ व राा अपाजी माने यासी पोषाख व कडीं देऊन सिपारस करून राहविले येथून तासगाव व अथणी येसी बोलवा अहे परंतु काण्हेकडे जातील ते कलत नाही तूर्त येथून कूच होत नाही

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

मुकाम अहे तुम्हापासील मातबर राऊत अहेत ते पाठवून देणे म्हणजे वरकड राऊत रवाना करून गोकुलाष्टमीचा पैका पाठवून दिल्हा पाहिजे दरमाहेच्या पैकाच्या निकडी जाल्या अहेत लिंगुबाईने तों बहुतसा तगादा केला अहे याचा काये तो विचार करून अज्ञा केली पाहिजे वडिलांस विशेष ल्याहावे येसे नाही [नि*] बहुत काये लिहिणे सुलतानजी पवार याजपासी तेथे चाकरी घेणे खानू डागे याची घोडी चोराने नेली माग तासगावास गेला कलावे म्हणऊन लिहिले असे तर पैकियासाठीं निकड येथे फार जाहाली अहे तर लवकर पाठवणे रुपा लोभ असो दीजे हे विनती

ले. २७ }
जखर १७ गुरु }

२७
श्री

{ श. १६६० अ. आश्विन वद्य ४
{ इ. १७३८ सप्टेंबर २१

तीर्थस्वरूप राजश्री आन्याबा वडिलांचे सेवेसी

अपत्ये शामाने चरणावरी मस्तक ठेऊन सां नमस्कार विनंति ताा छ १७ जमादिलाखर गुरवारपर्यंत मुा तासगांव वर्तमान कुशल असे विसेष सिदोजी भोसला याबराबर पत्र पाठविले ते [पावले] लिहिला माार कलला दरबारचा माार [तरी] राजश्री [मो. जा.*] पंत प्रधान यांनी आगोधर तासगावास येऊन गावाजवली राहून मोर्चेबंदी केली ते दिवसी राजश्री [मो. जा.*] पंतप्रधान यांकडील येक भला माणूस पडिला रा रघोजी भोसले पाठीमागून येऊन त्याजवली बाणाच्या टप्यावर मालावर राहिले येसाजी सिंदे यांनी अंतस्ते राजश्री [मो. जा.*] राव प्रधान याची भेट घेतली त्याचे त्याचे इमानशफत जाली त्यांनी ठाणे द्यावे यानी माहाराजांच्या पायावर त्यांस घालून त्यांच्या हुकमे पदरी घेऊन त्यांचे बरें करावे येसे केले रोज माणसे त्यांची यांची खेलों लागली नावास मात्र मोर्चे दिल्हे असत हे वर्तमान राजश्री [मो. जा.*] स्वामीस विदीत जाले त्यास माहाराजाच्या चितात गेले की आपणास भेटला नाही आण यांच्या हाते भेटतो तरी ही गोष्ट घडत नाही राजश्री राव प्रधान यास सागोन पाठविले की तुम्ही मोर्चे उठऊन अथणीस जाऊन अथणी घेणे अम्ही भोसले आहो तितके गरीच { गरीब } तासगाव घेऊ म्हणऊन वरचेवर हुकूम पाठवीत येसाजी सिंदा त्यास म्हणे की तुम्ही यातोंपर्यंत आपण ठाणे दिल्हे नाही तुम्ही आलियावर तुमच्या हाते बरें करून घ्यावें मग ठाणे द्यावें म्हणऊन मार्ग पाहात होतो तुम्ही आलियांवरी आपणास इमान दिल्हे आणि टाकून जातां तरी पायांने ढकलून जाणे म्हणऊन बहुत बजीद जाला तेव्हा यास संकट प्राप्त जाले धणी आइकेना यास इमान दिल्हे तेव्हा वरचेवर लस्करात कागदपत्र पाठवीत कूच त्वरेने करीनात त्या उपरी दर्याजी नाईक आला की राजश्री [मो. जा.*] रायाचे डेरे पाडून कूच करऊन अथणीस पाठवणे त्यावरून रा माहादोबास रातोराती पाठऊन तेथे राजश्री स्वामीस कितेक सागोन माहाराजास तासगावास आणिले रा नारबावाही आले येथे मनसबा काली बुध[वारी] करून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तासगाव राजश्री पंतप्रधान यानी घ्यावे अथणीस रा रघोजी भोसले व रा राव प्रतिनिधि यांनी जाऊन फते करून घ्यावे यैसा इत्यर्थ केला आण निघोन गेले तासगाव आलिया दाखलच अहे निशाण चढले म्हणजे कार्यसिधी जाली गुंता उरला नाही रा रावप्रधान निशाण चढवितील तेव्हा चढेल रा रघोजी भोसले याचे अजी कूच अहे अथणीस जातानी आपणास कलावे याकरिता लिा अहे आपण आपले पथक सजून देऊन रवानगी केली त्यास रविवारी दर्शन जाले त्यास ते बहुत आजुर्दे जाले की शंभर रावतांची चोली केली पंचवसि खासा आणवासा केला आण त्यांत येक माणूस नाही च्यार गोला करून आणिले म्हणऊन श्रमी अम्ही खटसाऊन सांगतों परंतु कोणत्या ग्रहस्तानी येथे आहेत त्यांनी त्यास पुर्ती गोष्ट बिंबिवली आहे की यांत कोणी माणूस नाही च्यार ब्राह्मणाची घोडी जमा करून आणलां अहेत म्हणऊन सागितले त्यावरून अम्ही उदंड सांगतो परंतु त्याच्या चितात गोष्ट भरत नाही माणूस दि... दिसत नाही आतां प्रसंग यैसा जा[ला] की माणूस दिसाऊ पाहिजे काम काज पडेल तेव्हां पडो लस्करास रोजमुरा पांचा सां रोजा देतातो तो शंभर स्वारास पंचवसि रुये देतातो रविवारी आम्हास पंचवीस रुये दिल्हे त्याउपरी च्यार रोज रोजमुरा नाही नूरखान शाहाजी कदम यास व कोन्हेरपंत यास सागतो खाशास हटकितो परंतु काम होऊन येत नाही रोज खर्च काये बसतो तो विदितच अहे पुढे काये करावे च्यार सिलेदार दिसाऊ ठेवलिया खेरीज स्तीत राहातां दिसत नाही येथे गणती पावणासे राऊत अहेत दाहा पांच राऊत आणखीं यावयाचे अहेत ते अज पंताबाा येतील म्हणऊन सांगितले अहे रोजमुरा वरचेवर आला तर बरे नाही तरी भक्षावें काये राजश्री सुभे[दार] याजवली मागावे तरी त्याजवली काही नाही यैसा मार जाला अहे वडिलाच्या चितास येईल ते करावे रा भालचंद्रपंत म्हणतातो की जाधवाच्या मुलाचा सरजाम राजश्री [मो. जा*] स्वामी देत अहेत त्याचे बोलीचालीस आपण गुंतलो आहो आपणास याजवली यावयास अनुकूल पडत नाही म्हणतातो कलले पाहिजे सरदेशमुखीचाा बाकीचे कागद व खर्ते सातारियास संकराचाकडे कोणाबराबर रवाना केले ते लिहिणे म्हणऊन लिहिले त्यास ते कागद लाखोटा करून लिंगनाक याजवली देऊन रवाना केले यैसे स्मरण अहे कागदीं रवानगी पाहावी तरी रुमाल बराबर नाहीत कागद काही मध्ये ठेविले नाहीत अगर रुमालांतही राहिले नाहीत रवाना केले बहुतेक करून लिंगनाक याबराबरच रवाना केले त्याखेरीज प्यादे मदारी म्हातारा व मदारी धाकटा व फतेखान सुलतानखान माहादनाक यैसे वरचेवर रवाना केले होते त्यास पुसावे आणखी प्यादे [अहेत] त्यास चौकसीनें पुसावें म्हणजे ठीक लागेल परंतु लिंगनाकाबाा रवाना केले आम्हास स्मरण अहे कलले पाहिजे धारण हरभरे पावणेतीन पाइली हरभरे बाजरी सवाचार पाइली अहे जोरी साडेपांच पावणे सा पाइली अहेत राजश्री पंतप्रधान यांनी रा रघोजी भोसले यास सांगितले की आपणाकडील लोक तुम्ही येकंद्र न ठेवणे त्याकरितां त्याची अनास्ता अहे की काये हेंही कलत नाही कलले पाहिजे हे विनंती

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लें. २८ }
खर १ }

२८
श्रीभवानीशंकर

{ श. १६७६ माघ शुद्ध २
{ इ. १७५५ जानेवारी १४

श्रीमंत राजश्री हैबतराव राजाज्ञा स्वामीचे सेवसी

सेवक भालचंद्र जगनाथ कृतानेक सां नमस्कार विज्ञाप्ति येथील कुशल जाणून स्वकुशल लेखन अज्ञा केली पाहिजे विशेष सेवकाच वर्तमान ता। छ १ रबिलाखरपर्यंत मोकाम आइनापूर प्रां आथणी नजीक कृस्णातीर येथे श्रीमंताचे मुकाम अहे आम्हीही क्षेमरूप असो याउपरी दरबारचे वर्तमान तर राजश्री माहदाचाची रवानगी कर्नाटक प्रांते जाहली आमच्या सरदारची नमगूक त्याजबराबर होईल किंवा खासा स्वारीबराबर ठेवितील हे पाहवे खासा स्वारी गगातीरास जाणार आहे आधरियाच्या मुलकातुन जावे यसाही विचार अहे अपणास कलावे म्हणोन लिहिले आसे राजश्री ...... त यानी तुमच्या कर्जाचे येवजी तुर्त दोन हजार रुये राजश्री जीवजीपंताकडे जमले आहेत ते आपणास पावते करितील कलल पाहिजे संक्रमणाची तिलशर्करा पाठविली ते स्वीकारून पावलियाचे उतराची अज्ञा केली पाहिजे विशेष काये लिहिणे कृपा वृर्धी कीजे हे विज्ञाप्ति

बां राजश्री कासीपंत स्वामीचे सवेसी श्रीमंतास विनतीपत्र लिहिले त्याजवरून सर्व निवदन होईल कृपालोभ आसो दीजे अपणास तिलशर्करा पाठविली ते स्वीकारिली पाहिजे हे विनती

लें. २९ }
चैत्र शुद्ध १० }

२९
श्री

{ श. १६८१ चैत्र शुद्ध १०
{ इ. १७५९ एप्रिल ७

अजम हैबतराव देशपांडे दाम मोहबतहु

गर्द मोहिबानपन्हाई मुकलिशानदस्तगाह [मो. जा.*] अर्जी दिल यकलास फरीदखान सलाम बाजद सलाम महवल मकसूद ऊकी येथील खैरखुशी जाणऊन मोहिबी अपली खैर हमेशा लिहीत जाणे दिगर तुमचा निरोप घेऊन स्वार जाहालो ते मजल दर मजल सुरतस लस्करात अजम कृस्णाजीपंत याजपासी पावलो चैत्र सुध १० दसमीपावतो समस्त सुखरूप असो दोन महिनियानी लस्करही देशास येणार अपणास कलावे म्हणऊन लिहिले असे ज्यादा काये लिहिणे प्यार मोहबत असो दीजे हे कितावत [नि*] सही

लें. ३० }

३०
श्री

{ श. १६८१ पौष शुद्ध ६
{ इ. १७५९ डिसेंबर २५ सुमार

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री शामजीपंत स्वामी गोसावी यासि

पोष्य रामचंद्र माहादेव सा। नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये

शि. च. सा. सं. ११-२

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लेखन करीत जावे विशेष आपण पत्रे दोन पाठविली ते प्रविष्ट जाहाली लस्करचे वर्तमान लिा येैशास श्रीमंताचे लस्कर नगरावर आहे श्रीमंत राजश्री भाउसाहेबाचे लस्कर परली-वैजनाथावर आहे मोगलास यास वीस गावाचे आंतर पुढे फौज राजश्री नाना पुरंधरे व विसाजी कृष्ण व राजश्री बलवंतराव येैसे दाहा हजार पाठविले आहेत माकम वर्तमान श्रीमत राजश्री तात्यानी लस्करातून लिा पाठविले आहे आपणास पत्रे आली आहेत ते पाठविली आहेत त्यावरून कलेल येैवजाकरिता फार निकडीने लिहिले आहे हस्तेवदी करून देणे म्हणून श्रीमत राजश्री बाबानी लिा त्यावरून हस्तेवदी करून पाठविली आहे त्याप्राा येैवज पाठऊन द्यावा गडचे गावाचा मार काय ता लिा पाा म्हणून लिा त्यास राजश्री अंताजीपंत फडनीस माहुलीस गेले होते त्यास सागितले होते त्याणी गडचे गावचा मार विचारिला त्यास सागितले की चौ रोजा येणे म्हणजे काही काम चालते करून देऊ तूर्त तेथील प्रकार आम्हास समजला नाही यास्तव कागदपत्र घेऊन येणे म्हणजे मनास आणून वसूल चालता करून देऊ म्हणून बोलिले आहेत तरी कागद-पत्रसुधा राजश्री मंबाजीपंत व संकराजीपंत यासि पाठवावे म्हणजे माहुलीस जाऊन काय म्हणतात ते कलेल वरकड तुमच्चा मंडलीस तिल शर्करायुक्त येैल्या ६ पाठविल्या आहेत कागदाप्राा प्रविष्ट कराव्या बहूत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती आपण हिसेब येथे दिल्हे त्याच्या व हस्तेवदीची नकला करून श्रीमंत राजश्री बाबाकडे पाठविल्या आहेत हे विनंती

बाो राजश्री चिटकोपंत स्वामीस साा नमस्कार विनंती लिा परिसोन लोभ असो दीज हे विनंती

ले. ३१ अधिक (श्रावण) शुद्ध २	३१	श. १६८२ अ. श्रावण शुद्ध २ इ. १७६० जुलै १४

राजश्रिया विराजित राजमान्ये राजश्री रामचद्रपंत दादा व राो मोरोपंत तात्या व राो भानोपंत दाजी स्वामी गोा

सेवक मोरो खडेराव कृतानेक सांा नमस्कार विनती विज्ञापना येैसी जे आमचे वर्तमान ताा आधिक सुध २ परियेत मुाा श्रीआवंतिकापुरी येथे सुखरूप असो यानतर स्वामीकडून बहूत दिवस पत्र येऊन साकले वर्तमान कलत नाही याजकरिता चिता वाटते तर सदैव पत्र पाा संतोशवीत गेले पाहिजे विशेष राजकी वर्तमान तर श्रीमत राजश्री भाऊसाहेब व सिंदे होलकर व पोवार व बाजे सरदार समस्त आगरियावर छावणीस आहेत गिलजा येमुनेपार आहे त्याजकडे हिंदुस्थानचे राजे माडलीक माधव-सिगासुदा भेटले सुरजमल जाट व सुजातडवला येैसे दक्षेणी याजकडे होते त्यास सुजातडवला याजकडे नजीबखान जाऊन सुजातडवला पनासा हाजारा फैजेनसी गिलजी याजकडे घेऊन गेला शत्रूची फैज फार जाली आपली फैज त्याचे तिजाई आहे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

परतु श्रीमताची तप उतम आहे येश येईल आम्ही उजनीस बुणगियाबरोबर हात मोडला होता याजकरिता आलो देशास येत होतो परतु श्रीमताची पत्रे आली की तुम्ही मावारे आगरियावर येणे त्यास जात होतो परतु प्रजेन्येकाल याजकरिता राहिलो विजया दसमी करावयास जामदारखाना व लोक जाणार आहेत त्यासमागामे जाऊ समजाविसी आगरियावर करून उजनीस यैवज देवितात येसी जनवात्र आहे त्यास येदा सिंदियाची सरदारी बसलियात आली आहे जर करिता ईस्वर व श्रीमत त्याजवर रूपा करतील तर [अपूर्ण*]

ले. ३२ } ३२ श्री { श. इ.

राजश्री भवणीशंकर दादा देशपाडिये गोसावी यांसि

दे अखंडित लक्ष्मीं आलंकृत राजमान्ये [मो. जा.*] श्रो मालोजी नाईक पिसाल दडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत आसिले पाहिजे विशेष आपले श्वाधीन कुल मुलेमाणसे करून या देसास आलो आणि बंगालियासी गेलो तिकडे गेलियावरी कुदेची गोष्ट पडली याजकरिता तीन च्यार वरसे येणे न जाले येनदा पाउसालियात नागपुरास आलो त्यास पहिलेपासोन आपणापासी जे इमान दिल्हे आहे त्याप्रा आमची येकच निष्टा आहे कैलासवासी वडील गेले आहेत त्याचे जागा तुम्ही ये लोकी वडील आहा वडीलपणे साभालास आतर न करावे आम्ही लोक आपले पायासी वचणाचे बाधले आहो तुम्हासिवाये आम्हास साप्रत कोणी नाही सारे इष्टमित्र जनगोत थोरलाहाण आपण आहेत साभाल वडिलाणी केला आहे त्यापेक्षा विशेष कराल हा भरवसा आहे भरवसा जाणून मुलेमाणसे पायाजवल ठेविली आहेत आणि इमान- प्रमाण देऊन विदेशात आलो आहो श्रीमंत राजश्री जानोजीबावा भोसले याणी कबूल केले आहे की तुम्हास कर्जदाराचे देणियापासोन मुक्तता करितो त्यास दो महिणिया श्रीमंत सातारियासी येणार तेथे आलियावर आम्हीही याबा येऊ भेटी आपली होईल रूबरू जे विनंती करावयाची ते सेवेसी करून ते मान्ये केली पाहिजे याजवर वडील विवेकी आहा सुज्ञेपनाची पत्री स्तुत ल्याहावी येसे नाही गावही साहेबाचे श्वाधीन आहे लावणी संचणी जे करणे ते आपण वडीलपण करीतच असतील आम्ही ल्याहावे येसे नाही बहूत काये लिहिणे लोभ करीत जाणे हे विनती [नि*] सेवेसी विनती

राजश्री गंगाधर बावा व आनंतभट बावा व रा। भाऊ व रा। शामजीपंत व शंकराजीपंत यासी दडवत विनंती उपरी दादा लिा आहे त्याजवरून कलो येईल इरवरूत दादास आम्हाविशई सागणे हे विनंती

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. ३३ } ३३ { श.
जवल २० } श्री { इ.

श्रीमंत राजश्री पंत स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामचंद्र सामराज साा नमस्कार विनंती ताा छ २० जमादिलोवल पावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष श्रीमंत राजश्री दादासाहेबाची स्वारी वर्धनगडचे घाटे येणार येविसीचे पत्र राजश्री बाजीपंताचे सातारियाहून आले ते बजिनस पाठविले आहे त्याजवरून विदित होईल आपण यावयाचे केले पाहिजे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

ले. ३४ } ३४ { श.
मोहरम २९ } श्री { इ.

राजश्री कासीराव दिवाण गोसावी यांसी

ई अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्री शाहाजी भोसले रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत गेले पाहिजे विशेष तुम्ही बहुता दिवसी पत्र पाठविले ते पावोन लिहिले वर्तमान कलले मोंगलाचा जावयाचा कोण्हीकडे सुमार साहेब सोलापुरीहून कधी जाणार हे लिहिले पाहिजे म्हणून लिा त्यास मोगलाचे लस्कर सांप्रत उटी नजीक आवर्शे येथें आहे तेथे मुकाम दाहा अक्रा जाले आणखी दोन च्यार होणार कलबर्ग्यास जावयाची आवाई आहे बेदरास जाणार येसीही वार्ता आहे कोण्हीकडे जातो पाहावे या प्रांती आणखी महिना पधरा दिवस राहणार येसे वर्तमान आहे आम्ही सोलापुरास येऊन महिना होत आला परगणा निमे वोस होऊन गेला कसब्यात अडीच हजार तीन हजार प्यादे वगैरे मिलोन सिबंदी आहे स्वारीसमागमे दोन तीनसे स्वार आहेत सिबंदीचा पेंच भारी बसला इतके असोन पुढे परिणाम कसा लागतो तोही कलत नाही बेदरच्या सुमारे एक मजल गेला म्हणजे आम्ही गांवास जाऊं आपण येतो म्हणून लिहिले तरी उतम आहे भेटीस बहूत दिवस जाले तरी यावें भेटी अंती सविस्तर कलेल राा छ २९ मोहरम [नि*] बहूत काय लिहिणें हे विनंती

ले. ३५ } ३५ { श.
 } श्री { इ.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री हैबतराव स्वामीचे सेवेसी

पोष्य भिकाजी नाईक रास्ते नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत आसिले पाहिजे विशेष आपण पत्र पाठविले ते पावले पत्री लिहिले जे समस्त ब्राह्मणानी रयेत यानी रदबदली करून क्षेत्राचे संवरक्षण करावे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

याजकरिता राजश्री गमाजीपंताकडे सर्वांनी पाठविले त्यावरून मारानिलेकडे जाऊन कौल आणिला म्हणोन लिा त्यास आपणाकडे गावचे वडीलपणच आहे बहूत उतम केले आम्हास राजश्री गमाजीपंताचे पत्र पाठविले ते पावोन संतोष जाहाला आपण यावे म्हणोन लिा उतम आहे येऊ बहूत काये लिहिणे रुपा लोभ आसो द्यावा हे विनंती आपण राजश्री गमाजीपंताचे पत्र पाठविले होते त्याचे प्रतिउतर पाठविले आहे ते वाचून पाहून लाखोटा करून त्याजकडे रवाना करावे हे विनंती

ले. ३६ } ३६ { श. १६९० वैशाख वद्य १३ नंतर
{ इ. १७६८ मे १४

न डेरेदाडे टाकून रात्रीस पलून गेले दुसरे दिवसी यास वर्तमान कलले मग यानी त्याच्य शोधास दोनसे स्वर पाा आणि त्याची बाड बिशाद डेरेदाडे जे राहिले होतो ते अवघे सरकारात आणिले त्यास केदारजी सिंदे याची गाठ पडलीच नाही ते श्रीमंत राजश्री दादासाहेबाकडेस जाउन भेटील त्यास त्याची बाइको व मेहुणो व पालक लेक येसी मागून मार्गाने जात हैती त्याची मात्र गोठे पडली त्यास धरून आणिल आणि त्याच्या पायी बेड्या द्वावादसीस घातल्य आणि बाइकास किल्यावरी पाठविली नारो शकर याचे घरी चोकी च्यार दिवस बैसविल हैती मग काणी ...यानी रदबली करून उठेविली तिकड श्रीमत दादासाहेबही बाहीर निघाले फेजा बोलाविल्य मानसपुत्र घेतला त्याची मुज्य सुध दशमीस आपले माडीवरी केली पुढ स्वारी खानदेशात करणार आहेत किंवा श्रीकृष्णाश्नानोस यावे येसी बोली आहे यास्तव येथ गडबड बहुत जाली त्याजवरून श्रीमंत रावसाहेबानीही तमाम फेजा व पागा बलाविल्य रास्ति-यासी व गोपाळरायास व होलकर सिंदे यासी साडी पाा की जलद येऊन पोहचणे डेरो त्रीयेदसीस दोन घटिका रात्री गारपिरावरी दिल्हे पचमीस डेरियासी दाखल होणार डेरियास दाखल जालियावरी कूच दरकूच ... येसी बोली आहे यामधे काये होईल तो पाहवे परतु गडबडीचा प्रसग तूर्तच दिसोन येतो आपणास कलाव म्हणऊन लिहिल आसे आमचाही कामकाजा पाच सात रोजानी होऊन येईल मग लवकरीच सेवेसी येते वरकड वर्तमान जे नवले विशेष होईल ते मागून लेहून पाठऊ बहूत काये लिहिणे रुपा लोभ कीजे हे विज्ञापि

चुनाई कथेई याची आवस्ता बहूत कठीण आहे तरी त्याच्या लकास सागून पाच सात गडी घऊन येण आणि त्यास उचलून नेणे घोडियावरी बैसावयासी ताकत नाही यास्तव लिहिले आहे तरी आगत्य त्याच्य लकास...णे

9259

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. ३७ } ३७ { श. १६९७ चैत्र शुद्ध ३
चैत्र शुद्ध ३ } श्री { इ. १७७५ एप्रिल ३

श्रीमंत राजश्री पंत स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक चिटको शंकर व कृष्णाजी अनंत कृतानेक सांा नमस्कार विनंती विज्ञापना तांा चैत्र शुद्ध ३ पावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित असे तदनंतर स्वामीकडून पत्र येऊन सेवकाचा सांभाल होत नाही तेणेकरून चित उदूविग्न असे यैशास निरंतर पत्र पाठवून सांभाल करावा इकडील वर्तमान राजश्री हरिपंत तात्या घाटावर आहेत राजश्री आपा बलवंतरावजी नवापुरानजीक आहेत श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचा मुकाम माडवी नजीक सोनगडी आहे सल्याचे राजकारण इग्रजाकडून पुरंधरी लागले स्वामीस कलावे भेटीचा लाभ होईल तो {तो} दिवस आनंदाचा असे सेवेसी श्रुत होय कृपालोभ करावा हे विज्ञापना

ले. ३८ } ३८ { श.
मार्गशीर्ष वद्य १ } श्री { इ.

श्रीमंत राजश्री पंत राजाज्ञा स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक माहादाजी बलाल सां नमस्कार विज्ञापना ताा मार्गसीर्ष वद्य १ पर्यंत यथास्थित असो विशेष स्वामींनी आज्ञापत्रे पाा ते पावली लिाा माार सविस्तर कलला इकडील मजकूर तरी आम्ही येथे आल्यानंतर सिस्तीस आरंभ केला चाळीस-पनास गांव ठरले तो इतक्यात सुरापूरकर बेरड यास दुरबुध्य निर्माण होऊन कोसिंदगी येथे दोन हजार फौज व च्यारपांच हजार प्यादे येऊन गांवाभोवता वेढा देऊन रात्रीस बसले गांवचे आसपासची घरे जालली गावात शंभर सवासे प्यादे होते त्यानी बुरजातून मार करून त्याजकडील दाहा आा ठार पाडून मोड केला सिदगीचेही प्यादे येक दोन पडले च्यार प्रहर लढाई जाली तालिकोटास बातमी येताच येथील जमावसुधा राा विठल आनंत यास पाा तो त्यानी कूच करून सिदगीपासून दोन कोसावर जाऊन मुकाम करून बसले विठलपंतही जमाव सुधा कलकिऱ्यात राहिले त्यानी आठ दिवस पाठीवर टाकून येक दिवसी रात्रीस उठोन तालिकोटानजीक दोन कोसावरील गांव मौजे सेलंगी व पिरापूर व लकुडी हे तीन गांव बेसावध तेथील बुरूज नाही पडले आहेत आसी बातमी लाऊन रात्री येऊन चौकी दिल्ही तेथे लढाई जाली गांवास आश्रा नाही तेव्हां जेर जाले त्यानी गांव लुटून भटनूर त्याचा गांव तेथून आद कोसावर आहे तेथे मुकाम केला विठलपंत कलकिऱ्यात होते त्यास बातमी लागताच तेथून येऊन भटनुरानजीक पावकोसावर आमचा गांव सोमनाल आहे तेथे मुकाम केला त्याचा जमाव थार आम्हापासी सेदोनसे लोक त्यानी येक तोफ सुरापुराहून आणून तालिकोट घ्याव असी मसलत केली तालिकोट गेल्यास

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सर्वस्वच गेले तेंव्हा उपाय नाही असे जाणून वीस हजार रुये येथे सावकारापासून कर्ज घेऊन दोन हजार स्वार चांगला व दोन हजार पायदळ मेळऊन किल्या ['श्री २ पुाा सेवेसी साा नमस्कार' असा २ ऱ्या बंदाच्या आरंभीं मज.*] चा बदोबस्त करून सोमनालावर फौजेसुधा विठलपंत यांचा मुकाम जाला दर रोज त्याची यांची गोलागोली होऊ लागली वरकड प्रांतातील गांवगनाही प्यादे हजारपर्यंत ठेऊन दारूगोली दर गांवगना देऊन बंदोबस्त केला येथे फौजेचा जमाव होताच तालिकोटावर यावयाचे राहिले दर रोज लढाई होतच आसता त्यानी येथे हजार स्वार व दोन हजार लोक यानी लढाईचे तोड लाऊन हजार स्वार व दोन हजार प्यादे दुसरेकडे आमचा गांव आलगूर बेकिनहल समतेत थोर आहे तेथील सेखदारी कासी हणमाजी याजकडे आहे तेथे जाऊन गांवाभोवंता वेढा देऊन गावात सिह लागले माहाराची घर जालली गांवात येक हुडा आहे त्यांतून प्यायानी मार करून त्याची हला मोडली दाहा माणूस व येक दोन घोडी ठार बेरडाकडील जाली आम्हाकडील दोन प्यादे पडले नंतर आणखी त्यानी नालतवाडाकडे रात्रीस स्वारी करून येक गांव मारला तेथेही पांच सात प्यादे बेरडाकडील ठार जाले व त्यात सरदार सस्थानिकाचे मेहुणे आंकापा नाो म्हणौन होते त्याचे पायांस गोली लागली नंतर दोन दिवस त्यास दम खाऊन सोमनालचे फौजेवर चाळून घेतले तेंव्हा सोमनालची फौज व तालिकोटाहून फौज गेली येक जाली आणि लढाई मातबर दिल्ही तेंव्हा बेरडाकडील फौज कच खाऊन माघारी सरली ईश्वरे येश दिल्हे स्वामिनी थोरली सिंगी दिल्ही ती पडली आणखीही दोन तीन घोडी चांगलीच पडली दुसरे दिवसी सल्याचे बोलणे ठरले रुसुमाचे रुये २०००० व घासदाणा म्हणौन दाहा हजार करार केले घासदाणा यावयाचे कारण नाही परंतु ते संस्थानीक दाहा हजार फौज नेहमी बालगणार आम्ही मामलेदार सिबंदी नेहमी बालगावयाची सोय नाही व यजमानाची आज्ञा नाही सिवेसेजारी नित्य कटकट पडेल आसे समजून बोलण्यात आणिले माहालचा पैसा येत नाही आज महिना या मसलतीसच लागले उपाय नाही ['श्री ३ पुाा सेवेसी साा नमस्कार' असा तिसऱ्या बंदाच्या आरंभीं मज.*] बरे स्वामीचे पुण्येकरून सर्व गोष्ट निभावतील पेशजी उंटावर रवाया व तुप व तेल पाा ते पावलेच आसेल हाली बैल सर तीन व म्हैस एक व रेडा १ व गाई सर २ दोन व तेल जोडी येक पाा आहे बैल स्वामींनी ठेवावे म्हैस घरी पाहिजे तरी ठावी आथवा विकावी गाई चांगल्या दुधाच्या आहेत आवल्यास पाहिजे तरी ठेवाव्या आथवा यखादी घरी ठावी येरडे यानीही सागितले होते त्यास पाहिजे तरी ठावी रेडा कोटावरील बागेत ठेवावा तेल वाड्यात द्यावे घोडीची किमत उगऊन घेतो आथवा चागली पाहून घोडीच आणीन तुर्त घोडे बसावयास थोर पाहिजे त्यास सिंगा पाठविल्यास उतमच आहे आथवा यिचकुलेवाली पाठवावी सिंगी गेली म्हणौन रागे भरू नये त्याहीपेक्षा चागली स्वामीचे मर्जीयोग्य आणितो आथवा पैका म्हटल्यासही खर्ची घाळून घेईन

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राघोपंत यांजकडील पत्रे पुण्याहून आली होती त्यात आचाजी मोरेश्वर यांजकडील जाबसाल ठरण्यात आल्याचा लिा होते यैसियास जाल्यास करावे दिवस कठीण आहेत सर्व आर्थ स्वामीचे ध्यानातच आहेत. बहूत काये लिहिणे लोभ करावा हे विज्ञापना गुर लिहिली आहेत त्यापौ दोन पाठविली आहेत मागाहून येक गाव व येक म्हैस राहि[ली] ती पाठऊन देतो राजश्री राघोपंत पिटके याजबराबर घोडी तीन आहेत त्यास पत्र दिल्हे आहे त्यांचे मनसीक आसावे च्यार दिवस इसावा देऊन सत्वरच पाठउन द्यावी आभिषकपात्र तिंवईसुधां मल्हारी वतारे याजपासून रुप्याची करून पाठऊन द्यावी रुये मागाहून पाठऊन देऊ आगत्य करून पाठवावी सेवसी श्रुत होय हे विज्ञापना

ले. ३९ मु. ११९७)
जवल ७ }

३९
श्रीनाथ प्रा

{ श. १७१८ कार्तिक शुद्ध ८
{ इ. १७९६ नोव्हेंबर ८

पौ छ ८ जौवल सन सबा तिसैन

राजेश्री पंत राजाज्ञा गोसावी यासी

दं सकल गुणालंकरण अखंडित लक्षुमीआलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्री मानाजीराव सिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल तां छ ७ जौवलपावेतो वर्तमान येथास्तीत असे विशष बहुता दिवसी पत्र पाठविले ते उतम समयी प्रविष्ट होऊन परम सतोष जाहाला प्रात वाई येथील गावगना रोखे वासदाण्याचे केले आहेत ते मना करवावे म्हणोन लिहिले ऐसियासी आम्ही फौजसुधा या प्रांती आलो काही सेवा घडली आथवा नाही हे आपले मनात येऊन फौजचे खर्चाचा बदोबस्त करून देवावा म्हणजे मनाईच आहे सदैव पत्र पाठऊन परामृष करीत असिले पाहिजे बहूत काये लिहिणे रुपा लोभ करावा [नि*] हे वीनंती

ले. ४० मु. ११९८)
सवाल १४ }

४०
श्री

{ श. १७२० चैत्र वद्य ३
{ इ. १७९८ एप्रिल २

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री भवानीशंकरपंत स्वामी गों

सेवक परशराम श्रीनिवास प्रतिनिधि नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष प्रा वाई येथील वारेवणीचा आमल साल गुदस्ता विठू जानकर याजकडे होता तो दूर करून सालमजकुरी गोसोजी बिन सिदोजी जानकर देशगावडा यास सांगितली आहे तरी वारेवणीचा अमल पैकी निमे जिल्हे व निमे खालसा याप्रो वहिवट आसतां साल गुा तुम्हाकडील कारकून बाबाजी कृष्ण टिचेस आले होते त्यानी फाजील यैवज नेहला म्हणून विदीत जाले त्यास पेशजी-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पासोन निमेची वहिवट आहे त्याप्रो साल मजकुरी गावडा माार याजकडे वारेवणीचा आमल सुरलीत टिचेचा देवणे छ १४ सवाल सुाा समान तिसैन मया व अलफ [नि*] बहूत काये लिहिणे हे विनंती

ले. ४१ } ४१ { श.
मोहरम २४ मंद } श्री { इ.

भाई वेकाजीपंत व कालकपा आपा व मियाजी दा मोहचतहु

आजी दिल येखलास नवब सरफदौले माा हुसेनखान बहादुर सलाम आ की दिगर राा जनोबा लस्करातुन आताच आले त्यास पठाणांचे कूच होऊन येसकलास आले तेथे राा तात्या पागनीस व सर्व बक्षीसुधां यासी बलोन कजिया केला तव्हा त्याणी करार केला की आम्हास वाई प्रातांतील दोन लक्ष रुये देत असला तरी आम्ही तिकडे जात नाही आम्हास हमी द्यावी तेव्हां त्यासी करार केला की आदितवर सध्याकाल पो जाबसाल काये तो समजो द्यावा नाही तरी सोमवारी आम्ही जाऊं नाही तरी तुम्ही सरकारांत लाख रुये घ्यावे आणि आम्हास तिकडे जाऊं द्यावे तुम्ही मना कल तरी जाऊं याप्रो जाबसाल आहे याचे उतर रातोरात समजू द्याव नाही तरी आम्हास बोलाविले आहे तरी लस्करात जाऊं कोणी बोलण्यास येणार असला तरी जलद पक्केपणी करून पाो पठाण सोमवारी कूच करून येतील वरकड माार जबानी मिरजा सागता कलेल उतरास दिरग नसाव जादा काय लिहिणे राा छ २४ मोहरम मदवार च्यार घटका रात्र

---

२ कासेगांव-देशमूख व देशपांडे

[पंढरपुराचे दक्षिणेस चार मैलांवर कासेगांव नांवाचा कसबा आहे. सध्या त्याचा समावेश मुंबई राज्यांतील सोलापूर जिल्ह्याच्या पंढरपूर तालुक्यांत होतो. पण मराठेशाहींत व त्यापूर्वी कासेगांव हें एका कर्यातीचें ठिकाण होतें. तींत पंढरपुरासुद्धा ४० गांवांचा समावेश होई. या गांवांत देशपांड्यांचें एक व देशमुखांचीं दोन अशीं तीन कुटुंबें तेव्हांपासून नांदत आहेत. श्री. माधव वामन देशपांडे, श्री. दौलतराव बाजीराव देशमख आणि श्री. रामचंद्रराव भाऊसाहेब देशमूख, हे त्यांचे विद्यमान वंशज आहेत. कौटुंबिक सोयीसाठीं सांप्रत देशपांडेकुटुंब पंढरपुरास राहातें. पण या तीन कुटुंबांचीं बरींचशीं वतनें समाईक असल्यानें त्यांचे कागद येथें एकत्रच दिले आहेत. या कागदपत्रांसाठीं मी प्रथम इ. १९५२ च्या डिसेंबरांत पंढरपुरास व पुनः इ. १९५४ च्या फेब्रुवारींत पंढरपूर व कासेगांव या दोन्ही ठिकाणीं गेलों होतों. त्यांच्या कागदपत्रांचीं

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अनेक दप्तरें तपासलीं व त्यांतून फार्सी, मराठी व फार्सीमराठी असे तिन्ही प्रकारचे सुमारें १५० कागद अधिक अभ्यासासाठीं मंडळांत घेऊन आलों. त्यांपैकीं अगदीं थोडे येथें प्रकाशित करीत आहे.*]

ले. १ सु. १०५९ }
हि. १०६९ जिल्हेज २ }

४२
[फा. फ. सा.]

{ श. १५८० भाद्रपद शुद्ध ४
{ इ. १६५८ ऑगस्ट २२

दुसरा अली आदिलशाह ——> कर्यात कासेगांव परगणे माण येथील देसाई

कसबे कासेगांव (वाडीसह), मौजे मुहम्मदापूर (?), मौजे रांजणी, सेनफळे (वाडीसह), रामापूर (वाडीसह), संगेवाडी, मांजरी, वांकरी, मुंबेवाडी (वाडीसह), देवळें, कोरटी, नेपतगांव, सेवावी, चिंचुर्वे, अुमरगांव, सिद्देवाडी, सेलेवाडी, मुहम्मदाबाद, भोवाळी, सुरगांव (वाडीसह), टांकळी, दहीवाड (वाडीसह), सिरबावी, तनाळी, (गुंजेगांव), गायगव्हाण, गायगांव, खर्डी, तिसंगी, ——, वांकी, घरनिकी, गादेगांव खुर्द, हीं गांवें कारखान्यांचा तनखा देण्यासाठीं व नीट चालविण्यासाठीं मिंजलेशाह याच्याकडे तंबाकू व तीपवर्ग जकात यांखेरीज दिलेलीं आहेत. तरी तीं त्याच्या ताब्यांत द्यावीं आणि कारखान्यांच्या चलतीबाबत तो सांगेल त्याप्रमाणें करावें. हुजूरच्या परवानगीनें.

ले. २ सु. १०६० }
शाबान २४ }

४३

{ श. १५८२ वैशाख वद्य ११
{ इ. १६६० एप्रिल २५

[आरंभीं मुहम्मद इख्लासखानाचा फा. शि. व ५ ओळी फा. मज.*]

बजानेब देसमुकानी कर्याती कासेगाऊ पा। माण चिदानद के अज सुहूरु सन सितैन वा अलफ हुजरून वजारत माब खेराऊ ढोणेती सरफराज करून कर्याती मजकूर इस्तकामत मराहामत फर्माऊन फर्मान अशरफ सादीर असे अता दर रसीदन मिसाल कर्यात मजकूर राऊ मशारनुलेचे मुतालिकासी काबीज करून देऊन त्याचे रजातलमधें असोन अपले दौलतख्वाही जाहीर करणे वा राऊ मशारनुले पादशाही मसलहतशीर असे येसे करणे जे राऊ मशारनुलेसी पोखता खर्ची पोचे या बाबे ताकीद कुली जाणणे छ २४ माहे शाबान

ले. ३ सु. १०७३ }
रजब २२ }

४४

{ श. १५९४ कार्तिक वद्य ९
{ इ. १६७२ नोव्हेंबर ३

[याच्या चौरस शिक्क्यांत 'श्रीशिवसे। नानेतुर्षु। द्रा जयति प्र। तापरायस्य' असा आणि चौरस मोर्तबांत 'मोर्तब सुद' असा मजकूर*]

र्द मशहूरल अनाम राजश्री गोदजी बिन देशमूख का। कासेगांऊ प्रती प्रतापराऊ

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सरनोबत शहूर सन सलास सबैन व अलफ मा बकाजी नावडकर यांस दिवाणातून तरवार बारगीर होती ते तुम्ही हुनरवंदीने घेतली आहे म्हणून तरी सरकारीची तरवार तुम्हीं घ्यावयास काये निसबती आहे ते तुम्हांस हजम होईल कीं काये [येसा] तुम्हांस समज नाहीं या उपरी पत्र देखतांच सदरहू तरवार पाठउनू दीजे दिरंग केलियां दूरदराज लागेली आम्हांवरी बोल नाही येसें समजोन वर्तणूक करणे छ २२ रजब पा हुजूर [चौ. मो.*]

लें. ४
रखर २५ गुरु

४५

श. १६०० ज्येष्ठ वद्य १२
इ. १६७८ जून ६

वलींदे मुशफक वली न्यायीमर्ती[ति]मा साहेबजी अजी फरजंद बाहादुरखान --तसलीम कुरनि[से] मे रसानद वाके ताा२५रोज पंचशबे दो पाहारा रोजी खुदा तालाने आमची खलासी केली आण हजरत पातशाहजींचे हुकुमामाफीक रोहिलाखान हमसी त्यास भेटोण आपले घरास आलो तमाम दोस्त व आजीज होते त्यास खुशहाली जाली तुम्हासही मुबारकी लिहुनू पाा असे पुढे हजरत पातशाहजींची मुलाजमत जालियावर जे हकीकत होईल ते लिहुनू पाा देउनू बहूत काये लिाा छ २५ रबिलाखर [लं. व. शि.*]
मुरत्तब शुद

लें. ५
सु. १०८०

४६
[वा. शि.*]

श. १६०१–२
इ. १६७९–८०

वर्के जमा गैरमहसूल पैदास्त काा कासेगाऊ पाा माण दहीगाऊं सुाा समानीन आलफ बिाा कारकुनानी व देसमुखानी मा सिवाजी राजे याचे लोक जाता कसबे मजकूरचे जगलामधे बरे तटू जबून जाहाला म्हणौन टाकून गेले होते ते पाटील मााराने सदरेस आणौन गुदरिले ते बाा मुाा पुजाजी सरखवास हुजूर यासी खडून दिल्हे तटू जबून १ येकून होनू ·॥· [अ. मो.*]

लें. ६
सु. १०८५

४७

श. १६०६–७
इ. १६८४–८५

वर्कु जमा हासिल जात्रा कार्ती क्षेत्र पढरपूर काा कासेगाऊ सुाा खमस समानीन अलफ बिाा कारकुनाानि व देशमुखानि काा मजकूर गलबलेकारिता कुली जात्रा अली नाही [जुज]वी जमा जाहले ते जमा केले जमा होनू ·।०।–

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. ७ फ. ११०३ } ४८ { शं. १६१५ आषाढ वद्य ५
जिल्काद १८ } { इ. १६९३ जुलै १२

झडती सादिलवार बजार अखाडी क्षेत्र पढरपूर पा कासेगाऊ सुहूर सन ११०३ इा छ ३ जिलकादी ता छ १८ माहे मा यो मुा रोज १५ जमा रुजू पटी रुा १०२२॥ पैकी वजा रुजू दिवाण रुा ५००८ बाकी जमा श्री रुपये ५२२॥ मो पाचसे साडेबावीस रुपये रास

ले. ८ फ. १११० } ४९ { श. १६२२ अ. आश्विन वद्य १
रखर १५ } { इ. १७०० सप्टेंबर १८

दाा बोा गोदजी व वाकोजी देसमूख पा कासेगाऊ सुा सन हजार १११०. कारणे लेहून दिल्हा कबूलकतबा ऐसा जे साहेबी पा मजकुरीची जेजयाची खिजमत करून पा मजकुरास आलेसी आणि आपणास हुकूम फर्माविला जे जेजेयाचा मामला साल मजकुरीचा चुकऊन देणे त्यास आपण देह ४० बिलकुल मख्ता पा मजकुरीचा कबूल केला असे मोकरा रुपये २००० दोनी हजार याची पा मजकुरी पटी करून वसूल करून देऊ हा मुचलका सही [वा. फा. मो.*] [नि*] बो निराजी नरसिह देशपांडे

[पाठीवर*] तेरीख १५ रबिलाखर

ले. ९ फ. १११५ } ५० { श. १६२७-२८
} { इ. १७०५-६

[मजकुराचे उजवीकडे ' ० ~ । सीदोजी । देसमूख ' असा वा. शि.*]

दाा बोा सिदोजी व वाकोजी देसमूख व देसपाडे व मोकदमानी व मुजारियानी पा इसलामपुरी सुा सन १११५ लेहून दिधला मुचलका औसो जे साहेबी जजेयाची विले करून देण म्हणऊन हुकूम करून बैसाविल होते औसियासी येक साल जजया बाा सन ४७ याची सिस्त करून साहेबापासी दिधली सन ४८ जजयाची हकीकत पा मजकुरी कहत पेडोन किती येक फौतीफरारी होऊन गेली आसती चदल साहेबास अर्ज कला साहेबी नातवानी जाणून महकूफ राहविल असे पेस्तर खानेसुमारी करून याची विले करून देऊ हे मुचलका सही

[पानाचे कडेस*] निराजी नरसिंह दसपाडे पा मजकूर सिदोजी व वाकोजी देसमूख

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. १० } ५१ {
श्री [नि*] राम

तीर्थस्वरूप राजश्री गोविंद्राव मामा देसमूख पाा कासेगाव वडिलांच सेवेसी

आपत्य संक्राजी राजे घोरपड दंडवत विनंती उपरी हैद्र नाइकाचे धामधुमेमुले गडचडून मुले माणसे काडणार म्हणोन ऐकिले होते त्यास येथे चातमी रोज उठोन येती जे कृष्णा नदी औलाकड येत नाही पैलीकडच आहे यैसी बातमी येती तुम्हास तो तिकडील खचर तहकिक आसेल थैसियासी येकायेकी जागा न सोडणे पुरती खवर आणौन कोणती तजवीजे करणे ती कर्ण वरकड आम्ही काचे ल्याहवे सर्व भरवसा आपला आहे वारंवार ल्याहवे यैसे नाही बहूत काचे लिहिणे लोभ कीजे हे विनंति

बाा राजश्री विठोजी बाव व राा रामराव यासी रामराम रुपा लोभ आसो देणे हे विनंति

बाा ताजा कलम राा संताजी बाव तेथे तुम्हाजवल आहेत त्यांचा बंदोबस्त करून द्यावा आगर न जाला तरी निरोप तरी द्यावा हैईगई न करावी हे विनंति

---

३ पंढरपूर-विठ्ठल

[प्रस्तुतच्या नऊ कागदांच्या नकला पंढरपूर संशोधन मंडळाचे कार्यवाह श्री. शंकर रामचंद्र चडवे यांनीं मला दिल्या. मूळ कागद श्री. विश्वनाथ गोपाळ बडवे, श्री. बाबूराव बडवे (पाटील) व इतर बडवे मंडळी यांजकडून मिळवून व नकलले होते. नकलतांना यांत कांहीं ठिकाणीं हस्तदोष झाले आहेत असें वाटतें. पण मी नकला मूळ कागदांशीं रुजू घालूं न शकल्यानें ते येथें तसेच राहिले आहेत. कागदांचे आशय वास्तव आहेत असें दिसल्यावरून ते येथें प्रकाशित करीत आहे.*]

ले. १ श. १५९९ आपाढ शुद्ध १५ नंतर } ५२ { श. १५९९ आपाढ शुद्ध १५ इ. १६७७ जुलै ४

यादी सके १५९१ सौम्य सवछरे पुस सुध बीज तदिनी देवें स्थळ त्यागिळे सकें १५९२ साधारण संछरी सिवाजी भोसळ्याचे भेटीस गेलो सके १५९३ विरोधकृत संवछरी चिचोळी मजुरा पडिली होती आम्ही परडियाकडे होतो सके १५९४ परिधावी संवछरी आशाढ सुध दसमसि देव बाहेर काढला काडून काडकुसंब्यात ठेविला आम्ही पूजेस सामोग्री आणाव्या गूळ[सारिया]स गेलो माघा ... याचे राऊत येऊन चिचौळीची गुरे व बैळ घेऊन गेळे मग देव तैसाच आस्छयादिला व पुढे भाद्रपद मासी त्रिंबक बहिरव चिचोळीस आणिळे त्यास दरुशेनास देव काढिला सके १५९५

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

प्रमाथीदी सवछर वैशाख सुध सप्तमीस बापभाऊ मिळोन चिचोलीस आले आपणें त्याच्या हावाला केले सकळानी आमीन कृस्णाजी बडवा ठेविला त्याच्या विद्माने आपआपळे विभाग खात आले पुढे सकें १५९७ राक्षस सवछर चइत्र वदी सप्तमीस देव रगोजीने चोरून नेळा तो आशाड सुध दसमीस देव हाती दिधला त्यास पैके पडिले ते तस्पील निराळी आसे पुढे येकादसीपासून पाडिवापावेतो आमीन गणावाने राखोन दिधलें तेही आवाधियानी विभागप्रमाणे घेतेले पुढें भाद्रपद मासी भानजी बडवियाने रगोजीस मिळोन वाडा खाणोन देव काढून रगोजीपासी दिधला मग दीपवाळीकारणें भोसेकरानी व परडकरानी आमच्या दिमती केळा तेथे पैके पडिळे ते तस्पीळ आसे पुढे येकादसीपासून पाडिवापावेतो पूजा केळी तेहि जे काये आळे ते चौघानी घेतळे पुढे बीजेस बहादुरखानाचे कटक आळे देव आस्छादिला मग येकादसीस सकरदास वाकिलाकारणे गुळसरियास आणिला त्यास आमीन गणावा ते जो काये पानसुपारी व पैके सर्वेच वाटून घेत गेळे आणि वश्रेउचापती आवधियावरी· तो हिसोब आसे सके १५९८ नल सवछरी आखाडी आस्टमीपासून पुनींव पावेतो चौघानी राखोन घेतले पाडिव्यापासोन आमीन सेखावा आस्टमीपावेतो तेही चौघानी घेतळे तेथून आमीन रघावा बडवा महिने २ होता तो हिसोब त्यापासी आसे पुढे दीपवाळीस पादका माडिल्या देव आछादिला पुढे तेथून जे काये आळे ते चौघें घेत गेळे वश्रे व नाणे त्यात काही उचापती आसे सके १५९९ आशाडी पुनीवपावेतो तकसीमप्रमाणे घेतले पूर्णिमेस देवस्थलासी (अपूर्ण)

ले. २ रा. श. २० भाव वैशाख शुद्ध ९ सोम	५३ श्री	श. १६१६ वैशाख शुद्ध ९ इ. १६९४ एप्रिल २३

[आरंभीं व शेवटीं छत्रपति राजारामाचा शि. व मो. आणि मजकुराचे डावे अंगास प्रतिनिधि व प्रधान यांचे शि.*]

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके २० भावनाम संवत्सरे वैशाख शुद्ध नवमी इंदुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्रीराजाराम छत्रपति याणी जिवाजी व सूर्याजी पाटील कुलकर्णी मौजे देगाऊ ता। मोहोळ यासी दिल्हे अभयपत्र ऐसा जे गोपाळ विठल बडवे क्षेत्र पंढरपूर याणे हुजूर येऊन विदीत केले की पंढरपूर क्षेत्री जे समई तांब्राचा गलबला होतो तेव्हा श्रीच्या मूर्ति क्षेत्रीहून काढून मौजे मजकुरी घेऊन जाऊन ठेवीत असतो अशास त्या गावास स्वामीचे लश्कराचा उपद्रव लागतो तरी स्वामींनी गांवच्या लोकास आभयपत्र सादर करून लश्कराचा उपसर्ग मौजे मजकुरास न लागे ते केले पाहिजे म्हणून त्यावरून तुम्हास हे अभयपत्र सादर केले आसे तरी मौजे मजकुरास पंढरपुराहून श्रीच्या मूर्ति बडवे आणून ठेवीत असताती तैशाया गलबल्याच्या प्रसंगी आणून ठेवितील तरी ठेऊ देत जाणे लश्कराच्या लोकास आज्ञापत्र सादर केले असे त्याचा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कांही उपसर्ग लागणार नाही तुम्ही मौजे मजकुरी सुखरूप आसणे आभय असे जाणिजे निदेश समक्ष

संमत मंत्री	रुजू संमत	रुजू
सुरू सूद बार	बार	बार

ले. ३ रा. श. २० भाव वैशाख शुद्ध ९ सोम	५४ श्री	श. १६१६ वैशाख शुद्ध ९ इ. १६९४ एप्रिल २३

[मजकुराचे डावे अंगास प्रधान व प्रतिनिधि यांचे शि.; शेवटीं छ. राजारामाचा मो.*]

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २० भावनाम संवत्सरे वैशाख शुद्ध नवमी इंदुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्रीराजाराम छत्रपति यांणी राजेश्री सुभेदार व कारकून व ...... दिा लश्कर यासी आज्ञा केली ऐसी जे मौजे देगांव ताा मोहोळ येथे श्रीच्या मूर्ति पंढरपुराहून तांब्राच्या गलबल्यासमई आणून ठेवित आसता तिजसी यासी मौजे मजकुरी तुमचा आमदरफ्तीमुळे उपद्रव लागतो म्हणोन विदीत जाहले तरी श्रीच्या मूर्ति बडवे तेथे ठेवीत असाता तुम्हास उपसर्ग द्यावयास गरज काय याउपरी असे करीत नव जाणे मौजे मजकूर एक जरा उपसर्ग न देणे जाणिजे निदेश समक्ष

संमत मंत्री	रुजू संमत	रुजू
सुरू सूद बार	बार	बार

ले. ४ सु. १०९६ जिल्हेज २२	५५ श्रीरघुवीर	श. १६१७ आषाढ वद्य ९ इ. १६९५ जुलै २४

राजश्री सरबगजी कारकुनानी दिा पागा गोसावी यासी

छ आखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्री संताजी घोरपडे सेनापति व नमस्कार सुाा सीत तिसेन अलफ मौजे देगाव ताा मोहोळ येथे श्री......च्या मूर्ति पंढरपुराहून ताम्राच्या गलबल्यासमई आणून ठेवीत असता तियेसी आमदरफ्तीच्या मुळे मौजे मजकुरास तुमचा उपद्रो लागतो तरी आपले कुल लोकास ताकीद करून जरा आजार लागो न देणे मौजे मजकुरीची खंडणी करून ऐवज राजश्री...... देवाकडे देऊन गाव राजश्री गोपाळ विठल बडवे यांचे हवाली केले आहे असियास तुम्ही कोन्ही त्या गावासी खंडणी अगर घासदाणाचा उपद्रो न करणे मौजे मजकुरीचे विषी गोपाळ विठल बडवे हे येऊन तुम्हास सांगत जातील त्याचे पारपत्य करीत जाणे आसे न करिता मौजे मजकुरास कोन्ही आजार देईल म्हणवून त्याचा मुलाहिजा होणार नाही ऐसे बरे समजोन वर्तणूक करणे फिरोन बोभाट येऊ न देणे जाणिजे छ २२ जिलेज हे विनंती

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. ५ श. १६१७ आश्विन शुद्ध ५	५६	श. १६१७ आश्विन शुद्ध ५ इ. १६९५ आक्टोबर २

राजश्री सूर्याजी पाटील व रामाजी कुलकर्णी प्रगणे देगांव बुद्रूक प्रांत मोहोळ यांसी समस्त पांढर जमा होऊन लिहून दिधले जे धामधुमीमुळे श्रींच्या मूर्ति बडव्यानी तुमच्या गावास लश्करचा उपसर्ग न लागावा म्हणून आणिल्या आसिया समयास तुम्ही दिलात घेतेवेळी श्रींच्या मूर्ति आवघ्या पांढरीच्या असता तुम्ही काय निमित्त मुरती आणिल्या यास्तव आम्ही समस्त गांव आल्यावाचून मुरती ठेवण्यास आज्ञा देत नाहीं यावरून गोपाळ भट बडवे यानी तमाम गांव जमा करून सर्वांस हकीगत बोलिले आवघे चुडकरी व ब्रह्मवृंद व शेटे व महाजन वाणी बकाल व तमाम गाव याणी विचार केला कीं देव बडवे याचा त्याणी पाहिजे तिकडे न्यावा त्याजवर गावानी दुराई होऊ नये असे म्हणे मग गोपाळभट बडवे म्हणाले तुम्ही पाटील कुलकर्णी यासी लिहून द्यावे मग सरवाचे विचार हे लिहून दिले मिति शके १६१७ आश्विन शुद्ध ५ बीकलम

आपाजी ताठे	वामनभट बिन तात्याभट	शामजी हरदास
सदाशिव हरि कोमटी	शेशंभट	नागू राहासापा
नागना शेट	हरभट बिन सदाशिव पुराणीक	आण्णाजी उद्धव
पांडोबा फाले	बाळकृष्ण विठल ताठे	भुजंगप्पा शेटे
मारुती न्हावी	गणूबाबा रामदाशी	गजानन आवसरी
दाजीबा लाड	गोपाळभट आराध्ये	मारुती गोपाळा
लपबा सुतार	सखाराम बिन राजबा सुतार	
जोधराम मारवाडी	दयालदास बेरागी	
गरमा जाधव	पांडुरंग हरि	
कासीनाथ नवी		

ले. ६ श. १६२१ कार्तिक शुद्ध १	५७ श्री	श. १६२१ कार्तिक शुद्ध १ इ. १६९९ आक्टोबर १३

राजश्री सूर्याजी पाटील मौजे देगाव प्रांत मोहोळ याशी

अवघे लिहून दिधले आम्ही लश्करचे धामधुमीमुळे श्रीच्या मुरती तुमचे घरी ठेवून सुसरुपा करून होतो पुढे धामधूम शांत जाहाल्यावर आम्ही श्रीस घेऊन चाललो त्यास तुम्ही बोलिला जे तुम्ही आम्हांस श्रीदेवास नेल्याचा कागद लिहून द्या असे बोलिल्यावरून हा कागद लिहून दिधला सही कार्तिक शुध्र पाडवा शके १६२१

स्वहस्त नारो गोविंद बडवे	प्रल्हाद शिवाजी बडवे
गोपाळ विठल बडवे	स्वतहा सदोबा बडवे
हस्ताक्षर नरहर रामाजी बडवे	सही तुळशीराम बडवे
हस्ताक्षर धोडू नानाजी बडवे	

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. ७ फ. ११२१ रमजान २१ ⎫ ५८ ⎧ श. १६३३ आश्विन वद्य ८
श. १६३३ खर आश्विन वद्य ८ ⎭ श्रीपांडुरंगदेव ⎩ इ. १७११ आक्टोबर २३

[आरंभीं व शेवटीं फा. शि. व मो.*]

कौलनामा समस्त बडवे क्षेत्र पंढरपूर प्रगणे कासेगांव सुा सन ११२१ कारणे कौलनामा ऐसा जे देशमूख व देशपांडे प्रगणे मजकूर हुजूर येऊन जाहीर केले जे श्रीस सिव्हांसनी बैसवावा मोहोच्छाव राहिला आहे जैसा सुदामद चालिले तेणेप्रमाणे चालविले पाहिजे म्हणोन अर्ज केला बराये अर्ज खातिरेस आणुनी तुम्हास कौल दिधला आसे तुम्ही देव सिव्हांसनी बैसवून मोहच्छाव करणे आपली खातिरजमा राखोनी जैसे सुदामद चालिले आहे तेणेप्रमाणे चालऊन कोणे बाबे शकआंदेशा न धरणे दरी बाब कौल असे

तेरीख २१ माहे रमजान शके १६३३ खरनाम संवत्सरे आश्विन वद्य ८

ले. ८ फ. ११२५ ⎫ ५९ ⎧ श. १६३७ भाद्रपद वद्य १२
रमजान २५ ⎭ श्री ⎩ इ. १७१५ सप्टेंबर १३

[आरंभीं व शेवटीं फा. शि. व मो.*]

कौलनामा समस्त बडवे क्षेत्र पंढरपूर सूर सन ११२५ दादे कौलनामा ऐसा जे तुम्ही हुजूर येऊन जाहीर केलेवरी श्रीदेवास सिव्हासनी बैसवावयाची श्रीची आज्ञा आसे तरी सुदामतप्रमाणे देव देवळात बैसऊन देवाची शेवा करून सुखे आसणे कोणे बाबे शक न धरणे दरी बाब कौल आसे जानिजे ताा २५ रमजान

ले. ९ रा. श. ४३ दुर्मुख ⎫ ६० ⎧ श. १६३८ मार्गशीर्ष शुद्ध १२
मार्गशीर्ष शुद्ध १२ गुरु ⎭ ⎩ इ. १७१६ नोव्हेंबर १५

[आरंभीं व शेवटीं छ. शाहूचा शि. व मो. आणि मजकुराचे डावे अंगास प्रतिनिधि व प्रधान यांचे शि.*]

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४३ दुर्मुख संवत्सरे मार्गशीर्ष शुद्ध द्वादशी गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी यांणी समस्त ब्राह्मण पुजारी बडवे व मोकदम शेटे माहाजन वाणी उदमी क्षेत्रवासीक क्षेत्र पंढरपूर यासी दिल्हे अभय-पत्र ऐसे जे स्वामीची स्वारी या प्रांते जाली आहे क्षेत्रास उपसर्ग लागेल म्हणोन तुम्ही भये धरितां हे वर्तमान विदित जाले त्यावरून स्वामी कृपाळू होऊन हे अभयपत्र सादर केले असे तरी तुम्ही कोण्हीही भये न धरितां गांवावर राहाणे कोण्हेविसी उपसर्ग लागणार नाहीं अभय असे [नि*]लेखनालंकार

रूजू खाजगी मंत्री
सुरू सूद बार बार

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

४ संकीर्ण पत्रें

[या प्रकरणांत मी एकूण २३ लेख प्रकाशित करीत आहे. हे ज्यांनीं दिले त्यांचीं क्रमवार नांवें अशीं—१, १९ नळदुर्ग देशमुखांतर्फे श्रीमती यशोदाबाई चित्राव; २ मीं स्वतः इ. १९४० मध्यें नकलून आणिला; ३ कै. नारायण माधव परशुरामी–मुंबई; ४, ५, ७, ८ खोपडे देशमूख–अंबाडें; ६ डॉ. सुनीतिकुमार चतर्जी–कलकत्ता; ९ श्री. गोपीनाथपंत पोतनीस–भोर; १० श्री. गंगाधर मुनीश्वर–कोल्हापूर; ११ श्री. वामन त्र्यंबक आपटे–जमखंडी (सारवाडांकडील पत्र); १३, २०, २१ श्री. बाबूराव रावजी देशमूख–नासिक; १२, १५ सरदार दि. ब. एस्. जे. देशमूख–अलमेले; १४ श्री. तुकाराम रामचंद्र ठाकूर–पुणें; १६–१८ श्री. फकीरजी फडतरे देशमूख–खटाव (उत्तर सातारा); २२ एलिएनेशन कचेरी–पुणें; २३ हें पत्र मला कुठें मिळालें तें आतां ध्यानांत येत नाहीं. हीं पत्रें अशीं विविध ठिकाणीं मिळाल्यानें व तीं स्वतंत्र मथळे देऊन छापणें लाभकारी नसल्यानें एकत्रित करून 'संकीर्ण' या मथळ्याखालीं दिलीं आहेत. यांतील, कांहीं लेख मला मिळून दीड तपही लोटलें आहे. यांपैकीं क्र. २० संबंधीं एक लेख मी इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्ड्स् कमिशनच्या दिल्ली अधिवेशनांत (इ. १९४८) वाचला होता.*]

ले. १ हि. ९७२ रबल २३	६१	श. १४८६ कार्तिक वद्य १० इ. १५६४ अक्टोबर २९

[आरंभीं ३१ ओ. फा. मज., त्याखालीं दोन शेरे व ७ शि.*]

ार्द फुर्मान हुमैयुनु शरफे निफाद याफ्त बजनिब मलिक सर्क खोज न्यमतुल नैब गैबत व कारकुनानि हल व इस्तकाबाल किले स्यहदुर्ग व मोकदमानि व रेया व बराया कसबे व कर्याती व मुजाफती किले मजकूर आ की मन्हमाति आलंमपंन्ह व आतिफते खोसरोंना करुहनू सरदेसाई चैधरगी व देसाकुळकर्णींगी किळे मजकूर व मुजाफती त्यची बस्मे मुदगळ बाचूजींसी मिरासी करउनू फर्माविळे आसे

किळे मजकूर

कसबे मजकूर	कसबे आणुदूर	कसबे मोरब
मौजे अचळेर	मौजे आळूर	मौजे जवळकोट
मौंजे जोळद आस्टे	मौजे कधेर	मौजे हूविन सळगरा

बाजे देहये कर्यांती बाळघाट वगैरहू

पा आकुळकोट	पा महिधरा	पा गुजोटी
तंपे पागरी व धरसीव	तंपे ढोकी	कसबे तेर
कसबे आपसिंगे	पो अलंद	कजबे मणूरु
	कसबे माहेवाळ	मौजे अरलकरंजी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तरि तुम्हि मुद्गळ बाबूजी मस्यरानुळे यासी देसाई चैधरी व देसाकुळकरर्णि माहळत मजकुरीचे येसे जाणोउनू देसाई चैधरिगी व देसाकुळकरर्णि मीरासी मुद्गळ बाबूजी मस्यरानुळे याचे आवळाद् व आफुवाद् याचे दुबाळ चंद्रे सूर्या आसे तव परियत्रि चाळविजे माहळाते मजकूर जफ्त करउनू दिजे विळायतिचे रयतिमाजे यासि कोणसी सिरजोरी व सरकसी करू ने दीजे देसई चैधरिगी व देसकुळकरर्णिगीचे काइदा बरवे रीती हकहुर्मतीने चाळवीत जाणे विळायति मजकुरात् मस्यरानुळे याचे गैर इजुकुके काही काम व मोहीमाती व बिराडे व तकसीम व कलमे व मुनसिफ़ू वगैरहू करू ने दिजे देसाई चैधरिगी व देशकुळकरर्णेगीचे लाजिम व विस्वा व बाजे बाबहा मस्यरानुळे याचे आवळाद् व आफुवाद् दुबळ किजे देसाई चैधरगी व देसकुळकरर्णेचे मोहिमति मस्यरानुळे याही चाळविजे मस्यरानुळे याचे हुर्मत व काइदा बरवेपरि चाळविजे हरयेक मोकद्‌मासी व रयतमाने विळायति मजकुरा कुळासी ताकिदी करणे जे मस्यरानुळे यासी येउनू भेटितो विळायति या कुल कैफुती पेसजींचे व दरी वस्तीचे तमामू मस्यरानुळे यासी माळूम करिती याविशी बहु ताकिदी जाणिजे लाजिमे गाऊ-खेडी व पासोडी व विस्वा व मोहनाळि वरकडील दुबाळ किजे हे फुर्मान हुमैयुनीचे ताळिक लेहुनू घेउनू आसळी फुर्मान हुमैयून परतुनू दीजे बा। फुर्मान हुमैयून रवद्

तेरीख २३ माहे रबिलैवळू इसने सबैन

पा बिमोजीब रोख़ बसिके खाने अलिशहन केशवरखान वाजिर हुकूमत

तेरीख २३ माहे रबिलौवळ इसने सबैन

सुरू बार सुर्थीक

ले. २ } ६२ {

[वेरूळ (औरंगाबाद) येथील घृष्णेश्वराच्या देवळाच्या तटांत आंतल्या बाजूस पुढील तीन शिलालेख आहेत.*]

[१] सेवक येकोजि जैतोजि भोसळा

[२] दास माळोजि बाबाजि व विठोजि बाबाजि भोसळे

[३] सेवक आऊजि गोविंद हणवत्ये

ले. ३ सु. १०२३ } ६३ {श. १५४४ आश्विन वद्य ९
जिल्हेज २२ } [अ. फा. शि*] {इ. १६२२ आक्टोबर १८

अज रख्तखाने खुदायेवद् मा। सर्क मा। अबर खुलीद्‌याम दौलतहू बजानेबू कारकुनानी ता। कोतुल बिदानद् बा। सलास इसैन अलफ़ भुळो त्रिमल सो। का। मजकूर हुजूर माळूम केले जे ता। मा।चे जोतीस व कुलकर्ण आपली मिरासी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सालाबाद चालवीत होतो माहाली देसमुखी हरकती करून आपले देसमुखीबराबरी आपले कुलकरण वाटुनू गैरमिरासी बोपाजि केऊदेऊ त्यास निमे दिधले आहे म्हणौउनू मा केले तरी मिरासीदाराची मिरासी गैरमिरासियास देणे काये दुरुस आहे आता बा काजी हाकिम सरा सदरहू अमल खातिरेस आणौउनू बर हक गहदम सालाबाद चालिले असेली तेणेप्रमाणे चालवणे निर्वी जिकीर न करणे ये बाबे पेसजी निवाडियाचे खुर्दखत सादर आहे ते तेणेप्रमाणे अमल करणे निवडिलिया अमलास हरकती करून मालुमातीचे खुर्दखत आणील त्यास मवसर पाहोनू गुन्हेगारी घेणे मफलीस असेली तरी पाचसे जेरबद मारणे दादनी काजी ताजदीन व अबदुल सतार [नि*] छ २२ माहे जिल्हेज [ब. मो.*]

ले. ४ सु. १०२८ जवल १८	६४	श. १५४९ पौष वद्य ५ इ. १६२८ जानेवारी १५

[आरंभीं शि., १२ ओ. फा. मज. व खालीं २ शि.*]

अज दिवाण रा खा बजानेबू कारकुनानी हाल व इस्तकबाल अमानत व अजहती मुकासाई ता रोहिडा चिदानद सुा समान इा अलफ हेजीब नरसोजी व धर्मोजी देसमूख ता उतरवली ता मा बंदगी हजरती मालूम केले जे ता मजकुरीचे देसमुखास इसाबती मोजे नाक्षिरे कुल बाब कुल कानू व गावगना हकलाजिमा व साहाणे-सारी व इनाम सेते व वर्ताला मौजे नेरिया कुबथल सेत मौजे खानापूर सेत वडखल सेत उबर सेत उतरवली सेत चिरडी व देसकुलकर्णी ता मा यास इनामती व हकलाजिमा व सेटिया हकलाजिमा व इनामती गावगना मोकदम व चलुते व चौगले व पाडेवार या नफरास इनामती व हकलाजिमा सालाबाद कारकिर्द दर कारकिर्द भोगवटा: तसरुफाती चालत आहे व खुा मा शा मा अबर सन तिसा अलफू आहे सन सबाकारणे हुजुरुनू हुकुमती रोखा छ······माहे······सादर आहे तेथे रजा जे ता मा देसमूख व देसकुलकर्णी व सेटिये माहाजन व गावगना मोकदम व चलुते इनामती व हकलाजिमा खातातो यास हुजती गैरहुजती येकदर जाचिता देणे बा फर्मान व देणे वजिरानी येसा जाचिता हुजूर पाठविने जाब सादर होईल तेणेप्रमाणें अमल कीजे म्हणोन रजा त्यावरून माहाली कारकुनी इस्कील केली आहे जे तुम्ही आपला हेजीब हुजूर अलमपन्हाचे बंदगीस पाठउनू ताजा फर्मान घेउनू येणे बा फर्मान दुमाले होईल म्हणौन इस्कील केली आहे तरी साहेबी नजर अनायेत फर्मान माहालास फर्मान सादर करावया रजा होये मालूम जाले बा इशारती दिवाण आला बराये इलतमेस देविले ता माचे देसनुखास इसाबती मौजे नाक्षिरे कुल बाब कूल कानू व गावगना हकलाजिमा व साहाणेसारी व वर्ताला सेते सेत कुबथल मौजे नेरिया सेत वडखल मौजे खानापूर सेत उबर सेत चिरडी उतरवली व देस-कुलकर्णी यास इनामती व हकलाजिमा व सेटियास इनामती हकलाजिमा व गावगन

CC-0. Agamnigam Digital Preseyation Foundation, Chandigarh

मोकदम व चौगले व बळुते व पांडेवार या नफरास इनामती हकलाजिमा बाा सालाबाद व बाा खुाा माा शाा माा अबर दुमाले केले आहे तेणेप्रमाणे दुमाले कीजे बाा भोगवटा तसरुफाती ताा सन सबा इसरीन जैसे चालिले असेली तेणेप्रमाणे चालविजे दर हर साल फर्मानाचा उजूर न कीजे तालीक घेउनू असेली फर्मान फिराऊन दीजे मोर्तब
[ब. मो.*]

तेरीख १८ माहे जमादिलावल — रुजू
जमादिलौवल — रुजू सुरनिवीस
[पाठीवर*] पौ छ १७ माहे जमादिलाखर

ले. ५ हि. १०४७ जखर २९ सु १०३८ } ६५ { श. १५५९ मार्गशीर्ष शुद्ध १ इ. १६३७ नोव्हेंबर ७

मुहम्मद आदिलशाह → रोहिडा किल्ल्याचे कारकून

सध्या ध्यानास आलें कीं, नरसोजी खोपडे देसाई किले रोहिडा यानें कष्ट करण्यांत कसूर केली नाहीं. चंडखोरांना शासन केलें. म्हणून त्यास किले मजकूरच्या अमलांतील अंचाडें हें गांव सर्व बाबींसह इनाम दिलें आहे. तरी तें त्याच्या ताब्यांत द्यावें आणि वंशपरंपरेनें त्याजकडे चालवावें. याची नकल घेऊन असल परत द्यावें. सु. १०३८ हि. १०४७ जखर २९. हुजूरच्या परवानगीनें व वझीरे हुकूमत इखलासखान याच्या माहितीनें.

ले. ६ सु. १०३९ रवल ३ } ६६ { श. १५६० अ. श्रावण शुद्ध ४ इ. १६३८ जुलै ५

महजर बतेरीख ३ माहे रबिलावल (?) बिहुजूर हाजिर मजालसी पाा...

राजश्री दादाजि कोनुदेऊ	बापूजी मुदगल हवालेदार
शुभेदार नामजाद किले	पाा मजकूर
कोंडाणा व पाा पुणा	[वा. शि.*]
व माहालानिहाये	बापूजी निगावान
[वा. शि.*] दादाजी	गोमाजी राजे मोकासाई मौजे
कोन्देव········	म [अ. शि.*]
भानजी आऊजी	म्हाकोजी बिन तुक पाटेलू
मजमूदार पाा मजाा	झाबिरा मोकदम कसबे पुणा
मालोजी नरसिगराऊ	
व विठोजी सितोळे देसमूख पाा मजकूर	

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अतसेटी सेटिया का पुणा
नाइकवाडी चाकरठाण
मऱ्हाठे

राऊतराऊ जाचक	पदार्जी भालेराऊ	जनो कानडे
[कत्यारीचें चित्र*]	[कत्यारीचें चित्र*]	[कत्यारीचें चित्र*]

सुा तिसा सलासैन अलफाकारणे महजर यैसा जे गोमाजी राजे मुकासाई मौजे पिंगोरी पा मजकूर हे बिहुजूर माळूम केले जे मौजे मजकूर आपणासी मुकासा आहे तेथील मोकदमी चादजी सिदा करितो तेणे गाव खराब पाडिले आहे व जे प्रज येते तीस रंजीस करुनू गाव लागो देत नाही व हरकती करुनू रासती कमावीस करू देत नाही गैरेविसी वर्तुणुकेने वर्ततो तरी त्यासि हुजुरू बोलाउनू सदरहू अमल मनासी आणौनू मौजे मजकुरीची सचणी लावणीची विले केली पाहिजे व चादजी मजकुराचे वडील भाऊ वाघोजी त्याचे फर्जंद व कान्होजी बिराजर वाघोजी यासि आणौनु मौजे मजकुरीची किर्दी मामुरी केली पाहिजे म्हणौनू मालूम केले

[वरील प्रमाणें तक्रार गोमाजी राजे यानें मांडली. त्यावर हाजीर मजालसीनें या प्रकरणाची चौकशी केली. वास्तवीक चांदजी शिंदे हा वडील घरचा नसल्यामुळें मोकदमीवर चांदजीचा सर्वस्वी हक्क पोहोचत नाहीं, असें मालोजी व विठोजी शितोळे देशमुखांनीं सांगितलें. चांदजीनेंहि ही गोष्ट खरी असल्याचें व मोकदमीवर आपला वडीलकीचा हक्क नसल्याचें कबूल केलें. भिलोजी, कान्होजी व चांदजी या तिघांनीं मोकदमी वाटणीनें खावी असा निर्णय हाजीर मजालसीनें दिला.*]

ले. ७ सु. ११४० } जखर १२ }	६७ [फा. म.*]	{ श. १५६१ आश्विन शुद्ध ४ { इ. १६३९ सप्टेंबर ३०

[कौलू] नामा अज दिवाण किले रोहिडा ताा केदारजी फर्जंद नरसोजी खोपडा देसाई ताा (= तर्फ) उत्रोली किले मजकूरू सुहूर सन आर्बैन आलफ दादे कौलूनामा यैसा जे ताा (= तर्फ) मजकुरीचीं देसगती तुवां करीत आसतां खंडोजी फर्जंद धर्मोजी खोपडा तुझा वारिसदार हुजूर येउनू उभा राहिला जे निमे तकसीम आपली आसे बरहक त्यांची व आपली मुनशफी करून निवाडा केला पाहिजे म्हणौउनू माळूम केले त्यावरून गावगाना पटेल व खोत दुतर्फ व बलुते व हकजवार येसे किले मजकुरीं मेलउनू बरहक मुनशफी करून तेणेप्रमाणे माहाजर करून दिधला असे तेणेप्रमाणे तुवां आपले इसापर्तीचे देह २ मौजे नाझिरें कदीम वा मौजे अंबाडिये हाली रुा[1] फर्मान व पालक सेतें व हकलवाजिमा वा गाऊखंडी गावगाना वा बाजे

---

१ या संक्षेपाबद्दल फार्सीत ' मर्हमत बर हुक्म ' असे शब्द आहेत.

च्याा (= बरहुक्म) सालाबाद भोगवटा रुा साल गुदस्तांप्रमाणे दुंचाला केले असे तेणेप्रमाणे घेउनू दिवाण नफराई करून देसगती नागर निशान वडीलपण चालउनू सुखे असिजे आपले बिराजरादेखील बाा (= बरहुक्म) माहाजरप्रमाणे हकलवाजिमा दुचाला केला असे तुझे मवसर हाल पाहून सिर्णी होनू ९०८ नवद तुज करार के [ली असे] उसूल करून सुखे असिजे कौलू असे [प. मो.*]

तेरीख १२ माहे जमादिलाखर

ले. ८ सु. १०४१ } ६८ { श. १५६२–६३ इ. १६४०–४१

किले रोहिड्याच्या कचेरीकडून कोंडजी बिठोजी खोपडे मौजे अंबाडें इजाफत देसाई तपे उतरवळी किले मजकूर यास शुहूर सन इहिदे अर्बैन अलफ यांत कौल देण्यांत येतो कीं, हुजुरास माहीत झालें कीं, या पूर्वी जायणा पंडिताचे युद्धांत विठोजीच्या फिरंगाबाबत ... आतां माहित झालें. म्हणून तुला हुजूर आणवून किल्ल्याचा दरवाजा करून दिला. नंतर तुझे बाबतींत केदारजी देसाई तपे मजकूर यानें विनंति केली कीं, कोंडजी जुना चाकर आहे......लढाईत कोंडजी मजकूर फिरंग पाडाव झाला होता. स्वतःबरोबर उपर्युक्त पंडित तिकडून सुभेदार होऊन आला होता. नरसोजी नायक कोंडजी समोर फिरंग घेऊन [तो] उपर्युक्त पंडितास देऊन, दुसरें कांहींही न देतां......नफर मजकुराचे या पूर्वीचे गुन्हे माफ करून साहेबांनी नफर मजकुरास दरवाजावर नेमिलें होतें. पूर्वीच्या गुन्ह्याबद्दल १३० टांक (टक्के) घेऊन पूर्वीचे सव गुन्हे माफ केले आहेत. तूं स्वस्थचित्त होऊन उपर्युक्त गांवावर जाऊन......असावें. प्रत्येक बाबतींत तुझी योग्य ती व्यवस्था केली जाईल.

ले. ९ सु. १०४४ रखर १९ } ६९ तालीक { श. १५६५ आषाढ वद्य ५ इ. १६४३ जून २६

अज रख्तखाने खुदायेवंद खाने अलीशान खाने आजम रुस्तुमे जमा खुलिद्दयाम दौलतहू बजानेब कारकुनानि पाा वांई बिद्दानद सुाा अर्बा आर्बैन अलफ खंडोजी वा लखमोजी देसाई तरफ उतरवळी किले रोहिडा हुजूर येऊन मालूम केले जे आपला चुलत भाऊ नरसोजी त्यास निमे देसगती गाऊ १० वा निमे आपली देसगती गाऊ १० येसे सालाबाद कारकिर्दी दर कारकिर्दी भोगवटा चालिला आसता हाली हरकती करून चालो देत नाही त्यावरी आपण त्यासी वेव्हार केला त्याणे थली जमान नागोजी नाईक माडरे वा रायाजी नाईक माडरे वा सूर्याजी नाईक वेल्हेरीकर यासि जमान दिधले की थलास जाऊन निवाडा करावा आणि थलास येऊन निवाडा करीत नाही तरी साहेबी माहालीच्या कारकुनास खुर्दखत देविले पाहिजे की सदरहू जमानदारास ताकीद करून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नरसोजीस थळास पाठऊन आपला निवाडा होये म्हणौऊन मालूम केले तरी सदरहू जमानदार ठाणिया आणौऊन ताकीद करून नरसोजीस थलास पाठऊन हर दो जण निवाडा करून घेतील आगर रोहिडाच्या कारकुनापासि पाठऊन देणे तेथे जमानती करुन हर दोघा जणा निवाडा होईल मोर्तुबू

तेरीख १९ माहे रबिलाखर

ले. १० मु. [१०]५८ जिल्काद १	७० माहालक्षुमी प्रसन	श. १५७९ श्रावण शुद्ध ३ इ. १६५७ ऑगस्ट २

०॥ई सौजनेसिधु सिरोमणि माहाराज राजमान्या राजाधिराज राजेश्री नारायेणभट व तमणभट मुनेस्वर श्री—— मोकाम का। कोल्हपूर गोसावी यासि प्रीतिपूर्वक नेमगौडा व लखमगौडा पटेल व सोनजी चौगुला व सचसेती सेटिया व केचसेटी माहाजन व राऊजी भास्कर व लिगोजी वेंकटाद्रि कुलकर्णी व केदार दिड व पालजी बोद्रा व फिरगोजी वालगुडा व सदोबा मनजा व भिकणा दारणा व कोडसेटी व जायेसेटी कोला व माकसेटी सितलेकर व मद्णा ढोणा बकाल व शकराजी ...... व सरस्वती व दादाजी मुकसुदा व मुकद चाटे व चिकोबा कोडिवली व हरी वाडेकर व अताजी दादजी परडे सराफ व खूम सोनार व खूम कासार व मसलेटी मेहतर व कोडसेटी व माहादेऊ—अकणा तेली व नरसेटी मेहेतर व रगदेऊ पेठ यैनापूर व खूम शाहपूर व येलसेटी व जुलाई पेठ सिदापूर व रवलसेटी पेठ पद्मपूर व लखमसेटी व येडवणाली पेठ इभरापूर व हणगो मेहतर पेठ हिरापूर व बकाल समस्त पेठ फतेपूर लखमपूर व बाजे खूम खूम मुजेरी व मोहतरफा व समस्त चकुतेयानि का। मजकूर सु॥ समान खमसैन कारणें लिहून दिल्हें यैसे जे श्री—देवासी नवैदबदल सादिलवारात होनू १०८० माहतकदम कारकिर्दी दर कारकिर्दी चालिले असें दरम्यानें खळेल होउनू राहिले याकरिता गावासी व आपणासी बहूत पीडा जाहाले मग देसक पा। मा। व अमी समस्त गावलोक मिलोनू साहेबासी अरदास केले जे अमचे गावाचे देव यासी नवैद बहूत काल चालिले असें जेठाउनू नवैद मना जाहाले तेथून समस्त नगर व अमी पीडिलों साहेबी समस्ता पंचजगावरी नजर ठेउनू सालाबाद होनू १०८० नवैद चालतो तैसे चालवाव्या निरोपू देणे मंग साहेबी खातिरेसी आणऊन खुर्दखत करून दिल्हें अता येथून सालबादप्रमाणें सादिलवारात होनू १०८० वरगून देउनू यासी जो कोणी हिलाहरकती करील तो गुरुद्रोही व मात्रद्रोही व श्री——देवाचे अन्यायी असे हे लिहिले पत्र बतीस वोली [नि*] मोर्तबू सुद [नि*] तेरीख छ १ माहे जिलकाद [प.*]. मुरत्तब शुद माहे जिलकादी

[पत्राच्या डाव्या बाजूकडील समासांत पुढील शेरे*]

[१] बा। त्रिबक रमदेऊ हवाले सरदेसगती पा। कोल्हापूर [२] रवळोजी वा परमणा देसाई वा कळो रुद्र देसकुलकर्णी का॥ हवेली पा। मा। [३] नेमगोडा [का*].

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नेमगोडा [नांगर व तागडी यांचीं चित्रें*] [४] म्हाजन भांजी दबडघाऊ [शिवाय १ व २ या श्रेन्यांमध्यें वाटोळ्या फार्सी शिक्क्यांत*] मुकुंदराव आनंदराव आदिलशाही बन्दह दर्गाह इलाहो [असा मजकूर*]

ले. ११ } ७१ {
हू

खान आलीशान सादतनिशान रफिआलकदर वलबुलंदमकान खान हुकूमतपनाह खानसाहेब सलामत

वाजिबुल आज खैरआंदेश [मो. जा.*] बाजद सलाम मोहबत आंजाम साहेची आपुले ह्वानामा मरसूल करु[नू] सरफराज फर्मावणें साहेब सलामत साहेची मौजे बेनपूर शाहार हासनाबादचे पटेलबाबे खान अलीशान अजीजखान वा जसवंतराऊ यासी हुकूम फर्माविले जे पटेलास र—न देविजे म्हणऊन साहेबाचे हुकूम बरनिसचत सागून पाठविले साहेबाचे हुकूम सिरदादे कबूल केलो हुकूमखेरीज नाही साहेब सलामत आमचे आहवल साहेबास बेहतर रोशन असे जीनतमकानी स्वार जाहलेवरी साहेबाचे पनाह असे पाहून साहेबाचे हुकुमेवरी खिजमत कबूल करून राहिलो नाही तरी जीनतमकानी साहेब जे वख्त स्वार जाहले तेची वख्त अम्हासी दुनियाचे वास्ता साडिले होते साहेबाचे करमनजर पाहून साहेबीच दिलासा दिले पटेलानी तरी हरामखोरी करून तीनी च्यार साल खलेल करून गला लुटिले वा गावावरी बाकि ठेविले हरामखोर पाहून हुजूर आणिलेवरी होंन २००० देणे येसे कतबा घेऊन येकजण हरामखोरास हजरत जीनतमकानीचे परवानगी गर्दन मरणेची घेतले होते करारतीचे उसूलबदल जनान देऊन ततबीर करीत होते वा साहेबासही माळूम केले होते साहेबीही हुकूम दिले होते गावामधे साल मजकूरचे पैके होन १५०० व गला खंडी २०० तैसेची राहिले उसूल होणे तव साहेबी मौजे मजकूर दुसरेसी रवा सुदगी केले साल मजकूरचे गलाबाा नक्द व करारतीचे पैके तैसेच राहिले साहेब सलामत आमचे वा कबिलेचे आहवल साहेबास रोशन होते येसे आम्हास काये दिले होते आम्हास च्यार गाऊ व कबिलेसी तीनी गाऊ इतुकेवरी आनरोटी करून होते येसे काये हरामखोरी केले होते जे खाहेबी अवघा गाऊ काडिले खवासखानतागायेत खुदायेतालापासी तुम्हाबाबे द्वा करीत होतो आमचे मुदा बरनिसबत साहेबास कबूल हे मरतबा आहासविले साहेबाचे पनाह रकम नजर जाहलेवरी दुनियाचे काये तमा असे दुनियाचे तमा साहेबाचे करमवासते धरावे आता साहेबी हजरतसाहेबास लिहून रजा देविलेया साहेबास द्वा देऊन दुनियाचे हौस साहेबाचे बरकतेनें जितुके पाहणेचे पाहिले जाजती लिहिणे आदाजा म्हा दीगर अर्ज साहेब सलामत पटेलानी कतबे दिले ते येन जिनस आम्हापासी आसेति पैके उसूल करणे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पटेलानी पाठविले होते इतुकेमधे मोकासा रवासुदगी जाहले साहेची तरी बाा कतबे आणवऊन आपुले सरकारास जमा करवणे साहेबाचे रजा जाहलेया कतबे पाठऊन देऊन साहेब आरीफ आसा दीगर साहेब सलामत साहेबाने मसलहत जाहलेवरी दोनी महिनेने आमचे गाऊ आम्हास मोकरर करणार तरी पटेलास बहूत मशकत करून धरून आणिळे आसे यामधे येकजणास गर्दन मारणेचे असे दोघास जमान घेऊन पैकेचे सरंजाम करून सोडणेचे आसे गावास चौघ पटेल याकरिता दिवाण व रयेत रजीस धरून आणिलेवरी गावीचे तलब ताहसील राहिले नाही जरी साहेब मोकरर करणार असलेया बरवे पटेलाचे सुटका जाहलेवरी गाव ... नाही नाही तरी गावीचे पैके व करारतीचे पैके...साहेबाचे रजेखेरीज नाही.

[फा. सि*] हजरत मजालशाह

ले. १२ सु. १०७३ रखर ९	७२ [२ फा. शि.*]	श. १५९४ श्रावण शुद्ध १० इ. १६७२ जुलै २४

रुजू निघावान

अज दिवाण ठाणा पाा अलमला ताहा मोकदमानी मौजे बोबलेस्वर पाा माा सुहूर सन सलास सबैन अलफ दरी विला खुर्दखत बतारीख २२ माहे रबिलौवल पौ छ ९ माहे रबिलाखर रजा जे जगदेऊ देसाई पाा माा यासी हुजूर बोलाऊन सरफराज करून इनाम मौजे बोबलेस्वर पाा माा देखील माहसूल नख्तयाती वा जमी उाा कुल बाब कुल कानू खेरीज इनाम अज रा मरहामत करून दिल्हे असे दुबाला कीजे तालीक लिहून घेऊन असल परतुन दीजे हर साला ताजा खुाचे उजूर न कीजे पाा हुजूर राा इजतमाब हसनखान सरखेल हामबक म्हणऊन तरी बरहुकूम खुर्दखत मौजे माा इनाम देसाई पाा माा यासी देखलि माहसूल नख्तयाती वा जमी उाा कुल बाब कुल कानू खेरीज इनाम दुबाला केले असे दुबाला कीजे तालीक लिहून घेऊन असल परतोन दीजे मोर्तब [प. मो.*]

तेरीख ९ माहे रबिलाखर

ले. १३ फ. १०८४	७३	श. १५९६–९७ इ. १६७४–७५

[आरंभीं उजव्या अंगास फा. शि. व त्या खालीं फार्सीत 'बर मज्मून हिन्दवी अमल नमूदह नूई कुनन्द कह मूजब अताब व खिताब न शवन्द ' असा मज.*]

संतजी देसमूख व मोकदम देहाये पाा सिनर सर[कार*] सगमनेर सुाा सन १०८४ मालूम दानद तुम्हास जमाबदी करावयास बोलाविले होते आनी तगाफुली करून दफुलवख्त करून राहिले तरी मोकदम घेऊन सिताबू हजूर येणं मातल न

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

करणं दिगर गेहू निर्ले ८॥।· वोंबी काढुणं वालऊन दाने घेऊन येणं व चणे हिरवे ८॥· करून घेऊन येन दिगर तहसील गनीमाची येक दाम न कीजे सिवाजीचे हरकारे व जासूस येथे आले होते वकीलही हुजूर आला आहे सुला जाला आहे खबर सर्त असे दिगर आणजी पोव्या मुजारा सोडिला की नाही हे खबर सिताबू पोहचावने दिगर सादिलवार... तहसील येक दाम न करणं जाहेर जालियां... होईल खबर सर्त असे मोर्तबू दिरग... यास लागेल तर अद्दी येईल [ख] बर सर्त कची असे वख्त तहसिलेचा आहे मो

ले. १४ } ७४ { श. १५९७
मोहरम १ } { इ. १६७५ पूर्वी

[आठ बुरजी शिक्यांत*] ... शिवच । ...णी तत्पर । ...बकसु । ...मोरेश्वर

...तुम्ही राजश्री माहादाजी यमाजी वकी...यास पत्र पाठविले तें वर्तमान मानिले...कलावयास बजिनस पत्रच पाठऊन दिल्हे...तील अर्थ अक्षरशाहा स्वामीस विदित जाले सारांश गोष्टी नवाबजीनी हजरतीस अर्जदास्त व थोरले नवाबास अपले पत्र दिल्हे आहे(नाही?) अपण येत्न करीत आहे म्हणून लिहिले तरी.... भरवसा स्वामीनी मानिला अहे तुम्ही किमर्थ न... वावेंत हाच हेत स्वामीसि अहिर्निस... आहे अणिखी काही नाही तुम्ही तेथें बहूत युक्तिबुधीने नवाब कार्यावरी येऊन हजरतीस अर्जदास्ती दे ते गोष्टी करणे म्हणिजे तुमचा मजुरा होईल व तुमचे खर्चचे बेगम...माानिलेस लिहिले आहे ते करितील जाणिजे छ १ मोहरम [प.*] मर्या । देवं रा । जते

ले. १५ } ७५ { श. १६०५–०६
सु. १०८४ } [डावे अंगास एकादशकोनी फा. शि.*] { इ. १६८३–८४

ई मोकदमलइमसाल जुबदतुलअमासिल वल येकरान लायेकुलमराहीम जगदेऊ गुरुसिदा देसाई पा आलमला माळूम बाद सुहूर सन आर्बा समानीन व आलफ दरी विला तुम्हा तर्फेचे मजकूर मशुरुल अनाम /क्रिस्णाजी गोविंद पंडित येही हुजरू सागितल त्यावरून माळूम जाहले तुम्ही या घराणेचे पिडीजादे मिरासदार असा बाजे मजकूर पंडित मशारनुले लिहिल असेती त्या बरनिसबत जबाब पाठऊन देणे यावरून सर्फराजी आसे [लं. व. मो.*]

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. १६ सु. १०८७ } ७६ { श. १६०८ फाल्गुन वद्य ८
रखर २२ } [श्री] { इ. १६८७ फेब्रुवारी २५

राजश्री साबाजीराजे घाटिगे देसमूख काा मलवाडी गोसावी यासि

दाा बाा रखमाजी फडतर देसमूख व मलारी कासी देसकलकर्णी पाा खटाऊ सुाा सबा सबा समानीन आलफ कारणे राजश्री [मो. जा.*] लेहून दिल्हे जमानकतबा यैसा जे राजश्री नागोजी तुकदेऊ देसकुलकर्णी काा नीबसोडे...व गाऊकुलकर्णी मौजे मुल...र व सिरसवडी तलबेचे गाऊ यासि जमान असो अजी सबब पंत मशारनुले राजश्री संभाजीराजे याकड चाकरी सुभा मााहाये करीत होते त्यावरी नवाब रणमस्तखान यानी दौडी करून जुझात पाडाऊ करून मिरजस आणिले तेथून बहु [जू] र हजरत पातशा साहेबापासी पाठविले तेथे हजरतीन मेहरवान होऊन सरफराज केले मनसफ देऊन मिरजस पाठविले की मनसफेचा जमान घेऊन खिजमत घेणे त्यावरून...साहेबी जमान मागितला पत मशारनुलेनी तुम्हास दिवाणात जमान दिल्हो तुम्ही अपला कतबा देऊन हाती घेतले याबदल माा पतास अम्ही आडजमान जाहालो असो यानी अपली मनसफ करून पातशाही चाकरी करून असावे ये बाबे आपणे जमान असो पातशाही खिजमतेस असतील येक वख्ती खिजमतेस गैरहाजीर होऊन गेलया हजीर करावे हजीर करू न सको तरी... तालकातीचे जाब करावे हा जमान कतबा सही [मोर्तब*]

तेरीख २२ माहे रबिलाखर

गोही

सभाजी पटेल मौजे खेडेर	निबाजी नाईक क...
काा वागी	गे पेठ रहिमतपूर
सिदोजीराजे कोली वाा	सताजी पोल
नागोजीराजे देसमूख ताा म्हैसवड	

ले. १७ सु. १०९५ } ७७ { श. १६१६ माघ वद्य ६
जखर २० } श्रीशंकर { इ. १६९५ फेब्रुवारी २६

[अ. वा. शि.*]

आज्ञापत्र समस्त सेनाधुरधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री सताजी घोरपडे सेनापती जफ्ततन मुल्क ताा मोकदमानी देहये

ताा उबरज देहये सुमार ३० ताा तारगाऊ देहये सुमार २४

येकूण देहये चौपन पाा कऱ्हाड सुाा खमस तिसैन अलफ माा पिराजी बिन चौडोजी यादव व पदाजी बिन अवजी यादव देसमूख देहये मजकूर याची देसमुखी इदलशाही कारकिर्दीस अनमानत केली होती त्यावर माहाराजे साहेबी मागो[न घेत]ली होती त्यास आजी ताा अनमानत होती हली माानुले चजीस जाऊन राजश्री छेत्रपति

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

स्वामीस विनंती केलियावर कृपाळू होऊन ता। मजकूरची देसमुखी त्याचे दुमाला केले असे यास सेरणी माथा ठेविली असे बि॥

चजीस राजश्री छेत्रपती स्वामीनी माथा ठेविली होन पादशाही २०००८.	राजश्री पंत अमात्य यानी सेरणी माथा ठेविली बेरीज रुपये ५०००८.

येणे प्रमाणे होन पादशाही दोन हजार व रुपये पाच हजार सेरणी माथा ठेऊन याची देसमुखी याचे दुमाला केली असे देहाये ५४ चौपन पैकी वजा गाऊ केले असे बि॥

मौजे चिमणगाऊ १ मौजे कडेगाऊ १ मौजे अहेरी १

येकूण गाऊ तीन बाकी देहये सुमार ५१ बि॥

ता। उबरज		ता। तारगाऊ	
१ कसबा	।किता देहये	१ कसबा	१...देस
१ हिंगनाले	१ बनपुरी डुग	१ अगापूर	१ वरसुली
१ इंदोली	१ अतीत	१ कोडिये	१ नागझरी
१ सासपड	१ कविठे	१ खोडीद	१ खराडे
१ चोरे	१ शाहपूर	१ पेरले	१ कालगाऊ
१ वडाली	१ नागठाणे	५	१ किरोली
भिकेश्वर	१ सिरगाऊ		१ वरने
१ वडिगाऊ सयेद	१ सिरवडे		१ कासील
१ कोरटी	१ वराडे		१ कोपर्डी
१ पाली	१ हेलगाऊ		१ वाठार बु
१ वरली	१ फणगाऊ		१ आर्वी
१ तासवडी	१ निगडी		१०
१ येणेगाऊ	१ किवले		
१२	१ रिसवड		सुभा कऱ्हाड
तरीज	१ अंतवडी		१ चऱ्हेगाऊ
२९ कि	१ वडाली निलेस्वर		१ पाचूद
१५ कि	१ चिखली		१ वाघेरी
४ कि	१ सिवडी		३
३ कि	१७		
५१			

सुभा वाई

१ उडितरे	१ कलंई
१ इडिमिडे	१ पाचवड
२	२

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येकूण देहये येकावन दुमाला केले अहे येणेप्रमाणे राजश्री छेत्रपती स्वामीचे सनद व राजश्री पंत अमात्य याचेही सनद आहे त्याप्रमाणे आम्हीही मातुलेचे दुमाळा केले असे तरी मा हकलाजिमा इनाम इसाफत पूर्वापार अहे तेणेप्रा तुम्ही देऊन याचे अज्ञेत वर्तत जाणे या पत्राची तालीक लिहून घेऊन असल परतून देणे हर साल ताज्या पत्राचा उजूर न करणे जाणिजे छ २० जमादिलाखर [मोर्तब*]

लें. १८ सु. १०९५ रमजान १२ | ७८ श्री | श. १६१७ वैशाख शुद्ध १३ इ. १६९५ मे १७

[शि. व मो. ले. ४ प्रमाणें*]

र्द मा अनाम पिराजी यादव व पदाजी यादव देशमूख ता उंबरज व तारगांव यासि रामचंद्र नीलकठ अमात्य सुहूर सन खमस तिसैन अलफ अज उरुही बा जमाई देहाये ता मजकरींची देशमुखी तुम्हास दिल्ही अहे अहे आणि सिर्णी तुमचे माथा ठेविली त्याची खिस्त साल मजकुरी तीन हजार रुपये येणे त्यापैकी हुजरून कापड उदमियाचे गुजारतीने जामदारखाना खरीदी केले होते त्याचे देणी त्यापैकी सदरहू यैवजपैकी तुम्हाकडे वरात दिल्हे चिा रुपये

१००० बावाजी गुडे
५०० नारावा नाईक [जेस्ते !]
२०० रामगिरी
३०० खडोजी रगारी
१०० गणावा नाईक नरगुदकर
१५० हरवा नाईक वाकडे
२५० हरिभट चिचवडकर

२५००

सदरहू अडीच हजार रुपये याची वरात देऊन पैकेच्या वसुलातीस भीक नाईक सेलका दिमती सभाजी पडवल पाठविला होता त्यास तुम्ही यैवज पाठविला खेरीज बखैर... घा नफर मजकूर व मखदूम भाई चाकर दिमती मजकूर दुकिते रुपये

६०० किर्तों बा कागद छ ३ रमजान रसीदगी छ ९ रमजान
९४७ किता खेरीज बखैर

१५४७

पैकी वजा पाडा व बहुडा व पारखे कद... रुस्णाजी नाईक पोतदार बा स्वारी मजकूर बा छ ३ रमजान चलणी रुपये ८५ यांसि पाडा दर ०।० येकूण रुपये २॥~। बाकी रुपये

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

५९७।-। बाा बरहुकूम बखेर
९४७ बाा खेरीज बखेर

१५४४।-।

यांसि जमा पोता बाा स्वारी मजकूर बाा जमा वर्क दुकिते रुपये

६०० छ ९ रमजान

५१५ खरे

८५ चलनी

६००

९४७ छ १ शाबान

१५४७

येकूण पधरासे सतेचालीस रुपये रास जमा जाले आरा हुजती सुद पंधरासे सवा चौतालीस रुपये दुवल ब्याल रास मजुरा असे जाणिजे छ १२ रमजान [नि*] निदेश समक्ष [मो*]

बार सुरू सूद बार

ले. १९ रा. श. ३९ नंदन पौष वद्य ३ मंद सु. [१११*] ३ जिल्हेज १६ } ७९ श्री { श. १६३४ पौष वद्य ३ इ. १७१३ जानेवारी ३

[आरंभीं दुसऱ्या शिव छत्रपतींचा अष्ट. आणि २ व ३ ओळींच्या डावे अंगास नीलकंठ मोरेश्वर प्रधान व परशुराम त्र्यंबक प्रतिनिधि यांचे अनुक्रमें ब. व लं. व. शि.*]

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शक ३९ नंदन संवत्सरे पौष्य बहुल त्रितिया मंदवासर क्षत्रियेकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति याणि सौभाग्यवती द्वारकाचाई यासि दिल्हे इनामपत्र ऐसे जे तुम्ही राजश्री रामचंद्रपंत पंडित आमत्य याची कन्या तुमचे लग्न राजश्री पुरुषोतमराव नरसिंह देशमूख पाा नलदुर्ग यासी देऊन समारंभेकडून लग्नोत्सव केला सांप्रत तुम्हास साडीचोलीबदल नूतन इनाम कुल बाब कुल कानू जलतरुपाशाण-निधिनिक्षप पाडिले पानसहीत खेरीज हकदार व इनामदार करून मौजे उपले रामनाथाचे पाा राताजन देह १ येक इनाम अज रा मन्हामत करून दिल्हा असे तरी तुम्ही मौजे मजकूर पूर्व मर्यादेप्रमाणें चतुःसिमा आपल्या स्वाधीन करून घेउनू इनाम तुम्हीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने अनभऊन सुखरूप राहाणे स्वामी तुम्हास इनाम सुरक्षीत चालवितील जाणिजे [नि*] लेखनालंकार ['मर्या । देयं विरा । जते' असा प. मो.*]

रुजू सुरुनिवीस

तेरीख १९ जिल्हेज सुाा सलास

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. २० जिल्काद ३ } ८० { श. १६४६ श्रावण शुद्ध ४
पौं छ १७ जिल्हेजी } { इ. १७२४ जुलै १३

श्री

विनती उपर येथील श्वस्तक्षेम ताा छ ३ जिलकाद जानौन तुम्ही आपले क्षेम हर घडी लिहीत जाने यानतर बहूत दिवस जाले पत्र न पाठविलें सबबही कलो आला की नाजमाची तगिरीतबदीरीमुळें येहतियात पत्राची केली असेल हें वर्तमान नाजमाचे आज शेनमास जाले की हर येक पत्री लिहीत गेलों आनि हालीहीं हर महिन्यांत दोन पत्रे पाठवीत गेलों पत्रें पावत्यात की नाही हे कांही कलत नाही घरचेही पत्र दोन मास जाले आले नाही येथील वर्तमान तर साबीकही लिा होते व हालीही लिा जाते की नवाब निजामनमुलूक नाखुश होऊन सिकारेची अज्ञा घेऊन मुरादेबादेकडे गडमुग्तेसरपरयेत गेले तेथून अर्जदास्त केली की मालव्यामधे दोस महमदाने व गनिमाने शोकी बहूतसी केली आहे अज्ञा होईल तर जाऊन बंदोबस्त करून हे सनिध असताच सुबेदारी पातशाहाजाद्याचे नावे केली नियाबत मुबारजखांचे नावे मोकरर करून फर्मान खिलत पाठविले मग यांसही अज्ञापत्र पाठविले की मालवियाकडे जाने आनि मुफसदास तंबी करने तेच घडीस यानी कूच केला ते मजल दर मजल दोस महमदावर गेले तेथेही दारमदार करून उजेनीस गेले तेथून बेहुकूम नर्मदा उतरून पार गेले आनि मुबारजखांसी मुस्तेदजंग जाले निमित्य यातराजी फर्माविली जागीरा हिंदुस्तानात पचेवीस करोड दाम तेथें पनास लाख वसुली होत्या त्या जप्त केल्या आनि पातशाहाजाद्यास दिधल्या मनसब पातशाहाजाद्यास वीस हजारी पधरा हजार स्वार मोकरर केला दिवान इनायेतुला मीर बकसी हमीदुदीखां वकील राजे किरपाराम तनबक्सी खानसामा बहुताद थैसे खिलत जाले वजारतही पातशाहाजाद्याचे नावे मोकरर करावी इनायेतुलाखां नायेब मोकरर करावे तजवीज होती महमद गाजदीखां पिसर निजामन्मुलूक व बख्तमदखां यास बोलावून अज्ञा केली तुम्ही आपल्या बापाजवल जाने येही अर्ज केला कीं आमचे अवलादीमधे पितापुत्रासी सखे असते या नसते हे हजरतीस जाहीर आहे आम्ही नौकर आहो जे काम फर्मावाल ते बिलाउजूर करून बापासी आम्हासी समध नाही बाप करे बाप पावे बेटा करे बेटा पावे मसला महशूर आहे त्याजवरून व खातरदास्त कमरदीखांची अज्ञा घरास जावयाची दिधली मोहर व कलमदान बाजिनस आनविले दसखत मना केले छ २ जिलकादी येतवारी कमरदीखांस वजारत असालतनचा खिलत जाला तमाम मोगलिये मुतफीक पातशाहाचे जाले येकले नवाबास निराले करून टाकले आनि मुसेबकी जाले की कदाचित मुबारजखांस दखल न दिधले तर आपण खुद जाऊन जिवंत धरून आनून गुजरातची सुबेदारी सरबुलंदखांस दिधली खिलत जाला नायेब सुजायेत अली तेथील मुतैन जबरदस्त साहेब जमीयेत आहे त्यास फर्माविली फर्मान गेला अमल दखलही जाला हमीदखां बाहेर पडले सिपाहाने तलबेसाठी तंग केलें आहे फर्मान हमीदखांस तलब हजूरचा गेला वकील तलाश नियाबतचा करितो परंतु होनार

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

नाहीं जौब जाला मालवा गिरधर बाहदरास जाला खिलतफर्मान गेला अजिमुलाखांस कमरदीखांचे लिहिले गेले फर्मान तलब हजूरचा गेला मालकाचा दिवान नवाबाबराबर गेला म्हणोन अर्ज जाला दिवान हजुरून दुसरा जाला वाक्यात दखल आहे माडवगडास कुतुबुदी अलीखा नामे जाला सिरोज–भेलश्यास मीर अहमदखां नामे जाला ग्वालेर-नरवरेस खिजरखां जाले हजारी इजाफा जाला २०००० रुा मसाबा दिधला बहूत पेश आहेत खिजमतगारखां मुरबी आहे महमतखांस पटनाची सुबेदारी जाली सरबुलंद-खांस ५ लाख रुा मसाबा नगद दिधला मुबारजखांसी लढाईस सीध जालेनिमित्य कर्नाटकवाल्यास फर्मान खिलत जवाहेर वकीलाची तसले बहुतसी केली तमाम बंदे पातशाहसि जो त्या येक माफीक मरातब त्यास फर्मान वरकड अललअमूम अहकाम तयार करून मुबारजखा जवल पाठविले आनि टिकेमधेही पाठविले वकिलाचे हवालेही केले येशांत पातशाहाजादा छ २६ सोवाली शांत जाला तेच घडीस सुबेदारी असालतन मुबारजखास फर्माविली आनि फर्मान तयार करून इनायेतुलाखाचे हवाले केला की पातशाहाजाद्याची खबर वाक्याची व असालतन सुबेदारीची खबर व फर्मान येके दिवसी पोहचे दक्षेनचें काम तमाम बंद आहे निजामन्मुलकाचा तजवीज नामजूर दरी विला जो जाऊन मुबारजखांची रिफाकत करील आनि त्याचे लिहिले जो आनील त्याची सनद मनसबेची जागीरीची खिदमतेची जारी होईल जो रिफाकत न करील तो बेमनसब जागीरजप्त येसा हुकूम जाला आहे प्रसग येथील या प्रकारचा तेथील प्रसंग तुम्ही जाना काही लिहीत नाहीत जे कलावे तुमचे नावे पहिले हुकूम जाला तो आमचे नावे हवाला करीत होते तो आम्ही न घेतला दरखास्त फर्मानाची मरातब नोकरीचा व्हावा निमित्य केली तीनचार वेले अर्ज केला तेव्हा फर्मानाची अज्ञा जाली इरसाल्याची वजिराची मोहर जाली मोहर उजूला जाली आनि लाखोटा जाला हुकूम जाला की मुबारजखाजवल पाठवने की तो पावता करील तो फर्माण नियाबत फर्माविली आहे म्हनोन होता हाली फर्मान जाला तो असालतन सुबेदारी मुबारजखांस फर्माविली आहे रिफाकत करने म्हनोन लिा आहे नकल फर्मानाची बमोहर खांस आपाजीपंत हरकारे याचे हवाले खिजमतगोखाने केली आहे जैसी प्रसगानसार मसलहत देखाल तैसे करने लाजम तो आहे की रजा घेऊन फर्मानवाडीस येऊन घेने दाखल वाके करवने आनि अर्जदास्त करून पाठवने की फर्मान पोहचला बमोजीब हुकूम अमल करून प्रसग न देखाल तर गुप्तरूपें घेने आनि अर्जदास्त करने येशा गडबडी-मधे दोन कामे केली खिताब राजगी घेतला माहावार शेषमाहा घेतला बिरादरीचे तजवीजनामे बमोहर नियाबत बहूत दिवस पडले होते ते पिजीरा करविले हाली अर्ज मोकरर तिसा इस्माची करविलो खिजमतगारखांने कबूल केले आहे दारोगे अर्जे मोकररांस परवानगी दिधली श्रीकृपेनें अर्ज मोकरर करून घेतों मोठाली कामें दोन राहिली सनद खिदमत परवाने बाकी...न लिा मुबारजखांचें होत नाही जफरकराचे काम जाले परवाना बाकी वजीराची मोहरही जाली आज पधरा दिवस पेशकाराने

शि. च. सा. खं. ११–४

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अटकाविला आहे श्रीरुपेने अर्ज मोकरर माफीक मुदा जाली कमीचा मोठा धोका होता अमा त्याच्या बापाचा मरातब अर्जीत दाखल केला होता सबब कमी न जाली पेशकाराचा मोकदमा विल्हे लाऊण परवाना घेऊन पाठवितो चिरंजीव तुबाजी व फत्तेसीग व मालोजी वगैरे बिरादरजादे व बिरादरीची अर्ज मोकरर श्रीरुपेने माफीक-मुदा करून घेतो तुम्हांसाठी खिलत खासा व जीगा मुरसे घेतला अर्जीवर दसखत श्वाद होऊन आला अथपर मीर बकसीचे मोहरनसी परवानगी खिलतखान्यात व जवाहिरखान्यात पोहचाऊन घेऊन जोडी अजूरदाराबराबर पोहचाऊन तुम्हांसही लाजम आहे की जमाने-साजी करने तिकडे मुबारजखांकडेही सलूख ठेवने की आम्ही सर्वश्वे तुझे आहो त्याची रजावंदी राखने पातशाहाची मरजी कुली आहे राजेवैभव चिरंजीव राखणें आहे तर बमोजीब हुकूम अमल करणे आनि इकडे हप्त्याबहप्त्या शुका नावठाव नाहीस आज्ञा तरीक हरीरी कागदावर बारीक अक्षेरे लेहोन पाठवीत जाने तुमची जुवामर्दी ज्याफिशानी येकनिस्टता सर्व छेत्रपतीस जाहीर केली तुमचे तर्फेने शुके लेहून तर्जुमे गुजरानले खिलाफ लिा नाही अंधपुत्राबराबर आहेत हे परश्वीन लेहोन दिधले सबब की येथें दोचौघा हरकाऱ्यानी लेहून दिधले की अमृतराव रफीक मोकररी निजामन्मुलुकाचा आहे याजकरितां धरबंद करने जरूर जाले निदानी चैनवख्त काबू पाहून बमोजीब हुकूम अमलांत आनतील वाबस्त व तालुके नजदीक खडकी आहे अगाऊ तिकडे गेलिया बाबस्तास तसदी पोहचावितील येथील तो जैसा प्रसग देखिला तैसी सपादनी केली आनि नमूद करून दाखविले तेथील प्रसग दूर अंदेसीने कराल त्याहावे चैसा अर्थ नाहीं दूयेम मुबारजखांचे यांचे युधेप्रसंग जालिया तेच घडीस शत दोन शत रुा खर्चून पत्र अथवा शुका जलद आम्हांजवल पावता करने की दाहावे दिवसी येथे खबर कले अगाऊ तुमचा अर्ज जालिया कुली मुजरा आहे मग हर कोनाचा जये हो जरी सलूकही जाला तरी लेहोन पाठवने हे कागद वाचून फाडून टाकने वोझरकर रामचंद्रभट शोंचे ब्राह्मण विद्यावान व येथे चौ मुतसदी याचे घरी आश्रीत आहे ते हरघडी त्याचे-विषयी सांगतात तरी पत्रदरशनी रुपा करून त्याची वृती ताबाटिकाकराची रुसीमटास बोलावून हवाले करने भार्गवे भांडतात त्यास मना करने त्यास कागद जानता न जानता करून दिधला आहे जो फिरावून घेऊन फाडून टाकने आनि ब्राह्मनाच्या झगडियांत अवल तो न यावें ब्राह्मनावर पचाईत घ्यावी नाहक वृतीचा उछेद करने उतमात नाही हेविशई अहंकारास काम न फर्मावने हे न्यायेत कुली आपनावर आहे की येथें ज्यासी सदैव काम त्याज—बरवे सुरुखुरू होऊन आबरू होईल हे विनती नकल फर्मानाचीही या पत्रावर ... घेऊन पाठविली आहे खुद नबाब अर्ज करने लागतो जितके रुा त्याहाल तितके अर्ज करऊन हे वि

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

ले. २१ जिल्काद १५ } ८१ . { श. १६४६ श्रावण वद्य १
श्री { इ. १७२४ जुलै २५

विनंति उपर येथील स्वस्तक्षेम ता छ १५ जिलकाद जानौन तुम्ही आपले सामराजेवैभव लेखनार्थ आज्ञा केली पाहिजे यानंतर येथील वर्तमान छ ३ जिलकादी व छ १२ जिलकादी अजूरदार कासदाबराबर पत्रें पाठविली आहेत पावलिया सविस्तर वर्तमान विदित होईल सेवेचा श्वधर्म श्वामीकार्यी येकनिस्टता असावी ते येक तुमची आहे निमित्य श्रीरुपेने कितेक अरिस्टें निर्विघ्न केली श्वामी जोपरयेत तुम्हास जानत नव्हता तोंपरयेत त्याचे प्रतिनिधि त्याप्राती जे राहिले त्याची सेवा येकनिस्ट केली तेही श्वामप्रित्यिर्थच जाली परोक्ष अपरोक्ष स्वामीकार्येभागी दृढ असावें हा येक श्वधर्म तुमचाच देखिला आपणास सार्वभूम जे स्थली आहेत त्या स्थलास पाठविलिया आमचा धंदा इतकाच की तुम्हास जयने करावे ते श्रीरुपेनें थैसें केलें कीं कोन्ही काही कोन्हेही प्रकारें सांगो श्वमुखे म्हनतात की त्या प्रांती तो येक सेवक कार्याचा व श्वामीकार्यै द्रुढनिस्चये आहे बस हद होऊन चुकली राजपत्रासाठी व वस्त्रासाठी आर्जू होती जे मुरची होते ज्याजवर हक शाबूत केला होता त्यास किती वेले विनति केली परंतू तेही शब्द खर्चून श्रीमंडित न केले कार्येभाग येथें असताही न केला आनि येथून गेलियावर खलखलेखाले घातला आहे मनसुबाची सिपारस दरकार हे सविस्तर पूर्वी पत्री लिा आहे हाली श्रीरुपेने कामेंही करून घेतली माफिक मुदा खिताब राजगी व माहावार व बिरादरीची इस्मे तीस अर्ज मोकरर जालीदाखल आहे राहिली दोन कामे परवाना बाकी सनद खिदमत तेही तुमचें चलन जालिया होईल राजपत्रें तीन जाली येक मनसुबाजवल गेले तेही पावले असेल मये खिताब राजगी दुसरे छ ३ जिलकादी मधे नकल रवाने केली पावतील हाली राजदूताबराबर राजपत्र व वस्त्रें व जीगा रवाना जाला तो नूतनाचे विदेमाने पोहचेल नकल राजपत्राची रो आपाजीपंत हरकारे यांचे सांभाली जाली ते पाठविली आहे जये प्राप्त जाली इजाफा हती सिरपाव घेऊन कीर्तिघोश येथें विशश आनी श्वामीसानिध्यें परमविश्वासुकामधे गनना होईल यावर कितेक मंडलीचे ग्रहस्त त्यांचे नावे राजपत्रें जाली ते राजश्रींनी तुम्हाजवल पाठविलीं प्रसगानसार आपले महत्व — भोगजेल तर उतम आहे येकचित करून घेतलिया राजपत्रें घ्याल उभयता येकचितें आहो जो पत्रें घेऊन येईल त्यास आजुरा ४ देवने चितांत संदेहे न आनावा हे विनाति शौच्यांची बृती तात्काल देवने हे विनंति

ले. २२ } ८२ { श.
{ इ.

अबदुल अजीजखान बहादुर पंडित आजंम चिमणाजी दाम मोहबतहू

०।: दं पंडित साहेब मेहरबान कदरदान फैजरसा [मो. जा.*] बादज इस्तियाक मुलाकात मजमून आंकी येथील हकीकती साबिक मुलकाची व संगाजा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ढमढेरे उदापुरास आलियाची मोहिंबांस लिहिली आहे त्याचा जवाब ता हाल येऊन पोंहचला नांही आपणांस तों मोहिबांच्या येखलासावरी मद नजर आहे व नवाब [मो. जा.*] हेही लौकरीच येथें येणार ते आलियावरी अलबतें राऊ आजम [मो. जा.*] यांची व मोहिबांची भेटी होऊन तरफैन येखलासें येखलास ज्यादा होईल त्यासी संगोजी ढमढेरे उदापुरीं राहिलियानें अगर तेथें काही दिवाल केलियाने त्यांचे खातिरेमधे येखलासांत नव दीगर गुजरेल याबदल मसलहत नांही हरगाह जे जागा नवाब वाला जेनांब [मो. जा.*] इहीं मिसमार केली आहे तेथें कोण्ही कांही दिवाल केलियाने हजुरीची बायेस बदनामी आहे तरी हे शर्त येखलास व दोस्तीची न होये याबदल व दूयेम राऊ आजम यांचा करारमदार नवाब गयासखांजीचे रूबरू .जालां आहे की उदापुरी कोण्ही न राहावे अगर तेथें वाडा न बाधावा येसें मोकरर जाले असतां हाल आं की बेहतर आहे कीं संगोजी ढमढेरे तेथें न राहेती व नव दीगर वाडियाचें वगैरे काम न करीत ते करणे नांही तरी या मोकदमियावरून बायेस आजुर्दगी दरमियाने येऊन मुलकाचे आबादानीमधें बिकसूर व फुतूर होईल याबदल मोहिंबी येखलासावरी नजर देऊन लिहिलेमाफीक गौर केलियां तरफैन येखलास राहोन ज्यामधे मुलकाची आबादानी राहे तें केलें पाहिजे ज्यादा काये लिहिणे मेहरबानी फर्माऊन प्यारमोहबत तरकी करीत जाणे [नि*] हे किताबत

ले. २३ पौं मोहरम २९ } ८३ पौ छ २९ मोहरम { श. १६८० आश्विन शुद्ध १ इ. १७५८ आक्टोबर ३

लस्करचे पत्र

श्रीमत महाराज साहेब जाहगाह इलुहदींखां साहेब मेहरबान सलमुलाहु ताला दै मोहबत व मवदतदस्तगा [मो. जा.*] बादज शोक मुलाकात बेहजत अयात मसहूद बाद अकी येथील खैरसला जाणोन मोहिंबी अपली खरियेत बहमेशा कलमी करीत गेले पाहिजे दिगर किताबत पाठविली पाऊन हकीकत मालूम जाली सुरतेस पत्रें पाठविली होती त्याचा जाब आला तो कालचे रोजी रा माहादाजी-पंताची मानसे कांही सवदा घ्यावयास आली होती त्याजबरोबर अली नवाजखानाचे पत्र पाठविले अहे त्याजवरून सर्व कलो येईल त्यानी लिहिले अहे की मोहियाकडील खानसामा येथे आला होता त्याजपासी कितेक मजकूर घरोबियाचा सागोन पाठविला आहे त्यास तो मजकूर काये मोहियास सागितला असेल तो असो लिहिलियात कांही आला नाही त्यास जो विचार करणे तो दुरंदेसीवर नजर देऊन मोहिंबी करावा होडी कामरेजची येक पाठवावी कीं लस्करास दाणा अणयाची तसदी होते त्याजवरून रा माधोरायास पत्र लिा अहे ते होडी पाठऊन देतील पत्र त्याजकडे रवाना करावे ज्यादा काये लिहिणे प्यार मोहबत असों दीजे हे किताबत दुसरे अहमदाबादेहूनही कासीद येका दो रोजात अलियावरी मोहियास मुफसल कलमी करून हे किताबत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

५ सोलापूर-देशमूख

[इ. १९५२ च्या डिसेंबरमध्यें कांहीं कामानिमित्त मी सोलापुरास गेलों असतां पूर्वीच्या सोलापूर मामल्याच्या वतनदार देशमूख घराण्याचे सध्याचे वंशज श्री. सिद्रामप्पा मलिकार्जुनप्पा देशमूख यांजकडील जुने कागदपत्र पाहण्याची संधि मला तेथील सुप्रसिद्ध नागरिक श्री. रा. ब. नागप्पा अबदुलपूरकर व सोलापूर नगरपालिकेंतील श्री. ग. पं कुलकर्णी यांच्या बहुमोल साह्यानें मिळाली. त्या वेळीं मी त्यांचे अदमासें ७५ रुमाल तपासले व त्यांतुन २००० वर फार्सी, फार्सी–मराठी व मराठी अशा तिन्ही प्रकारचे कागद जास्त अभ्यासासाठीं निवडले. पुन्हा मी इ. १९५३ च्या मार्चांत तेथें गेलों. त्या वेळीं श्री. रा. ब. नागप्पा अबदुलपूरकर, श्री ग. पं. कुलकर्णी, श्री. डॉ. भा. वा. मुळे यांचें साह्य आणि देशमुखांची उदारवृत्ति यामुळें मी निवडलेले कागद अभ्यासासाठीं व त्यांतील महत्त्वाचे प्रकाशित करण्यासाठीं मंडळांत घेऊन आलों.

गेल्या सहस्रकांत सोलापूर हळूंहळूं व थोडथोडें वाढत मोठें शहर बनत आलें आहे. त्यांतील सध्याची एक पेठ सोन्नलगे ही त्याचा सर्वांत जुना भाग असून प्रारंभीं ती एक छोटेखानी खेडें होती. मुसलमानपूर्वकालीन अनेक लेखांत या खेड्याचा निर्देश आहे. 'अभिनव श्रीशैल' या नांवानेंहि त्याचा उल्लेख आढळतो. सिद्धराम या लिंगायत संताच्या वास्तव्यानें व समाधीनें तें पुनीत झालें आहे. मुसलमानी राजवटींत या खेड्याचें रूपांतर कसब्यांत झालेलें आढळतें. सोळाव्या शतकांत त्याला सोन्नलापूर हें नांव प्राप्त झालेलें दिसतें व सतराव्या शतकांत त्याच्या जोडीला सोलापूर हें नांवही प्रचलित झालें. साधारणतः या शतकाच्या उत्तरार्धापासून मात्र सोलापूर म्हणूनच त्याचा उल्लेख आढळतो. त्या काळचे मुसलमान इतिहासकारही त्याचा उल्लेख सोलापूर असाच करतात. पण १६ व १७ या शतकांतील फार्सी कागदपत्रांत हर एक जागीं याचा संदलापूर असा निर्देश येतो. मुसलमानांचा हा अपभ्रंश बहुधा सहेतुक असावा. सोलापूर हें सोळा खेडीं मिळून बनलेलें आहे अशी एक दंतकथा असून कांहीं आधुनिक लेखांत त्या सोळा गांवांचीं नांवेंहि दिलेलीं आढळतात. पण प्राचीन लेखांत व कागदपत्रांत सोन्नलगे भागाचें केंद्रत्व, त्यांत क्रमशः झालेली वाढ व त्यास जोडलेले नवे नवे भाग यांची माहिती उपलब्ध झाल्यानें वरील प्रवाद निराधार असल्याचें प्रत्ययास येतें.

देशमुखांचे कागद तपासले तेव्हां त्यांत सुमारें ३५० फार्सी, २०० फार्सी–मराठी व उर्वरित मराठी असल्याचें दिसून आलें. यांचा पहिला विशेष हा कीं, यांच्या इतके विपुल, शिवपूर्वकालीन व सतराव्या शतकापूर्वीचे कागद अद्याप कोठेंहि मिळालेले नाहींत. केवळ नळदुर्गच्या देशमुखांकडे या कागदांइतकेच जुने कागद मिळण्याचा संभव आहे असें त्यांजकडील माझ्या हातीं आलेल्या कागदांवरून वाटतें. पण ते फार्सी आहेत. यांच्या इतके जुने मराठी कागद त्यांजकडे अद्याप मिळालेले नाहींत. यांतील

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सर्वांत जुनें पत्र मराठी असून त्यानंतर फार्सी–मराठी व तदनंतर फार्सी असा कालानुक्रम लागतो. सर्वांत जुना मराठी कागद शुहूर ९२५ म्हणजे इ. १५२४–२५ चा आहे तर फार्सी–मराठी कागद शुहूर ९५९ म्हणजे इ. १५५८–५९ मधील सांपडला. फार्सीतील सर्वप्रथम कागद हिजरी ९७६ रबिलाखर ७ (इ. १५६८ सप्टेंबर २४) या तारखेचा आहे. यांपैकीं शेकडों कागद अस्सल म्हणजे शिक्कामोर्तबाचे आहेत, तसे कित्येक नकला आहेत. पण त्या नकलांचा विशेष हा कीं, जसा कागद शिवपूर्वकालीन तशी त्याची नकलही शिवपूर्वकालीनच आहे. यामुळें या कागदांतील अक्षरवटिका, लिपी, लेखनपद्धति, शब्दोच्चार, वाक्प्रचार, शब्दसंग्रह, वाक्यरचना इत्यादि सर्वच गोष्टी अभ्यसनीय आहेत. यांवर पांचपन्नास पानांचा निबंध सहज होऊं शकेल. भौगोलिक दृष्ट्या हे कागद सोलापूर मामल्याच्या सर्व भागासंबंधीं आहेत. पूर्वी सोलापूर मामल्याचा विस्तार उत्तरेस तुळजापूर (३० मैल), ईशान्येस नळदुर्ग (२८ मैल), पूर्वेस अक्कलकोट (२४ मैल) व त्याहीपुढें, दक्षिणेस शंभर मैलांवरील सगर व पश्चिमेकडे सुमारें ४०–४५ मैलांवरील कासेगाव येथवर होता. केवळ प्रकारांच्या दृष्टीनेंच पाहिलें तर फर्मानें (बादशाही हुकूम), खुर्दखतें (श्रेष्ठ अधिकाऱ्यांचे हुकूम), मिसली (तिसऱ्या व चवथ्या वर्गाच्या अधिकाऱ्यांचे हुकूम), महजर (ग्रामस्थांचे निकाल), निरनिराळ्या तऱ्हेच्या याद्या, खासगी व निमसरकारी पत्रव्यवहार, पावत्या, हिशेबी कागद, अर्ज्या, तकरारी, कैफियती, इत्यादी अनेक प्रकारचें वैविध्य या कागदपत्रांत आहे.

मुसलमान इतिहासकारांच्या लिखाणावरून वाचकांची समजूत होते कीं, महाराष्ट्रांतील मुसलमानी राजवटीच्या उत्तरार्धांत व विशेषतः बहमनी राज्याचे पांच तुकडे झाले तेव्हांपासून सोलापूर गांव निजामशाही व आदिलशाही सुलतानांच्या कायम भांडणाचें मूळ बनलें होतें. फिरिश्त्याच्या 'गुलशन–इ–इब्राहीमी' व तबातबाईच्या 'बुर्हान–इ–मासिर' या ग्रंथांत या वादाचे क्रमवार अनेक उल्लेख आहेत, पण या बाबतींत आश्चर्याची गोष्ट अशी कीं, हे कागद सोलापूर गांव व मामला यासंबंधीं असूनहि यांपैकीं फारच थोड्या कागदांत या वादाचे उल्लेख आढळतात. हे बहुतेक सर्व कागद आदिलशाही सुलतानांचे आहेत.

सोलापूर मामल्यामध्यें समाविष्ट असलेल्या कानडी मुलखांतहि मराठी ही लेखबोध भाषा म्हणून मान्यता पावली होती हें या पत्रांबाबतचें आणखी एक लक्षांत ठेवण्यासारखें वैशिष्ट्य आहे. ह्या कागदांचे मालक देशमूख हे लिंगायत असून, त्यांची मातृभाषा कानडी दिसते. पण इ. १५२४ पासून उपलब्ध असलेल्या या कागदपत्रांत एकही कानडी भाषेंतील व थोड्याशा महत्वाचा असा कागद आढळून आला नाहीं. देशमुखांच्या ह्या संग्रहांत संस्कृत हस्तलिखितांबरोबर कांहीं कानडी हस्तलिखितेंहि आढळलीं. पण कानडी पत्रांचा अभाव मात्र चटकन ध्यानांत येतो. क्वचित् सोळाव्या

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

शतकांतील अत्यंत दुर्मिळ, मराठी भाषेंतील व मोडी लिपींत लिहिलेल्या निवाडपत्रांवर कांहीं शेरे मात्र कानडीमध्यें आढळले. कानडी प्रदेशांत केव्हां केव्हां फार्सी-कानडी द्वैभाषिक आदिलशाही फर्मानें आढळतात. पण प्रस्तुत कागदांत अशा प्रकारचें एकही फर्मान नाहीं. यावरून एकच अनुमान निघतें तें हें कीं, सोलापूर मामल्यांतील सर्व सामान्य लोकांनीं आपली मातृभाषा कोणतीही असली तरी रोजच्या व्यवहाराची भाषा मराठी असें साडेचारशें वर्षांपूर्वीच मान्य केलें होतें.

या कागदांत एक दोन वंशवृक्ष आढळले त्यांवरून देशमूख घराण्याच्या मागील वीस पिढ्यांच्या पुरुषांचीं नांवें समजतात तीं अशीं:— १ नर (इ. १४५०), २ चेन (इ. १४७५), ३ हिरोबा (इ. १५००), ४ चेल (इ. १५२५), ५ मेग (मेंग इ. १५५०), ६ चेन (इ. १५७५), ७ मेग (मेंग इ. १६००), ८ नर (इ.१६२५), ९ हिरोजी (इ. १६५०), १० अपाजी (इ. १६७५), ११ हिरोजी (इ. १७००), १२ दंव (इ. १७२५), १३ हिरोजी (इ. १७५०), १४ सिद्ध (इ. १७७५), १५ हिरोजी (१८००), १६ सिद्ध (इ. १८२५), १७ शिवलिंग (इ. १८५०), १८ सिद्ध (इ. १८७५), १९ मल्लिकार्जुन (इ. १९००), २० सिद्रामप्पा (इ. १९२५).

वर दर्शविल्याप्रमाणें एक पिढी पंचवीस वर्षांची मानिली तर या घराण्याच्या मूळ पुरुषाचा काळ इ. १४५०–७५ हा येतो. वंशवृक्षांतील उल्लेखांना समकालीन कागदपत्रांचा उपोद्बलक पुरावा मिळत नाहीं ही एक सामान्य वस्तुस्थिति या घराण्याबाबतहि अनुभवास येते. मिळालेल्या कागदपत्रांत मला असें दिसून आलें आहे की चेलिसेटीचा मुलगा मेंगिसेटी (क्र. ५) ह्या एकाचीच हयात इ. १५२५ ते १५८२ पर्यंत होती. तसेंच नरसेटी (क्र. ८) नंतर हिरोजी (११) येतो. क्र. १२ व १३ या पुरुषांचा उल्लेख कोठेंच आढळत नाहीं. कारण हिरोजी (क्र. ११) नंतर लगेच सिद्धाप्पा (क्र. १४) झालेला दिसतो. ह्या दोन उदाहरणांवरून हें स्पष्ट होतें कीं, उपलब्ध समकालीन कागदपत्रांच्या आधारानें इतर घराण्यांच्या वंशवृक्षांची पुनर्रचना करणें जसें आवश्यक असतें तसें देशमुखांच्या वंशवृक्षाचेंहि कागदपत्रांच्या पुराव्यानें शुद्धीकरण करणें अपरिहार्य आहे.

हे सर्व फार्सी, फार्सी–मराठी व मराठी कागद पुनः पुनः तपासून व त्यांतील प्रकाशनायोग्य कागद बाजूस काढून त्यांच्या नकला करणें, त्यांच्या कालांचीं रूपांतरें करणें आणि इतर आवश्यक ते संस्कार करून त्यांस मुद्रणायोग्य करणें हीं कामें अजूनहि संपलेलीं नाहींत. तथापि वरवर चाळून जुने किंवा आशयाच्या दृष्टीनें बरे वाटले असे अदमासें १०० फार्सी–मराठी व मराठी कागद नकलले. एकदां मनांत आलें कीं, इसवी १५०० ते १६०० या कालांतील सर्वच कागद येथें प्रकाशित करावे. पण तसें करतों तर ते सर्व कागद येथें मिळालेल्या पृष्ठांच्या अवकाशांत प्रकाशित झाले

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नसते आणि नंतरचे पण बरे असे कागद मागें राहिले असते. म्हणून तो विचार सोडून इ. १५०० ते १७०० या काळांतील व नकलेल्यांपैकीं निवडक येथें छापले आहेत.

कोणत्याहि देशमूख घराण्यांतील कागदपत्र तपासले तर त्यांत सामान्यतः राजकारणी माहितीचे कागद अवश्य सांपडतात. पण या घराण्यांत इतके कागद मिळूनहि त्यांत राजकीय माहितीचे कागद अल्पच आहेत. पण राजकारण हें समाजजीवनाचें केवळ एक अंग आहे. त्यास पाहिजे तर प्रमुख म्हणा, पण समाजजीवनाचीं आणखी कित्येक अंगें असून त्यांतील कांहीं या कागदांत चांगलीं प्रतिबिंबित झालीं आहेत. या दृष्टीनें या कागदांकडे पहावयाचें आहे. या कागदांसंबंधीं एक लेख मी इंडियन हिस्ट्री कॉंग्रेसच्या वाल्टेर अधिवेशनांत (इ. १९५३) व दुसरा त्याच सालच्या व तेथेंच भरलेल्या न्यूमिस्मॅटिक सोसायटीच्या अधिवेशनांत वाचला होता. ते त्यांच्या इतिवृत्तांत प्रकाशित झाले आहेत.*]

ले. १ सु. ९२५ —१७ } ८४ [वा. फा. शि*] { श. १४४६–४७ इ. १५२४–२५

ताा मेगसेटी बिन येलसेटी देसाई कातीहाये मा सोलापूर बिदानद हर्ची सुा सन खमस अशरीन तिसा मैया हातरोखा देखताच हुजूर येणे येक घडी उजूर न करणे सैद बडा माहलदार यासी होनू १८ मसाला दीजे मोर्तबू

तेरीख १७ माहे

ले. २ शं. १४५२(४) विरोधकृत (नंदन) भाद्रपदशुद्ध ४ सोम हि. ९३९ } ८५ { श. १४५४ भाद्रपद शुद्ध ३,४ इ. १५३२ सप्टेंबर २

[आरंभीं १६ ओ. फा. मज.*]

शालिवान सके १४५२ विरुद्कृत नाम सवछरे भाद्रपद सुधा चर्तुर्थी वार सोमवार [त] दिनी निवाडा जाला पत्र लिहिले

कारकिर्दी सर्जाखान व लोहारखान मदउमर[हू] हुजूर बाब पाटील मोकदम मुक्ष करून समस्त मौजे सुरतगाव साा मार्डी मामले सोलापूर पाटील मोकदम समस्त मुक्ष करून मौजे पि[पले] खुर्द तपे काटी या दोहीं गावास सिवेचा···होता मग दोघे उभे वर्ग हाजीर होऊन हर[जितीचे] कतबे घेऊन येन जिनस अगीस राजी जाह[ले] हक-जवार मिलविले नावे िााा

मा इस्माइल बंद्धी माहालदार रख्तखान	कारकून
खाा सा	सिक्सेटी पटे···
मेगसेटी देसाई कर्यातीहाये साा मार्डी	मोजे सागवी पाटील तपे···
पाटो पाटील मो मौजे कासेगाऊ	मालपाटील क··· व रामसेटी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अब पाटील अजहाती चेलाजी देहेसाई
ता काटी
रामसेटी काा कुंभारी
हरी पाटील मौजे तादुलवाडी
पुंडलीक पाटील मौजे भाभेवाडी तपे मोहल
मौजे देव कुर···पाटील व तुक···
याह पाटील पाटील मौजे जरूम तपे···

या विद्‌माने मौजे सुरतगावकर पाडेवारास नाइकास अरणी दिल्ही नाग नाईक पाडेवार मौ[जे पि]पले खुर्द याने साउली केली दिवस दोनी [मौजे] पिपले बुाा त्याच्या हवाला होता तिसरे [दिवसी] कारकून व हकजवार मिलऊन हात पाहिले तो सुरतगावकर अरणीस लागला होता हात जलाला [मौ]जे पिपले खुर्द यानी हद्‌-महदुदीने चालि··· मौजे कोर कुमारीचे तिकटणे रद्‌ करून ...वीचे तिकटेहून दक्षणे मुखे हिदाणे बिाा

धोंडे गुड पाच १
सासनाचा धोंडा ४
दुसरे निशान फूट व
तलियाखालता पलस २
पिल वेलाची जाली ५

तेथून तिकटणे मौजे पिपले बुाा येणेप्रमाणे हदुदीने मौजे पिपले खुर्दकरास पत्र [लिहून] दिधले अता हद्‌महदुदीने माहजरप्रमाणे राहावे यासि कोण्ही न राहवे तो दिवा[ण] चा गुन्हेगार व गोताचा अन्याई या[सी] साक्ष कारकून व हकजवारी दसकत गो[ही] पत्र सही

[पाठीवर*] मेगसेटी...स मौजे पिपले खु[र्द] मौजे सुरतगाव पाा...सिमेचा निवाडा सन ९३९

८६

श्री

ले. ३ सु. ९३४
जिल्काद ६ [अखेर साल]

{श. १४५६ ज्येष्ठ शुद्ध ६
{इ. १५३४ मे १९

हाजीर मज्यालसी कसबे मारुडी
राजेश्री ळखमाजी बसवरस
हुदेदार
गोदजी चौधरी
सही
मालो पटेल मोकद्‌म
[नांगराचें चित्र*]
रेचसेटी मोकद्‌म
मौजे बार्नागाऊ
[नांगराचें चित्र*]

राजमुद्रा
नागोजी देऊजी
निविसिदा
बिकलम नरहरी विठल
देसकुलकरणी
कोडो मेहतरी
मालियानी
येमाजी पटेल मोकद्‌म
मौजे तरडगाऊ
[नांगराचें चित्र*]

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

या विद्माने माहामेरू श्रीभरमाजी भुसगौडा मौजे [मो. जा.*] हाली वस्ती कसबे मजकूर यासी प्रती मेगीसेटी बिन येलीसेटी देसाई सा। मजकूर मामिले सोनलापूर सुहूर सन आर्बा सलासीन व तिसा मैया कारणें लिहुनी दिल्हे कागद यैसा जे तुमची बेटीसी अम्ही करून घेतले अम्हासी तुम्ही दिधले असे अम्ही तुम्ही सोइरिकी जाली तुम्ही बोलिले की अपणासी सेत जागा नाही अपणासी सेत जागा देणे म्हणऊन मागितिले तरी अमचे सेत बजन ८८ व तुमचे हवाला केले असे वा अमचे वाडियामधे जैसे तुम्ही घर बाधून आहेती तेचि घरामधे असिजे तुम्हासी मानासी मानेल तोवरी सेत घरामधे आसिजे सेत करिता जेड जालिया अमचे सेत अमचे हवाला करणे जितुके टाकील तितुके करणे तुम्हासी अम्ही बाहीर घालणारा नाही हे अपले इमान सही छ ६ माहे जिलकाद

ले. ४ सु. ९५९ हि. ९६६ रवल १२	८७ [२ फा. शि. व मज.*]	श. १४८० पौष शुद्ध १३ इ. १५५८ डिसेंबर २३

अज रखतखाने खु॥ खा सर्जाखा खु॥ दौलतहू विजानिबू मझन कमाल ठाणदार व कारकुनानी बाजे कर्याती मामले सोनलापूर बिदानद सु॥ तिसा खमसैन व तिसा मैया जमीन किर्दी चावर येक दर सवाद मौजे मुरती समत बालेघाट मामले मजकूर दा॥ इनाम बदल तैनाती छ्यत्री बो मेगसेटी देसाई दिधले असे वह महसुलेसी दुवाला कीजे [फा.*] मुरत्तब शुद तेरीख १२ रबिलौवलू सीत सितैन

ले. ५ सु. ९६० मोहरम १०	८८	श. १४८१ आश्विन शुद्ध ११ इ. १५५९ ऑक्टोबर १२

मोकदामिल इमिसाल नरसासेटी बिन मेगसेटी देसाई सा। मारडी मामले सोनलापूर बिदानद हर्ची सुहूर सन सितैन व तिसा मेया तुम्ही समत मजकुराचे रयेतीचे दिलासियाबदल मौजे सावरगाऊ तपे काटी तेथे पाठिविले तरी तुम्हासी जाऊन बैसून १०॥१२ रोज जाहाले तुम्ही काही दिलासा केले अहे की तैसेची बैसले अहे हे कलता नाही अता ताकीद रोखा देखता त्याचे मुदा काये अहे ते लिहून पाठवणे त्यासारिखे सरजामी होईल तुम्ही लौकरी निघा करून येणे वा नादणाजाचे मोकदम हुदेदाराचे पेसजी लिहिले होत जे बहूत रजीस करितो त्यास दूर कर्णे म्हणून तरी त्या हुदेदारास दूर करून जाणिजे [नि*] मोर्तबू सूद

तरीख १० माहे मोहरम

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. ६ सु. ९६३ जिल्काद २५	८९ तालीक	श. १४८४ अ. श्रावण वद्य १२ इ. १५६२ जुलै २७

दं अज रख्तखाने अजम जैतखान नेव गैबत मा। विजापूर कनड नामजाद किले रामदुर्ग दाम दौलतहू बजानेब ठाणदार व कारकुनानी हाल इस्तकबाल ता। मारडी कर्याती मामले सोलापूर बिदानद हर्ची अज सुहूर सन सलास सितैन तिसा मया कारणे दरी विला मेगीसेटी बिन येलीसेटी देसाई ता।हाये मामले मजकूर हुजूर दरगाहास जाहीर केले हुजुरून हुकूमत ताकीद फर्मान हुमायून सादर दर सवाद देसाईगिरीचे वर्तना व हकलवाजिमा पुस्त दर पुस्त चालिले असे हाली गैरमोईन म्हणून वर्तनास दखलगिरी होऊ देत नाही तरी हाली देसाई मजकुराचे मोइनेबदल विलायेतीचे पटेलास हुजूर आणून पुस्त दर पुस्त भोगवटा खातिरेसी आणून हाली वर्तना व हकलवाजिमा रयत खुसीतुदीने मोईन करून देणे म्हणून फर्मान हुमायून सादर जाले बा। फर्मान हुमायून विलायेतीचे मोकदमास हुजूर बोलाऊन मोकदमाचे इतपाखी पेसजीचे भोगवटा खातिरेसी आणून मोईन करून दिल्हे असे बि। देहाये जैल

कसबे मजकूर नख्त	मौजे नादणिगी	मौजे कारबे
होनू १०८·	होनू ५८· गला खडी १	होनू ३ गला ·।।।·
मौजे पडसाली	मौजे दारफल	मौजे तादोलवाडी
होनू ४।। गला खडी १	होनू ४।। गला १	होनू ३ गला ·।।।·
मौजे गुलवची	मौजे भोगाऊ	मौजे केगाऊ
होनू २ गला ·।। २ ।।	होनू २ गला ·।।।·	होनू २ गला ·।।·
मौजे तरडगाऊ	मौजे रालेरासी	मौजे टाकलगाऊ
होनू २ गला ·।।·	होन १।। गला ·१२।।	होन १।। गला ·१२।।
मौजे देव कुरवली	मौजे सुरतगावी	मौजे हिपरगे
होन ३ गला ·।।।२।।	होन ३ गला ·।।।·	होन २ गला ·।।·
मौजे वडजी	मौजे वरलेगाऊ	मौजे खडकी
होन २ गला ·।।·	होनू २ गला ·।।·	होन २।। गला ·।।·
मौजे धोत्री	मौजे मालउबरे	मौजे सागवी
होन ३ गला ·।।।·	होन २ गला ·।।·	होन २।। गला ·।।·
मौजे रवलगाऊ	मौजे खुनेस्वर	मौजे सिवणी
होन २।। गला ·।।·	होन ३ गला ·।।।·	होन ३ गला ·।।।·
मौजे सारोले	विरवडे	मौजे पोफली
होन २ गला ·।।।·	होनू ३ गला ·।।।·	होन ४।। गला १८·

येकून बेरीज नख्त होनू ८१ गला कैली खडी १७।। याखेरीज अपले सालाबा[द]-प्रमाणे घीऊ व नमद व फसकी व पलगी जुलाई दर मागास रुके ·।।· प्रमाणे व बाजे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

भोगवटा कुल याचे दुचाला रयेत खुसी[तु]दीने केले असे मोईनप्रमाणे घेऊ देणे याचे हकलवाजिमा वर्तनियास तुम्ही दखलगिरी न करणे दरी बाब ताकीद असे तालीक लिहून घेऊन असल खुर्दखत परतून दीजे मोर्तब सूध

छ २५ जिलकाद

ले. ७ सु. ९७२ } जवल २५ }

९०

{ श. १४९३ आश्विन वद्य १२ { इ. १५७१ ऑक्टोबर १५

[आरंभीं फा. शि., ४८ ओ. फा. मज. व फा. शि*]

दर बादिगी आज दिवाण मामिले सोनलापूर साहेबाचे सादरेसी [याखालीं फा. शि.*]

दाा बोाा रामणा हिरेहेचू वा मेगीसेटी पटेल देसाई वा सखरोजी चौधरी वा चैहिरणा पटेल वा इसरो पटेल वा सिदो पटेल वा मलिसेटी मौसरेया पटेल वा आदिसेटी सेटिया वा सेटी होटिगिया वा खडू तोंतरिया वा तमाणा वा मलिसेटी कलिके वा खेलो पटेल वा मळू कलदेऊ वा सेटी राघू वा बुकीसेटी वा जावीसेटी वा रामीसेटी थोबडिया वा तुकीसेटी सिघारे वा समस्त कसबे मजकुरू सुहूर सन इसने सबैन तिसा मैया कारणे लिहून दिले कतबा ऐसा जे साहेबी हुजूर बोलाउनी रजा फर्माविले जे काा मजकुरू भागस्थल आहे वा सौदाबदल खरपासदार हुजुरू इरसाल केले आहे तरी भागस्थलीचे वा कौल कोठारीचे वा सौदा वा मानमाणतुकी वा मानेकारीपणा वा हकतका काये आहे तो लिहून देणे म्हणउनी रजा फर्माविले तरी अपुले गावीचे हकीकत हकतका बितपसील

वडिला बधूसी लग्न व मेजवानी मजालेसी जालिया आधी पाने संदल देवे तेथुनी थोरले पटेल देसाईसी देवे वा त्यामाघे विलेवार पाने संदल घेवे १

रायेत आगर गिरामियाचे घरी आदमीसी खुदाई जाली तरी तेथे देसाई जाउनी देकार करुनी मुरादा उठवाव्या मुरादा गाडिते जांगा काइदेकारीसी देकार देवे १

कौल कोठारेसी केली तरी कालीचे देकार केले तरी थोरले पटेल हाती होताच काठी घेऊन रासीवारी वोढाव्या तितुके पटेलानी देकार देवे १

सौदा देसाई बडे पटेल यासी माफ आसे वरकडा पटेलासी निसबती नाही १

लग्न जालिया गिराम आगर रायेत त्याचे घरासी जाउनी मजालसी करून बैसुनू दुडीचे वाटी थोरले पटेल देसाई घेवे व देकार माडवेमधे करून हत झाडुनी घरासी जावे १

कडबी पालणुकी वा पालभारे वा फर्माथेसी बेटी बीगारी थोरले पटेलासी माफ आसे १

पाने तसरीफ आपले विलेवार घेवे १

फसकी वा पलगी थोरले पटेलासी आसे वरकडासी निसबती नाही १

लग्नासी गिरामाचे घरीचे देवी जेवाव्यासी नेव्या १

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येकून कौदकास ९ येणेप्रमाण पाढरीचे काइदे आहेती बडे पटेल देसाई खेरीज कोणासी काही मानेकारीपणा नाही जोसे आम्ही दाहाजण कुणिबी तौसे सर घरे वेठी बीगारी देउनी असावे हाली पानेबाचे फर्मावेिले तरी देसाईचे पदरीमधे घालणे देसाई आपणासी देतील यासी कामापेस असलिया दिवाणाचे गुन्हेगारी हे कतबा सही छ २५ माहे जमादिलौवल

सही सही

[नांगराचीं सहा व तागडीचें एक अशीं चित्रें*] बिकलम रामाणा बसवरसु

ले. ८ सु. ९८५ }
हि. ९९३ रखर २१ } ९१ { श. १५०६ फाल्गुन वद्य ८
{ इ. १५८५ मार्च १३

[आरंभीं जाबितखानाचा द्वादशदली फा. शि. व 'बहुजूर खान अअजम जाबितखान नायब गैबत मुआमिला सन्दलापूर' हा फा. मज.*]

दं नरसेटी पटेल देसाई व बहिरण पटेल मा। सोंनलापूर गोसावी यासी रामणा पटेल सा। बिजापूर व तुको पटेल सा। कुंभारी व सिदो पटेल सा। देगाऊ व रामण मोसन्य सा। परियेंडा का। मजकूर सु॥ सन खमस समनीन व तिसा मेया कारणे लिहून दिल्हे कागद येसे हजरती निजमस्याहीचे बिलगरी विजापुरासी जाता मामले मजकुरी उतरले होते तधी महलीचे लोकासी तश्रीफ दिल्हे ते महली साहेब सदर गोसावी वाटून देतां तुम्हसी कबाये दिल्हे अपणासी काये देणे म्हणोन सदर बोलुनू पुसिले तरी अम्ही बोलिलो जे पासोडी चालले अहे म्हणौनू त्यावरी अपणासी पासोडी देतां अपण घेतले नही पेस्तर का। मजकुरीचे गांवगुतीकारणे कुणबी व आपण बाहिरी गेलो होतो समजउनू गवासी अणिले यावरी अपण चौघासी सदरा होउनू कबये दिल्हे ते वेले तुम्ही किले स्यहदुर्गी होतेसी पुढे तेथुनू अलेयावरी सदरा हुजूर अम्हसी हटकिले जे तुम्हासि कबाये चालिले नही तुम्ही कैसे कबाये घेतले म्हणोनू तरी अम्हसी कबये द्यव्या कारण नही पेस्तर अपण कबयेचे गौस्टीसी बोलाव्या समधू नही जैसे सळाबाद अपणासी पासोडिया चालिले अहे तैसे घेउनू अपुले कारबार चाळउनू सुखे असोन जरी याविखी काही हरकती व फितवा करू तरी गोताचे अन्यायी दिवणीचे गुन्होगार हे कगद सही छ २१ माहे रबिलाखर सलास तिसैन

गोही

वेकटराऊ [शि.*]
खंडनईक [शि.*]
चिकू नईक [शि.*]
पुरषोजी

तुकोजी नईक [शि.*]
प्रतापराऊ
अतो गोतरस
जगदेराऊ [शि.*]

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तमण जोसि माा सोनळापूर
माळोबा वीन कान्होचा वैद्य
सिद्णा बिन कामणा मेहतर लोहर
सोनसेटी बिन परभसेटी
वा सिद्दाण कलिके
सिरूण ह्यू बिन उगण ह्यू
तइफे कुभार मेहतर
संगणा कल्याणी
राघोसेटी सिद्रमा बिन मलसेटी
[कुंभाराच्या चाकाचें चित्र*]
तानजी बिन लखमण मेहतर हजाम
[न्हाव्याच्या आरशाचीं दोन चित्रें*]

दावण जोसी बिन चेल
जोइसी वास्तव्य सोनलापुरू
मलकंणा वा दुरगंणा सुतार
दादू मेहतर वा होनू बिन
जाबा मेहतर धोबी
मकण बिन देन चण
होनजी बिन मलसेटी
मेहतर सिपी
नरसेटी बिन लखमण ढवण
सिवसेटी मेहतर सोनार
कालसेटी मेहतर कासार

[मजकुराच्या डाव्या अंगास पुढील नांवें*]

सरनोबत [शि.*] रामजी गंगारस निघवन [शि*] नागोजी सोगजी सबनीस नरो कानीस संगो गोदजी पारसीनीस [नांगराचीं चार चित्रें*]

ले. ९ सु. ९८८
हि. ९९६ साबान २६

९२

श. १५१० आषाढ वद्य १३
इ. १५८८ जुलै ११

माहजर बतेरीख २६ माहे साबान सीत तिसैन बिाा काजी नूरदी हाकिम सरा व खाा जाबितखन नेब गैबत व कारकुनानी व सरगुरो व नायेकवाडियानि व देसाइयानि व सेटियानि व मोकदमनी व मर्लिमानानी मामले सोनलपूर स्राा सन समन समनीन व तिसा मेया करणे केले माहजर यैसे जे आदसेटी सेटिया पेठ येदिलापूर व त्याच लेकू तुकसेटी लस्कर मनसूरबराबरी नदी भिवरा उतर मौजे टाकली धुलखेडासी गेले होते तेथे नदी भरून जात होते सौदगरानि हतीचे छावे लस्करबराबरी नेत होते त्यामधे २ छावे इलती हातपाये व गळा सुजोन उठोणी अले होते ते छावे आदसेटी व तुकसेटी मजकुरे हुरासी पैके देउनू विकत घेउनू माा मजकुरसी येउनू खाा जाबितखन नेब गैबतासी बोलिले जे अपण बकल उदिमी असो हे छावे तुम्ही विकत घेणे म्हणौनू त्यावरी खान मस्यरनिले बोलिले जे हे छावे इलती हतपये वा गळ सुजले असती व लागर होउनू उठोणी अले असती ते छावे मरतील अपण नेघो म्हणौनू त्यावरी अणिकी दीस ४ सी येक छाव हातपाव गळा सुजले होते ते इलती छावा घेउनू अदसेटी व त्याच लेकू तुकसेटी बराबरी बहिरण पटेल व त्याचे लेकू सिदजी यैसे येउनू खान मस्यरनिलेचे पाये धरून आदसेटीने बोलिले जे हे छावा अपण तव रकबत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

खुशतुर्दीने विकीत असो हे छावा तुम्ही घेइजे म्हणौनू त्यवरी खन मस्यारनिले हे छव इलती नेघो म्हणौन परतोन टाकून बोलिले जे तुझे घरासी कारकून व नयेकवाडियासी पाठउनू तुझे मनसी अलेया छावेचे मोल करून पैके देउनू छाव त्याहती दीजे ते अम्हर्सी अणून देतील पर अम्ही तुमचे हती नेघो म्हणौन त्यावरी तो छावा परतोनू घेउनू गेले त्यावरी अणीक दीस ४॥५ सी मागुते अदसेटीचे घरासी बहिरण पटेल व सिद्जी बिन बहिरण पटेल जउनू येक धाकुटा छाव इलती गळा व हतपाये खुजले होते त्यासी होन २० सि मोल करून अदसेटी व त्याच लेकू तुकसेटी व बहिरण पटेल व त्याच लेकू तुकसेटी सिद्जी यैसे घेउनू खन मस्यरनिलेसी बोलिले जे हे छावा होन २० सी अपुले तव रकबत खुशतुर्दीने देतो हे छाव घेइजे म्हणौन तरी खान मस्यरनिले ते छाव इलती म्हणौन ने घेतीच मग अदसेटीने जेहली करून पाये धरिले जे हर हिले हे छावा घेइजे म्हणौन मग जरूर ते धाकुटा छाव इलतीसी होन २० अदसेटीसी देउनू छावा खरीद करून घेतले दुसरे दिसी बाहिरी अदसेटीच लेकू तुकसेटी बोलिल [अपूर्ण*]

ले. १० सु. ९९५ }
हि. १००३ रजब १२ }

९३

[१६ बुर्जी फा. शि.*]

{ श. १५१७ चैत्र शुद्ध १३
{ इ. १५९५ मार्च १३

ई अज रख्तखाने खुदायेवंद खाने अजम आकुसखाने खुलिद्चाम दौलतहू ता। मळसेटी गौंडा कसबे सगर वस्तादाबाद मामले मजकूर दाम तायेदहू बिदानद की हर्ची सु॥ खमस तिसैन व तिसा मेया तुम्ही अर्दास छ ४ माहे रजब सलास अलफू रवाना केली ते हुजूर छ १० माहे हाल पैवस्ता होउनू येक बायेक माळूम जाहाले रायेणा बसेटी बाहीर पडोनू हरकती करीत असे येक थली उभा राहून निवाडा करी यैसी ततबीर करा-विया माहालासी खुर्दखत सादिर कराविया रजा फर्माविले पाहिजे म्हणौउनू लिहिले तरी ये बाबे सैद सेख लाउदी दादू सरसमतासी खुर्दखत सादिर केले असे परी हे मिरासीचे काम विलायेती हकजवार तुम्हासी जाणते त्यासी जाणत असेळ तुम्ही आठपधरा दिवस मशाखती करून हर ततबिरीने तो कोणे गावी असेल त्यासी बितैन पाळती लाउनू तेथीलच देसाई गौडे यापासी नेउनू त्याचे आंगी लाउनू निवाडा करावियासी येक थळ नेमू केला जाईल परी उगेची गावामधे बैसलो असोनू तो येके थली उभा राहून निवाडा करीळ हे गलत आहे निवाडा करून घेतलिया तुम्ही निसूर गौडिकी कराळ आणि विलायेतीही किर्दीमामुरी होईल तुम्ही बहुते रीती लिहिले की साहेबी अपणासी गौडिकी मन्हामती करून सरफराज केले म्हणौउनू तरी अम्ही तुज सरफराज केलियासी तुम्ही रायेणाचे मुनसफीसी येके थली उभे राहून निवाडा केलिया का॥ मजकुराची रयेत सुखी असेल किर्दीमामुरी होईल म्हाणिजे अमची थोर नफराई केली यैसे होईळ तु हळालखोर आहेसी अमचे नफराईसी व विळायेतीचे मामुरीस तकसीर न करणे तमाम विलायेतीस तख्त-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पटीची सिस्ती जाहाली आहे तुम्ही तख्तपटी पोख्ता सिस्ती करून देउनू हुजूर रसद येस्यामधे पाठविले म्हणिजे थोर नफराई असे बाा खुाा

तेरीख १२ माहे रजब सळास व अळफू [नि.*] बार सुरनिवीस

ले. ११ सु. १०१५ }
हि. १०२३ शव्वाल १० }
९४
{ श. १५३६ कार्तिक शुद्ध १२
{ इ. १६१४ नोव्हेंबर ३

[२ फा. शि. वं ८ ओ. फा. मज.*]

कौलनामा अज दिवाण किले शाहदुर्ग ताां देसाई व मोकदमानि व सेटे माहाजनानि मामले सोनलापूर अज पूजा स्रिरी सरस्वाती सुाा सन खमस असर अलफ जात्रा खडेराऊ चपे छेटी किले मजकूर सालाबाद येउनू जात्रा मामूर करित होतेती तैसेची साल मजकुरासी येउनू जात्रा मामूर करणे तुमचे मान मानणूक सालाबाद परमाणे पालणूक करून काही अदेसा न करिता येइजे मो

तेरीख १० माहे शौवाल सन सलास असरीन अल[फ]

ले. १२ सु. १०१८ }
जखर ६ [अखेर साल] }
९५
[२ फा. शि.*]
{श. १५४० ज्येष्ठ शुद्ध ८
{इ. १६१८ मे २१

अज रख्तखाने खुाा माा सर्क माा अंबर खुाा दौलतहू ता देसमूख व पाटेळ व चौधरी व देसकुलकर्णी माा सोनळापूर चिदानद सुाा समान अशर अलफ दाा छ १७ माहे जमादिलवल राा छ २६ माहे मिनहू मजमून सेरीकरास माहली रजा दिधली जे हली सचणीचा वख्त असे प्रजालोकास तकवादिलदारी देउनू किर्दीस वाकिब होणे आफ्तसालकरिता कितीयेक प्रजा सुकाला देसास गेले त्याचा मुदा घेउनू कौळू बोल देउनू अणणे सालापासुनू मेहू बहमुराद होईल किर्दीचे बाबे तकसीर न कीजे म्हणौनू रजा फर्माविली तरी वरसात नव्हता याकरिता रयेतीचा हाल कांहि नाही पेस्तर मामुरीवरी नजर देउनू कौळू ये रीती देणे रयेती कवीहाल हेउनू अपलाले गावासी येउनू किर्दीमामुरी करितील म्हणौनू बोलताती तरी कौळू मन्हमती केला पाहिजे म्हणौनू ताावार लिहिले तरी तमाम अमल कारकुनास दखल कीजे ते मनास अणौनू सरजामी देहतील नतर याचेन विल्हे न लगेल ते हुजूर लिहितील हुजुरून विले लागेल [मो.*]

तेरीख ६ जमादिलाखर माहे जमादिलाखर

बार सुदू सुरू सुदू

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. १३ सु. १०२० रजब १ [अखेर साल] — ९६ [फा. मज.*] — श. १५४२ ज्येष्ठ शुद्ध २ इ. १६२० मे २३

ई कौलनामा अज दिवाण कोट मामले सोलापूर हवाले सीदी अबर लतीफ हवालदार ता मोकदमानी देहाये मामले मजकूर सुा आसरैन अलफ दादे कौलनामा ऐसा जे तुम्ही गावाहु करुनू गेलेती यावरी तुमचा मकसुदू घेता तुम्ही मकसुदूनामा लेहोनू इरसाल केला तेथे मजमू बिता।

कोटासी फर्मासी कारकिर्दी अली हजरती जैसी देत होतो तैसी घेणे ज्याजती फर्मासी केली आहे ते माफ करणे म्हणौनू लिहिले तरी फर्मासी कारकिर्दी अली हजरती जैसी दिधली असेली तेणेप्रमाणे घेउनू जाजतीची तसवीस न लगे मोर्तब सुदूं

बेगारी ज्या गावी राबतो त्याचा हक दुमाले करणे जे गावी राबत नसेली त्याचा हक जमा करुनू घेणे म्हणौनू लिहिले तरी जो नफर राबत असेली त्याचा हक दुमाले होईल राबत नसेली त्याचा हक जमा होईल मोर्तब सुदू

तगटाचा गला अबारखाना माप घेताती ते रहारास उतरीने घेणे म्हणौनू तरी माप रहारास घेउनू गावगना कटबाण जाले आहे ते दिवाण सर्फेयाने जाले आहे याकरिता रयेती लोक दिलगीर जाले आहेती व कैलाची रसम दिवाण लाजिमे दिवा[णा]सी देउनू प्रजेचे लाजिमे प्रजास देउनू बराबरी वाटुनू देत होतो राजासी व प्रजासी लाजिमे नाहीत तरी नफर तुसकी काहाडुनू बराबरी वाटुनू घेत होतो दरी वख्त लाजिमे नेदिता दिवाणास कुडो ॥१ व प्रजसी कुडो ।४ प्रमाणे कैल करुनू नेले हे दिधले नव

इमारतीस चुना गहदम दिधला नाही हाली जो चुना घेतला तो घेतला बाकी राहिला आहे त्याचा तागादा लाविला आहे तरी याची तसवीस न लावणे म्हणौनू लिहिले तरी चुना तहसील जाला तो जाला बाकी राहिला असेली याची तसवीस न लगे मोर्तब सुदू

आडया(पा)लीचा माहार आपल्या सुखे राबेली तरी राबणूक घेणे राबेना त्याचा हक आपणासी न मागणे आडया(पा)लीचा हक म्हणौनू वराता केल्या आहेती त्या दुरी करणे म्हणौनू लिहिले तरी ये बाबे हुजुरू लेहोनू जवाब आणौनू तुमचा खातीर तसले करून ये बाबे काही मुलाहिजा न कीजे मोर्तब सुदू

कडबा जे गावी वाटा असेली तेथे वाटा घेणे जे गावी बाबा कडबा दर खडीस हर दो हिसा रुके ८९ नवू जे असेती ते घेणे दरी वख्त दर खडीस कटाली ३५ देणे म्हणौनू देसमुखापासुनू कतबा घेतला आहे तो दुरी करणे बरहुकूम कानू सदरहूप्रमाणे कमावीस करणे म्हणौनू तरी कडबा सालाबादप्रमाणे घेउनू देसमुखापासुनू कतबा घेतला आहे तो रद असे कानूप्रमाणे देणे मोर्तब सुदू

मदरूप व अहिरवाडी येथील माप कोट मजकुरीच्या मापाहुनू जबर अहे तपसील

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जाये पेसजी कारकिर्दी अली हजरती जैसी कैले करीत होतो तैसी कैले करणे म्हणौनू तरी कैलाची सिस्त कारकिर्दी माजी सिस्त जाली होती तेणेप्रमाणे हालीही कैल होत होती आता तुम्ही सदरहूप्रमाणे लिहिले तरी जैसी कारकिर्दी अली हजरती जैसी कैले जाली असतीळ तेणेप्रमाणे कैले होतीळ मोर्तब सुदू

तीळ व अलसीची जकाती कानूमध्ये भिडाविली असे प्रजभागास जकाती नाही हाली दर खडीस प्रताप मागुताती दिधली नव जाये म्हणौनू तरी जैसे कारकिर्दी अली हजरती चालिळे असेली तेणेप्रमाणे कमावीस होईळ नवी जिकीर नव्हे मोर्तब सुदू

अली हजरतीचे वेळे मुकासाइचापैकी देह ६ ता।

हिरज	तिन्हे
होनवल	तेलगौ
डाणगौ	कविठे

सदरहू गावीचे मुकासाई जुलूम करुनू तूप मापी घेत असेती विलायेतीस कानू वजन असे आता तैसे दिधले नव जाये कानूबरहुकम घेणे म्हणौनू तरी या सदरहू गावाखेरीज वरकडा गावी मापी तूप नसेली तरी बरहुकूम कानू घेउनू नवे जिकीर न करुनू जाणिजे मोर्तब सुदू

मौजे देगौ पेसजी भागस्थल होता अनवट्याची खोती होती माजी मुकासाई दिवाण लाजिमे याचे दुमाले करून रकम करुनू दिधली होती हाली भाग-स्थलाचे कटवाण जाले आहे त्याखाळे अवघे लाजिमे आले आहेती साळ गुा। मदरूप दर कुडवास पाइली ऽऽ१ व अहिरवाडी दर मणे ऽऽ।। येणेप्रमाणे दोही समताची मापे जबर आहेती समत मजकुरीच्या गावीचा गला सदरहूप्रमाणे तफवात देणे म्हणौनू देसमुखापासुनू कतबा घेतला अहे व सदरहू नफवाता देखील माप घेतळे अहे ते अपळेचेन न देवे अंबारखानाचे माप तुलाधार पेस्तर घेत जाणे तफवात जो घेतला असेली तो मजुरा देणे म्हणौनू तरी सदरहू समताची माप जबर आहे तेणेप्रमाण घेतले पाहिजे म्हणौनू देसमुखाचा कतबा घेऊनू हुजुरू खबर लिहिली आहे हाली तुम्ही म्हणता जे सदरहू तपवात आपळेने दिधला नव जाये म्हणौनू तरी ये बाबे पेसजी हुजुरू लिहिले आहे हाली बगर रजा अमळ करिता न ये ये बाबे हुजुरू ळेहोनू जवाब आणौनू तुमचा खातीर तसळे करुनू ये बाबे तुम्ही काही मुलाहिजा न कीजे मोर्तब सुदू

माजी मुकासाई कोण्ही कोण्ही पडला सेते करीत होते त्याचे नख्त मजुरा देत होते व कितेयेका गावी मजुरा देत नव्हते त्याबदळ नखतेयातीपैकी सेडी मोकली करीत होते म्हणौनू तरी ये बाबे नवी जिकीर नव्हे तुम्ही काही सक न कीजे माजी मुकासाई जेणेप्रमाणे घेत होते तेणचप्रमाणे हाली अमल होईल मौजे देगौ येथीळ कटबाणाचा तह करिता माकदम कटबाण कबूल न करितीच कतबा दिधला जे भागस्थला राजी असे सेराणा धरिला तरी दर सेर प्रताप घेणे यावरुनू सेराणा होनू २७८ सतावीस

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अनवट म्हणौनू होनू २३८ जुलूम करुनू घेतले आता साल मो होनू ३७८ वरात केली असे त्याबद्दल प्रजा बेदिल जालेया आहेती माफ करणे म्हणौनू तरी साल मा। आवटावरी वरात तरी जाली नाही कास्पटवरुनू लिहिले अता कटबाणामधे सदरहूचा लाजिमा आला असेली तरी तसवीस नेदू काही सक न कीजे मोर्तब सुदू

पेसजी मोहतर्फे ळोकास महिने माळ घेत होते हाली कडाकारूक मागताती म्हणौनू मोहतर्फी लोके रजीस होताती माफ करणे म्हणौनू तरी कडा कारुक कानू [तु*] म्ही लेहोनू दिधली अहे तेणे-प्रमाणे कमावीस होत होती हाली तुम्ही सदरहूप्रमाणे लिहिले तरी कारकिर्दी अली हजरती जैसी कमावीस जाली असेली तणेप्रमाणे घेउनू नवी जिकीर नव्हे मोर्तब सुदू

कपास साळाबाद पासेरीचे माप वजन करुनू घेत असेती त्याणेप्रमाणे घेणे म्हणौनू तरी सालाबादप्रमाणे माप घेउनू कपास केली लिहिला अहे आता तुम्ही येसे लिहिले तरी सलाबादप्रमाणे घेउनू मार्तब

अबराचा कडबा कोटास कधी चाल-विला नाही म्हणौनू तरी कडबा कोटास अणऊ ना जाणिजे मोर्तब सुदू

मौजे देगौ येथे धणगराची दोडी चैघे भावी येकी दोडी घातली आहे त्यास सालाबाद प्रताप व रुके नव देताती अता जाजती मागताती ते दिधले नव घेतला तो मजुरा देणे म्हणौनू लिहिले तरी सदरहू अमळ हुजुरू लिहिला आहे हाली तुम्ही सदरहूप्रमाणे लिहिले तरी ये बाबेही लिहुनू ये अर्ज लेहोनू जवाब आणौनू तुमच्या मुदेयासारिखे सरजामी होईळ काही मुलाहिजा ने कीजे मोर्तब सुदू

जिराती ळोकास कडा कारुक माग-ताती तो नेदवे म्हणौनू तरी जैसे कारकिर्दी अली हजरती चालिले असेली तेणेप्रमाणे चालउनू नवी जिकीर ने करू

सेतामधे भुडकी करुनू मोट लाउनू मला केला तरी कटबाण असे ते घेणे भुडकी त्यास नाही त्यापासी न मागणे म्हणौनू तरी सदरहूप्रमाणे अमल होईळ बर हुकूम कौल अमळ होईळ कौलप्रमाणे घेउनू मोर्तब सुदू

बागाच्या मसाहातीदारास व कैलाच्या कैलादारास रोजमरा रयेती निसबती देविताती तो नेदवे म्हणौनू तरी रोजमरा रयेती निसबती नेदऊ नवी जिकीर करू मोर्तब सुदू

बलुतेयास रानसेणवणी कानमधे अहे त्याखेरीज कधी काही दिधळे नाही ते नेघणे म्हणौनू तरी बरहुकूम कानू घेउनू जाजती तसवीस ने लऊ मोर्तब सुदू

तुवाडेयाच्या प्रजा व तुटक उटक प्रजा गयाळ जाळेया असतीळ त्याची सेते दुसरे प्रजेसी कौलाने लाविलेया नख्त नुकसान जे होईळ ते नख्तयातीमधे मजुरा देणे म्हणौनू तरी बरवे रीती प्रज-गत मनास अणौनू गेले प्रजेचे सेत दुसरे प्रजेस कौले लाविलेयाने नुकसान होईळ ते मजुरा होईळ मोर्तब सुदू

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जाये म्हणौनू तरी सालाबादेप्रमाणें घेउनू नवी जिकीर नव्हे मोर्तब सुदू

साल मजकुरी भागस्थल कमावीस करणे नागरटी व पडी कौलप्रमाणे घालावे गहू व चणेचे बीज व दरवस्ताची मजुरी सालाबादप्रमाणे घालणे म्हणौनू तरी सालाबादप्रमाणे सदरहू कमावीस करुनू मोर्तब सुदू

कुलकरणी याचा हक कुलकरणी यास देवणे म्हणौनू तरी कुलकरणी याचा हक कुळकरणी यास देउनू मोर्तब सुदू

नख्तयाती व बाजे नख्त व बाकी जे राहिली असेली ते साल मजकुरी खरीफाचे हगामी घेणे म्हणौनू तरी सदरहू-प्रमाणे कौल असे मोर्तब सुदू

मोकदम व चैगळे याचे हकलाजिमे व कडबे सालाबाद चालिले असेली तेणे-प्रमाणे चालवणे म्हणौनू तरी सालाबाद-प्रमाणे चालउनू मोर्तब सुदू

आवटियास खडीस पाइली ऽऽ२ देणे म्हणौनू खुर्दखत सादर केले असे ते ने-द्वे म्हणौनू तरी सालाबाद नसेली तरी नेदऊ नवी जिकीर न करू मोर्तब सुदू

तगटाचा गला बाकी राहिलो असेली तो खरीफाचे हगामी घेणे म्हणौनू तरी गला खडी १०ऽ दाहावरी जे गावी बाकी खेरीज कलदूस असेली तो गला खरिफाचे हगामी घेउनू सदरहूहून जो जाजती असेली तो हाली मुदती फुरसतीने देणे मोर्तब सुदू

सदरहूप्रमाणे कौल असे सुखे बेसक होउनू येइजे कोण्हे बाबे ताळूक आदेसा न कीजे सुखे किर्दी मामुरी कीजे सदरहूप्रमाणे कौल पाळुनू जाणिजे मोर्तब सुदू [प. मो.*] मुरत्तब शुद तेरीख १ माहे रजब रजब

ले. १४ सु. १०२१ रमजान ३०	९७ [फा. शि.*]	श. १५४२ भाद्रपद शुद्ध २ इ. १६२० ऑगस्ट १९

अज दिवाण मामले सदलापूर तां हिरोजी पटेल देसमुख मामले मजकूर बिदानद सुा सन इहिदे असरीन व अलफ तुम्ही हुजुरू येउनू माळूम केले जे अपणासी वा अदिसेटी बिन मलकणा सेटिया पेठ येदलापूर मामले मजकूरसी गणेसाचे मानाबदल गरगशा होता कारकिर्दी निजामशाहाचे वेळे आपले या सेटिया मजकुराचे मुनासिफी होउनू माहजर जाहले बाा माहजर अपण गणेसाचे मान पैहिले घेतो हाली अदिसेटी सेटिया पेठ मजकूर बोलतो जे ते माहजर लटिके असे म्हणौन त्यावरी अदिसेटी सेटिया मजकुरासी हुजुरू बोलाउनू तफवास करिता सेटिया मजकूर बोलिला जे ते वेळे मुनासिफी जाहले नाही माहजर लटिके असे म्हणौन यावरी हर दो जणौसी कतबे घेउनू माहजरमधे जो कोण्ही गोहदार लिहिले होते त्यासी हुजुरू बोलाउनू तफवास करिता गोहदारी बोलिले जे निजामशाहचे वेळे देसमुखाचे वा सेटियाचे मुनासिफी होउनू माहजार जाहला असे ते खरे असे म्हणौन बोलिले अता बाा माहजर हुजुरू अहावाल

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लिहून हुजत अणवावे तरी खा ममलकत मदारी [मो.जा.*] कपलवलचे मोहीमसीर असेती ते सैही सलामत येताची निघा करून तवपरियेतर तुम्ही वा आदिसटी पेठ मजकूर हर दो जण अपले दुकानी गणेस न बैसणे पेस्तर तुमचे माहजर बा। निघा होईल ये बाबे कही अदेशा न कीजे मो। छ ३० रमजा ताजा इशरत अदिसेटी सेटिया मजकुरासी तफवास केले पैहिले तुझे मान अहे यैसे कोण्ही गोही असे की कये यावरी अदिसेटी मजकूर बोलिला जे कोण्ही गोही नाही म्हणौन यावरी तुम्हासी दा। सदरहू मिसेल सादिर केले असे [पट्कोनी मो.*]

ले. १५ सु. १०२१ } जिल्काद १ }

९८

{ श. १५४२ आश्विन शुद्ध ३ { इ. १६२० सप्टेंबर १८

यादि माडींचे पाडेवाराची बुनियादी तरी अवल मिरासी पाडेवाराची पाडेवार करीत येत असता दिवाणाने पेठेमधे बुरूज वाडा उठविले तेथे भाडे उभारना यैसे जाले तेथे माहाराची नवरा–नवरी अघरे मागू लागली मग हे खबरी माहारासी माळूम होऊन आपत्येण पळून गेली गावी कोणी नाही यैसे जाले मग देसोरी बाहीर उतरले होते त्यास बोलाऊन दिवाणाने दिवाणकाम लाविले व गावगुतीचे राहाटी चालवू लागलेवरी कितीयेक दिवसा पाडेवार अपली मिरासी म्हणऊन...आले त्यानी मागासी दुन्हाई दिधली यैसे गरगशा लागले असता येक रोज मागानी माहा[रा]स वीख देऊन मारिलेवरी उरले पाडेवार देसधडी होऊन गेलेवरी कितेक वरिसा पाडेवारानी मिरासीची वास्ता धरून मीर पोखरदीनास मोकासा होता ते वख्ती आले तो गाव शाहादुर्गाखाले चालत होत रखमाजी हेजिबास दिधला होता तो हेजीब विजापुरी मोकाम होता ते वख्ती माये नाईक व मल नाईक व लख नाईक व जख नाईक यैसे चौघे जण येऊन मागुती मागास दुन्हाई दिधले त्यावरी कारकुनानी जमान घेतले बि॥

मागास जमान	पाडेवा[रा]स जमान
१ नादणजेचे पाडेवार	१ बोरामणीचा ईसर नाईक
१ ताबुलवाडींचे पाडेवार	१ कुमटेचे चाम नाईक

यैसे जमान घेऊन ठाणे किले शाहादुर्गास पाठविलेवरी ठाणेमधे हर दो जणा-जवली ठाणे जमान मागितील तरी ठाणे जमान दिधले बि॥

पाडेवारास जमान	मागास जमान
१ आलादी नाईक बुरहानपूरकर	सिद राऊत बिन परम राऊत
१ सिव नाईक जलकोटकर	बोरामणी १
१ अणदुरणकर अकुशराऊ	

यैसे ठाणे जमान घेऊन अदीधरकखाणास चीलपत्र देऊन पाडेवारामधे मल नाईक व माग येक यैसे दोघे जणास अदबखाना ठेऊन वरकड मागा–माहारास

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कळ्याणास पाठविलेवरी तेथे माग खोटे जाले व माहार खरे होउनू कागद घेऊन शाहादुर्गास आले तो मल नाइकास व मागास अदबखाना ठेविले होते तो माहार मकूल होउनू मरत होता तो माहारास घेऊन हारजितीचे कागदसमवत का।। मार्डीस अलेवरी तो पाडेवार मयत जाले दुसरे रोजी समस्त सभानाईक बोळून कागद पाहिले तै कागद देतो म्हणून लपविलेवरी कागद नेदीत म्हणून माहार फिर्यादीस हुजूर विजापुरास जाउनू ताकीद घेऊन आला त्यावरी परमणा मुतालीक व खडो येमाजी थैसे गाव वैसून समुदे कथली ताडून माग माहार बराबरी करून ठेविले ते माहाजर करून दिल्हे थैसे चालत येत असता परभ नाईक व अणीक दोघे पाडेवार नाटेकारीपण करीत होते येके रोजी मागानी त्या तिघा जणास तोडिलेवरी दुकला म्हणून भेऊन मागुती दुकली करिता भोई सोडून गेले त्यावरी माग करीत येत आहेती पुढे मलि[क] राहानाने राहानपूर तुसविले माहाजर जाले ते वख्ती सु।। इहिदे असरीन अलफ छ १ माहे जिलकाद

ले. १६ सु. १०२१ रखर २०	९९ तालीक	श. १५४२ फाल्गून वद्य ७ इ. १६२१ मार्च ४

[आरंभीं फार्सीत ' वल खलील ' असे शब्द*]

आज दिवाण रा। खास बजानेब खान अजम आलमखान खकानी नामजाद व हवालदार व कारकुनानी व कमाविसदारानी हाल व इस्तकबाल कसबा व कर्याती- हाये मामिले सोनलापूर बिदानद हर्ची सु सन इहिदे आशरीन अलफ { मैया { बा।ो येलीसेटी बिन मेगीसेटी देसाई कर्यातीहाये सा। मारडी हुजूर येऊन माळम केले जे जकायेती चौत्रा पतकहाये कमावीश का।। मजकुरी होत असे आपणास कदीमल अयाम सनद बरीदशहापासून दर गोणी भूस बरीदी ४·॥ व विदल दर रास बरीदी ४१ प्रमाणे चालत आले आहे त्यावरी पादशाही तसरुफत कोट काबीज जालेवरी दर अमल आगा जरीफनमुळूक हवालदार धरून साल गुदस्तापावतो चालत आले आहे हाली साल मजकुरी खान मशारनुइले नामजाद आहेती यासि जकायेतीवरी तनखा जाले आहे त्याचे कमाविसदार अपले विस्वायासी हरकती केली आहे ताजा सनद हासिल जालिया अपला विस्वा चालऊन देतील या बाबे उमेदवार असो म्हणौन माळूम केले बराये माळुमाती खातिरेसी आणून दौलतखोही आबादानीवरी नजर देऊन पेसजी दर अमल बरीदशाहा बरहुकूम भोगवटा सालाबादप्रमाणे मोकरर हाली करून दिल्हे असे: भूस दर गोणी रास शाही ४१ व विदल दर रास ४१॥' प्रमाणे शाही चालऊन दीजे उजूर न कीजे तालीक लिहून घेऊन असल सनद परतून देसाई मजकुरास परतून दीजे मोर्तबू

तेरीख २० माहे रबिलाखर

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. १७ सु. १०५५ रमजान १० } १०० { श. १५७६ श्रावण शुद्ध ११ इ. १६५४ जुलै १५

[कागदाच्या डोक्यावर व ३–५ ओळींच्या डाव्या अंगास अफजलखानाचे प्रायः एकाच फार्सी मजकुराचे दोन वाटोळे शिक्के. डोक्यावरील शिक्का दुवलयी. आंतल्या वलयांत ' अफजलखान मुहम्मदशाही ' आणि बाहेरच्या वलयांत क्रमानें ' गर अर्ज कुनद सिपह्र अअ्ला फजल फुजला व फजल अफजल अज्ञ हर मुल्की बजाए तसबीह आवाज्ञ आयद अफजल अफजल ' असा मजकूर. दुसऱ्या डाव्या अंगच्या शिक्क्यांत " अफजलखान मुहम्मदशाही ' हा मजकूर नाहीं. शिक्क्याखालीं व उजवे बाजूस ११ ओळी फार्सी मजकूर*]

अज रखतखाने खुदायेवद खान अलीशान खा। अफजलखान माहमदशाही खुलिद्याम दौलतहू ता। लिंगीसेटी मोकदम व आदिकासेटी कारणीं व येमाजी पटेल व लखणा अरवतवकल का। अफजलपूर उ। महिदिरी बिदानद सु॥ सन खमस खमसैन अलफ आरीजा पाठविले ते पावोनू मजमून खातिरेसी आली अपला व कसबा व गावगानाचे येसे कितेक अहावाल ता। लिहिले त्यावरून येक बयेक माळूम जाहले तुवा हलालनमकी मोकदम आहेत तुज वाजिब आहे की करडी कमावीस जाली अगर कारकुनापासुनू गैर जाले तरी तुवा हुजूर येउनू कदम पाहुनू अपला व कसबाचा वा विलायेतीचा येसे अहावाल सागुनू सरफराज होउनू जावे येसे न करिता येन सचणी- मामुरीचा वखती रयेतास बा। घेउनू पर मुकासाइयाचे गावामधे जाउनू बैसोनू पेरणियाचा खोलवा करणे काये माना आहे तुवा आम्हासी खूब समजला असौनू येसे कम अखलीचे फैल करणे मुनासीब नाही येसे कचे अखलेने तुझी खुबी व खैरत नाही आता तुवा दर हर बाब अपला खातिर जमा करुनू रयेता तुजपासी जे कोण असतील त्या समवेत हुजूर स्वार होउनू येणे येथे आलियावरी तुझे जबानीने येक बयेक तमाम हकीकत खातिरसी आणुनू त्यासारिखे सरंजाम फर्माउनू सरफराज करुनू माहलासी विदा करुनू हुजूर आलियावरी तुझी खुबी व खैरत आहे कारकुनाचे तरफेने गैर अमल जाली असलिया त्याच्या मुलाहिजा व शरमखुरी अम्हासी काये आहे सर जोर तर्बियेत फर्माउनू की दुसरा कारकून कोणी माहलामधे गैर चलंत न करीत येसे करुनू रयेत अमचे पोंगडे आहेती येसे जाणतो जरी याचे अजार व तसवीस नव्हेल हक हिसाची जो अमल असेल तोच होईल ये बाबे तुज कौल आहे खातिर जमा करून दर हाल स्वार होउनू हुजूर येणे अगर बरे वाटेल तरी माहलासी जाउनू सचणी मामुरीचे विले देखणे जे वखती खुसीने येईल ते वखती येउनू कदम पहणे येसे न करिता बाहीर बैसून राहिलिया त्यामधे तुझी खैरत नाही जेथे अससील व जेथे जासील तेथुनू खोदुनू काढुनू जो आसिरा देउनू ठेउनू घेईल त्यास जनोबासमेत काढुनू घाणियांत घालुनू पिलोन हे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तुम्ही येकीन व तहकीक जाणणे [नि*] मोर्तबू [ब. शि.*] खतम चिलखैर व अज्जफरु
[एक न लागता शेरा*] रुजू सुरुनिवीस
तरीख १० रमजान रुजू

ले. १८ फ. १०८६ } १०१ { श. १५९८–९९ इ. १६७६–७७

नवाब येलिचखान साहेबाचे धर्मगददास

कबज बाा आबाजी वलद जोगोजी मोकदम देसमुख काा अहीरवाडी सरकार सोलापूर सुा सन हजार १०८६ लिहून दिल्हे कबज यैसा जे चिलणा मसालची वस्ती मौजे बोरामणी पा सोलापूर त्याची बेटी लस्कराचे लोकानी नेली होती ते [मो. जा.*] चौकीमधे येलिचपुरी सापडली ते नवाबसाहेबी मेहरवानगी फर्माऊन सोलापुराचे विलायेतीची छोकरी म्हणून दिवाण [मो. जा.*] यासी लिहिले की छोकरी पाठविली अहे हे देशमूख–देसपाडेचे ताबीन करून कबज पाठवणे त्यावरून दिवाणसाहेबी तफवास घेता छोकरीचा बाप चिलणा मयेत जाला होता छोकरीची माये व भाई पाा अहीरवाडी विलायेतीचे चिचोलीस होती त्याबदल साहेबी अपणास बोलाऊन अपले ताबीन केले ते छोकरी दिवाण धर्मगददास साहेबाचे मारूफ अपणास पावली छोकरीचे मायेचे ताबीन करून देउनू हा कबज सही

ले. १९ वि. १७३४ भाद्रपद वद्य ५ मंगळ } १०२ { श. १५९९ श्रावण वद्य ५ इ. १६७७ ऑगस्ट ७

[पाहिल्या ओळीचे उजवीकडे*] सहः ॥ ॥।

मचा हैदरी यासी सोडविले त्याचे फारिखत

[बालबोधींत*] फारषत बाा रणछोडदास नोकर रावतमलजी छोकरा १ षरीद रुपईय ८ कू ले जाता थ सोलापूरका वारस पेदा हुअ रुपय ८ हमरी तई दीच छोकरा छोड लीच अन छोकरेषु दावा नही ऐन छोकरेका दाव करे तो ऊनका जवब अप करू लखत सही

सवत १७३४ भद्वा चदी ५ मगलवर

ले. २० हि. १०८९ जिल्काद २९ } १०३ { श. १६०० माघ शुद्ध १ इ. १६७९ जानेवारी ३

मोकदमानी मौजे एर्हली पाा मोहल सुा सन १०८९ माळीम दानद पाा सोलापुरावरी हिरोजी देसमुखाचे नाव घेउनू हिरियेणा दंद करितो तरी तो नफरास कैद कराव्यासी घोडी पाठविली आहेती तरी तो नफर दंदी असे त्यास अमचे लोक आणिता तुम्ही मुजाहीम न होणे मोर्तबू
तेरीख २९ जिलकाद

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. २१ फ. १०९० रजब २१ } १०४ [फा. शि.*] { श. १६०२ श्रावण वद्य ८ इ. १६८० ऑगस्ट ७

खाा पत्र बााे राजेश्री हिरोजी देसमूख किले सोलापूर यासी कलसपा वाा मेलसेटी साो कलाढोण हाली काा मजकूर सुा सन हजार १०९० कारणे लिहुनू दिल्हे विकरीत पत्र येैसा जे आपले लेक देया वरिखे ९ णऊ रंग सावले तुम्हासी फरोख्त करुनू दिल्हे किंमती होनू १८ येक अपणे घेतल असे पेस्तर दावा करणेसी अपणासी अपले वेरिसदारासी निसबती नाही हे लिहुनू दिल्हे खरीदपत्र सही छ २१ माहे रजबू

गोही

बिाा तिमाजी रखमाजी देसपांडे
पत्राप्राा साक्ष
कृीष्णा मोकदम मौजे बाले
सैफन मोकदम मौजे वलसंग
बदले सदी हजारी कोटिला
[डावे अंगास*] कळसपा

बााा रंगो आपाजी देशपाडे
देऊजी मोकदम मौजे कविठे
लखमेशर हकसरिया नवकर
निाा मोहुलकर

ले. २२ श. १६८० बहुधान्य आषाढ शुद्ध १ गुरु फ. ११६७ सवाल २९ } १०५ श्रीरामप्रसनः { श. १६८० आषाढ शुद्ध १ इ. १७५८ जुलै ६

सोलापूर कोट निर्माण जाहला इा शालिवान सक १२३९ अनंद सवछंर भाद्रपद मास अस्टमी बुध[वा*]री अरंभ केला त्यामधे बेदरची पाछाई त्याचे खोजाने बांधिला हसन गंगूची पाछाई

येलीकडे इसीफ अदलशाने पांच मण सोने देऊन सोलापूर व पुजापूर घेतले याचे किलेदार १३

१०।३।७ कामिलखान १
६।१।२ तुमरूद मामदी २
६।१।८ बजीतखान ३
४।३।७ खोजा इमराईम ४
३।०।१२ कामिलखान ५
४।२।७ कासिम लई ६
३।४।३ अली हक ७
२।१।५ बिजलीखान
३९।४।१८(२१)

३।५।९ दौलत गिलिरी
४।१।२८ सैदखान
१।३।२ शाहा मीर बेग
४।५।३ मीर माहमद
०।२।१९ अबदुल यली ताजादार
१३।६।१
३९।४।१८
५२।१०।१९ तेरीज

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अबदुल अलीखान ताजदाराने मण पाच सोने घेऊन निजामशाहासी कोट दिल्ह त्याचे किलेदार १

बास्याखान १	पुरवणी निजामशाही	
१०।१।२१	१।१।०	नसरखान
४५।१।२१	०।०।२२	अलोटखान
	५।५।९	अदम पोलादखान
५५।३।१२	६।१।२२	शमशादी पोलादखान
	२।१।२	अलीखान
	५।३।८	शाहा मीरखान
	५।३।८	मराठा बाबाजी जाधव
	५।१।७	अमनखान
	०।७।७	बुऱ्हानखान त्याने सुभानपुरु पेठ वसविले
	२।९।२०	पीर माहमद जाबितखान
	४।७।१६	शमशारखान
	४।४।१०	वलीखान
	१।१।१०	करीमशाह
	४५।१।२१	

तेथून इभराईम यदलशाहाने फितबा करून मागुन घेतला त्याचे किलेदार २

११।७।५ रेहान धुमसू चित्याखान

५।३।११ तौकल पोलादखान बुरती जुजून पडला मृत्य जाइला

त्यावरी लिंगोजी धर्मराऊ कोट खाली करून वदलशाहसी दिल्हा

११।७।१० अगा जमशद मुल्क — सीदी यतीफ

तेथून { तेथून { इभराईम येदलशाहसी सलाने दिल्हा

०।३।२१ मिर्जाखान — ४।२।२२ दस्तूरखान

तेथून बहुधान्य नाम संवछरी मलिक अंबरे वेढा घाळून लक्ष घोडा मेलऊन दक्षण भागी मुल्क मैदान लाऊन सुलतानढवा करून कौल देऊन घेतले त्याचे काा

०।६।२५ सीदी याकूब

११।८।३ सीदी राहान

०।४।२ माहलदारखान

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

चाउपरी सीदी राहानाने बहुधान्य नाम सवंछर स्रावण मासे शुध चतुर्थीसी वजिरासी मेलऊन घेऊन सल्हा करून घेतले त्याचे किलेदार

०। ७।१८ मलिक सदल
०। ९। ७ अबदुल नबी
०। ६। ३ सुरूरखान
०। ३। २ मलिक रहान
०।१०।२८ अमदशाह

०। ८। ९ माहमद सादात
०।११। ४ मलिक शाबाज
०। ४।१५ सीदी मिरा
०। ७।२८ आहमद सादात
०। ६।२० सैद अशरफ

६। ३।१४

०। ८।२६ हसन रूमेखान
०।१०।२५ माहमद कासिम
०। ९। ८ सैद अशरफ
१। ३।२१ मिर्झा इसीफ
३। १। ४ ———
१।१०। ० माहमद जाबितखान
२।१०।२५ हसन रूमीखान
१। १।२८ त्याचे लेक महमद रूमीखान
०। ८।१३ अफजलखान
१। १। ० माहमद रूमीखान
४। ४।१६ मिरां अबदुल कादिर सन्याद-खान सूबे कयली माहल बांधविला

१८।१०।१६

चाउपरी दिलीचे पादशाहाचे उमराऊ सुभा दिलेलखान याने जानतरायासीं सादेसी लाऊन घेतला अशाड अधिक मास रात्री घटिका ७ पले ३० ये समई इलिचखान प्रवेस जाहले शक १५९३ माघ वदी १ रात्रौ घटिका २ खोजा बरखूर प्रवेस सन १०७६

३।६।१३ इलिचखान १
१।९। १ बरखूरदार खोजा २
२।७।२८ गजफरखान ३
०।८।२४ मागता येलिचखान ४
१२ महिदीखान
१३ मिर्जा महिदी
१४ तकीखान
१५ औयाखान
१६ सैफदीखान
१८ अबसखान
१९ नजमीखा
२० मुरादखा

५ माहराजा मनोहरदास गौड
६ सैद सेरखान
७ केसरासिंग
८ कइकुबईतखान
